

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

विश्वसाहित्य : ९ :

# आशियांतील धर्मसंग्राम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि. ........
क्रमांक ........ नों. दि. ........

निवेदक :

**कार्लोस पी. रोम्युलो**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या
आमसभेचे माजी अध्यक्ष.

अनुवादक :

**अम्बादास अग्निहोत्री**

REFBK-0009088
REFBK-0009088

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबई ४

मूल्य दीड रुपया.

प्रकाशक :
ग. पां. परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबआी ४

आवृत्ति पहिली
१ मार्च १९५६

Marathi Translation of
CRUSADE IN ASIA
by Carlos P. Romulo
(Originally published b
The John Day & Co., New York
*This version is translated fro*
*excerpts which appeared in th*
*April 15, 1955 issue of*
*'U. S. News & World Report.*

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे,
प्रोप्रायटर, श्रीज्ञानेश्वर प्रेस,
३९३ सी, शिवाजी रोड, कोल्हापूर.

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
20978
क्रमांक

एका व्यक्तीनें कम्युनिस्टांविरुद्ध केलेल्या संग्रामाची ही आत्मनिवेदनपर कथा आहे.

फिलिपीन्सचे एक राजकारणधुरंधर आणि मुत्सद्दी कार्लोस पी. रोम्युलो यांचे अनेक मोठमोठ्या जागतिक परिषदांमध्यें कम्युनिस्टांशीं खटके उडालेले आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेच्या अध्यक्षपदीं निवडले गेलेले हे पहिलेच आशियायी पुरुष होत. सान फ्रान्सिस्को, जिनीव्हा, पॅरिस आणि वॉशिंग्टन येथील आपल्या देशाच्या वकिलातींमध्यें त्यांनीं कामगिरी केलेली आहे.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील आपल्या विविध कामगिऱ्या बजावून श्री. रोम्युलो जेव्हां फिलिपीन्सला परतले तेव्हां स्वतःच्या सरकारी यंत्रणेंत अगदीं अंतर्वर्तुळांत कम्युनिस्टांनीं चोरटा शिरकाव करून घेऊन पाय रोवलेले त्यांना आढळून आले. ते म्हणतात, “ जिथें पहावें तिथें कम्युनिस्टांचा सुळसुळाट दिसत होता. ”

१९४५ मध्यें सान फ्रान्सिस्को येथें या फिलिपीनो राजकीय नेत्याची रशियन कम्युनिस्टांशीं पहिली गांठ पडली. आणि त्याच वेळीं त्यांना आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला—रशियनांच्या मर्जीखातर प्रार्थनेविना या परिषदेचा प्रारंभ झाला होता.

त्या परिषदेंतील मोलोटॉव्हचा प्रवेश, "एकाद्या अट्टल खुनी गुन्हे-गारानें एकाद्या कुकर्मासाठीं झेप घ्यावी" असा वाटला होता. या परिषदेंत रशियनांची वृत्ति औद्धत्यपूर्ण, हंसत खेळीमेळीनें वागण्याच्या अभावा[illegible]ी आणि तिरस्कारयुक्त होती.

१९४८ मध्यें जिनीव्हा येथें भरलेल्या एका परिषदेंत श्री. रोम्यु[illegible]लो यांना आश्चर्याचा वेगळाच धक्का बसला. या परिषदेंत रशियन मुत्स[illegible]द्दी मोठ्या संख्येनें उपस्थित होते. आणि त्यांची वृत्ति, स्नेहभावाची, खेळी-मेळीची, हंसरी, सौजन्यपूर्ण आणि सलगीची दिसून येत होती. मात्र [illegible]या साऱ्या मुत्सद्देगिरीच्या मनमिळाऊपणाआड, पूर्वीच्या परिषदेंत दिसले[illegible]ला कुटिल हेतु दडलेला होता.

श्री. रोम्युलो हे एका छोट्या आशियायी देशाचे प्रतिनिधि असल्यामु[illegible] लाल मुत्सद्यांकडून त्यांचा अनुनय अत्यंत दक्षतेनें केला जात होता. "आशियायी लोकांसाठींच आशिया" हें घोषवाक्य या रशियन मुत्सद्यांच्या जिभेवर सारखें नाचत होतें; "आम्हीही पौर्वात्य आहोंत, म्हणूनच–" हें त्यांचें आवडतें पालुपद होतें.

पॅरिस येथें श्री. रोम्युलो यांची आन्द्रे व्हिशिन्स्की यांच्याशीं पहिली[illegible] पण जोराची टक्कर झाली–आणि सोव्हिएट दुटप्पीपणाचा साक्षात्कारही त्यांना तेथेंच झाला.

वॉशिंग्टनला, ग्रोमीको आणि मलिक यांच्याविरुद्ध त्यांना पवित्रा टाकून उभें राहावें लागलें आणि तिथेंच त्यांची पक्की खात्री पटली : "या लोकांचा एकमेव उद्देश म्हणजे अमेरिकेचे ( युनायटेड स्टेट्स्चे ) पाय ओढणें."

आजच्या जगांत, अमेरिकेशीं स्नेह ठेवणें कोणाही आशियायी व्यक्तीला सुलभ नाहीं, असें श्री. रोम्युलो यांचें मत आहे.

आजच्या आशियाचें निरीक्षण करतांना लेखकाला, फक्त तीनच आशियायी राष्ट्रें कम्युनिझमविरुद्ध झगडायला बद्धपरिकर असलेलीं दिसतात. तीं तीन राष्ट्रें म्हणजे थायलंड, पाकिस्तान आणि फिलिपीन्स. श्री. रोम्युलो म्हणतात, "याखेरीज आशियांत असे करोडो लोक आहेत

कीं जे अमुक एका पक्षाकडे झुकलेले नाहींत, पण जर अमेरिका पुनः त्यांचा विश्वास संपादन करील तर ते लोकशाहीच्या झेंड्याखालीं येतील."

श्री. रोम्युलो यांचा जन्म ता. १४ जानेवारी १९०० रोजीं फिलिपीन्स-मधल्या तार्लक प्रांतांतील कामिलिंग येथें झाला. त्यांचें जीवन विविधतापूर्ण आहे. ते कॉलेजांत प्राध्यापक होते. वृत्तपत्राचे संपादक होते. प्रकाशक होते. सैन्यांत ब्रिगेडियर जनरल होते. व्याख्याते होते. राजकीय नेतृत्व त्यांनीं केलें आहे आणि राजनैतिक मुत्सद्दीही ते आहेत.

श्री. रोम्युलो यांच्या "आशियांतील धर्मसंग्राम" ("Crusade in Asia") या पुस्तकांतील उतारे या छोट्या पुस्तकांत ग्रथित करण्यांत आले आहेत.

★ ★ ★

# फिलिपीन्समधील
# कम्युनिस्ट कारस्थानाची कहाणी

निवेदक : **कार्लोस पी. रोम्युलो,**
संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेचे माजी अध्यक्ष.

---

" आशियांतील धर्मसंग्राम " (" Crusade in Asia ") हें कार्लोस पी. रोम्युलो यांचें पुस्तक न्यू यॉर्कच्या दि जॉन डे कंपनीनें प्रकाशित केलें आहे. या पुस्तकांतील उतारे सर्वप्रथम प्रसिद्ध करण्याबाबतचे जागतिक हक्क 'यु. स्टे. न्यूज अँड वर्ल्ड रिपोर्ट' या नियतकालिकानें मिळविले आहेत. पुस्तकाचे सर्वाधिकार कार्लोस पी. रोम्युलो यांच्याकडे आहेत.

१५०० शब्दांपेक्षां कमी शब्दसंख्येचे उतारे १२ एप्रिल १९५५ च्या सकाळच्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यासाठीं देण्यांत आले होते. या १५०० शब्दसंख्येपेक्षां अधिक मोठे उतारे, दि जॉन डे कंपनी या प्रकाशकांच्या परवानगीविना छापतां, रेडिओवर किंवा टेलिव्हिजनवर ध्वनिक्षेपित करतां, कामा नयेत.

त्या पुस्तकांतील उतारे पुढें देण्यांत आले आहेत :

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..........
शाखा

## प्रकरण १ लें : कम्युनिस्ट संघटनेचें स्वरूप

ज्या दिवसाची आम्ही प्रतीक्षा करीत होतों, जो दिवस उजाडावा म्हणून प्रार्थना करीत होतों आणि ज्या दिवसासाठीं आम्ही फिलिपीन्समध्यें झगडलों होतों, तो दिवस अखेर उजाडला होता. ती १९४६ च्या जुलैची ४ थी तारीख होती.

आमचा स्वातंत्र्यदिन म्हणून आम्हीं तो दिवस मुद्दाम निवडला होता. कारण तोच दिवस अमेरिकेचाही स्वातंत्र्यदिन आहे. अर्धशतकपर्यंत ज्या देशानें आम्हांला लोकशाहीपद्धतीचे धडे शिकविले होते, जो देश जपान-विरुद्ध झालेल्या घोर संग्रामांत आमच्या खांद्याला खांदा देऊन लढला होता, ज्या देशानें आम्हांला सौजन्यपूर्ण वागणूक दिली होती आणि आशियाच्या पूर्व सीमारेषेवरील एका छोट्या देशाला ( आम्हांला ) जो देश आज स्वातंत्र्याची देणगी बहाल करीत होता, त्या मायदेशाविषयींचें कृतज्ञता–चिन्ह म्हणून आम्हीं या दिवसाची निवड केली होती.

या दिवसानंतर आमच्या देशाचा दर्जा ‘ फिलिपीन्स कॉमनवेल्थ ’ हा राहणार नव्हता. आमचें राष्ट्र स्वतंत्र राष्ट्र बनणार होतें–युद्धोत्तरकालांत स्वातंत्र्याचें चिरवांछित ध्येय गांठणारें आशियांतील पहिलेंच राष्ट्र !

मनिलाच्या मध्यभागीं असलेल्या ल्यूनेता चौकांत, पहिल्या स्वातंत्र्य-दिनाचा समारंभ पाहाण्यासाठीं, आणि आमच्या नवराष्ट्राचे पहिले राष्ट्रपति मॅन्युएल रोक्सास हे आपल्या अधिकारपदाची शपथ घेणार होते ती ऐकण्यासाठीं दोन लाखापेक्षां अधिक जनसमुदाय जमलेला होता. माझ्या ओळखीची प्रत्येक व्यक्ति आणि माझ्या देशाचा संपूर्ण साकार इतिहास त्या भव्य रमण्याच्या रूपानें खडा आहे असें मला वाटलें. फिलिपीन्सच्या यच्चयावत् बेटांतून लोक आले होते, अमेरिकेंतूनही आले होते; फिलिपीनो प्रतिनिधि

होते, वॉशिंग्टनहून विमानानें आलेले अमेरिकन नेतेही होते. व्यक्तिशः माझ्या जीवनचित्राचे जणूं घटकच असे आबाल स्त्रीपुरुष—नातेवाईक, शेजारी आणि जुने मित्र—त्या मेळाव्यांत होते. ज्यांच्याबरोबर मी शाळेंत गेलों होतों, वृत्तपत्रीय जीवनांत जे माझे सहकारी होते, मनिला आणि वॉशिंग्टन येथील कायदेमंडळांत ज्यांच्याबरोबर मी कार्य केलें होतें, फिलिपीन्सच्या युद्धांत जे माझ्या खांद्याला खांदा देऊन लढले होते, ते लोक त्या मेळाव्यांत होते.

आणि या सर्वांत विशेष म्हणजे, युद्धामुळें जिच्यापासून मला दूर राहावें लागलें होतें ती माझी पत्नी व्हर्जिनिया त्या ठिकाणीं होती.

त्या मेळाव्यांत मला अनेक अपंग, अंध, कुरूप झालेल्या व्यक्ती दिसत होत्या. स्पेनविरुद्धच्या क्रांतींत किंवा बातानच्या वा कॉरिजिडॉरच्या संग्रामांत सैनिक म्हणून भाग घेतांना परिधान केलेला आणि आज फाटकातुटका झालेला गणवेश ज्यांच्या अंगावर आहे असे लोक तेथें होते, आणि युद्धांत गमावलेल्या स्वकीयांसाठीं काळीं शोकवस्त्रें परिधान केलेल्या व्यक्ती,—बहुतांशीं स्त्रियाहि तेथें होत्या.

पण, प्रत्येक चेहेऱ्यावर आशेची झळाळी होती, हृदयांत न मावल्यामुळें ओसंडणाऱ्या आशेची झळाळी होती.

आमच्या अंतःकरणांत अढळ स्थान मिळवून बसलेला हा दिवस होता. त्या क्षणापासून आम्ही स्वतंत्र होणार होतों.

* * *

कुणालाच कल्पना नव्हती. ल्यूनेता चौकांत त्या संस्मरणीय दिनीं उपस्थित असणाऱ्या कुणालाही स्वप्नांत देखील वाटलें नव्हतें कीं त्यानंतर दोनच वर्षांनीं आमचे आवडते रोक्सास आमच्यांतून निघून जातील आणि आमच्या स्वातंत्र्यासाठीं चवथा संग्राम करण्यासाठीं साऱ्या फिलिपीन्सला खडें ठाकावें लागेल. हा संग्राम सर्वांत भयंकर होता. कारण या संग्रामांतील लक्ष्य अचूक शरसंधान करण्याच्या दृष्टीनें वेध घेण्याला बिकट होतें—हा संग्राम प्रत्यक्ष व्यक्तींशीं नव्हता; सावल्यांशीं, कल्पनांशीं आम्हांला झगडायचें होतें.

त्या स्वातंत्र्यदिनीं जर कुणीं असें सूचित केलें असतें कीं, आशियाच्या पलिकडच्या सीमेवरून चोरटा चंचुप्रवेश करून, एका नव्याच विचार-प्रणालीची सांथ आमच्या या ख्रिश्चन आणि लोकशाही राष्ट्रांत पसरणार आहे, तर त्याला मीं वेड्यांत काढलें असतें. माझ्या दृष्टीनें कम्युनिझमचें स्थान फक्त रशियांत होतें. युद्धांत रशिया आमच्या पक्षाला होता, दोस्त राष्ट्र होतें तें. महायुद्ध संपलें होतें, आम्ही आमचें स्वातंत्र्य मिळविलें होतें. आणि स्वतंत्र राष्ट्रांतल्या लोकांच्या मनावर रशियाच्या ध्येयप्रणालीची पकड कशी बसूं शकेल?—असें मला त्यावेळीं वाटत होतें.

स्वातंत्र्यदिनानंतर आणखी कांहीं वर्षांनीं जरी कुणी म्हणालें असतें कीं, फिलिपीन्समध्यें कम्युनिझमचा चोरटा, पण गंभीर स्वरूपाचा प्रवेश झालेला आहे तरीदेखील त्याचा मीं त्यावेळीं उपहासच केला असता; आणि माझ्या-सारखा मी कांहीं एकटाच नव्हतों; आणि ही उपहासवृत्ति आम्हीं सोडली त्यावेळीं प्रकरण भलत्याच थराला गेलें होतें.

फिलिपीनो प्रतिनिधि या नात्यानें सान फ्रान्सिस्को परिषदेला हजर राहिलों असतांना रशियन प्रतिनिधींच्या कार्यपद्धतीचें प्रत्यक्ष दर्शन मला घडलें होतें, आणि त्यांच्या भांडखोर, उद्दाम वागणुकीनें मला अस्वस्थ केलें होतें ही गोष्ट जरी खरी असली तरी रशियाला घाबरण्याचें कांहीं कारण आहे असें मला वाटलें नव्हतें. त्या वेळीं रशियाच्या सामर्थ्याची आम्हांला कांहींच कल्पना नव्हती. चीनसारखें सामर्थ्यशाली राष्ट्र अत्यंत अल्पकाळांत हातोड्या–कोयत्याला बळी पडेल आणि पुनः एकदां फिलिपीन्सवर आक्रमणाचे काळे ढग ओळंबूं लागतील ही कल्पना आम्हांला त्यावेळीं मुळींच नव्हती.

सान फ्रान्सिस्को येथें आम्ही जेव्हां संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद लिहिली तेव्हां, अण्वस्त्राचा जन्म झालेला आहे याची आम्हांला कांहींच कल्पना नव्हती. परंपरागत शस्त्रास्त्रें डोळ्यांपुढें ठेवूनच आम्हीं ती सनद तयार केली होती. जेव्हां अणुबॉंबचा पहिला स्फोट हिरोशिमावर झाला तेव्हांच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कित्येक योजना जुन्यापुराण्या ठरल्या.

रोक्सासच्या मृत्यूच्या घटनेप्रमाणेंच या सर्व घटना भवितव्याच्या पोटांत

होत्या. भवितव्याच्या पोटांत आणखी काय काय होतें, याची ता. ४ जुलै १९४६ रोजीं आम्हांला कांहींही कल्पना नव्हती. आम्हांला एकच एक खात्री वाटत होती. आम्ही आमच्या राष्ट्रासाठीं आंखलेला जीवनक्रम अमेरिकन धर्तीवर राहणार आहे एवढेंच आम्हांला त्यावेळीं नक्की माहीत होतें.

## उर्वरित शस्त्रास्त्रें : एक प्रलोभन

हिरोशिमावर अणुबॉम्बचा स्फोट होतांच पॅसिफिकमधील महायुद्ध समाप्त झालें आणि त्याबरोबर युद्धाची प्रचंड धामधूम एकदम थबकली. परिणामीं, विमानें, मोटारी, बंदुका, ज्याचा हिशेबही ठेवलेला नाहीं असें लाखो डॉलर्स किंमतीचें अगणित विविध साहित्य ठिकठिकाणीं पडून राहिलें; कुणाही लोभी माणसांच्या हातीं तें पडलें असतें. या अगणित साहित्याची आतां अमेरिकेला गरज नव्हती. स्वाभाविकपणेंच, कांहीं राजकारणी लोकांची हांव त्यामुळें वाढली तर नवल नाहीं.

पण मॅन्युएल रोक्सासनें या लोकांचे डाव मुळांतच उधळून लावले. कांहीं दिवस हें युद्धसाहित्य तसेंच पडून राहिलें. त्याला कुणाचा हात लागला नाहीं. हें प्रचंड युद्धसाहित्य, ही अफाट संपत्ति पडून होती, निरुपयोगी पडून होती, वासलात लागण्याची वाट पहात होती...

आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित झालेला होता. त्याचें गांभीर्य त्यावेळीं कुणाच्याच ध्यानीं आलें नव्हतें. त्याच १९४६ सालीं, आम्हांला स्वातंत्र्य मिळालें त्याच सालीं, कम्युनिझमनें फिलिपीन्समध्यें धीटपणें डोकें वर काढलें होतें. पण, तो आमचा एक भयंकर शत्रु ठरणार आहे याची त्यावेळीं आम्हांला कल्पनाही नव्हती. शांततेचें वातावरण गढूळ करणारा एक उपद्रव एवढीच त्याविषयीं आमची त्यावेळीं कल्पना होती.

कम्युनिस्ट चळवळीचें स्वरूप आणि तिची वाढ यांचें आकलन करून घेण्यासाठीं, जपाननें फिलिपीन्स व्यापण्यापूर्वीच्या काळाचें, फिलिपीन्समधील अमेरिकन्स आणि फिलिपीनो हे जपानी टांचेखालीं सारखेच दडपले गेले होते, त्या काळाचें सिंहावलोकन केलें पाहिजे.

आणि मग, त्यापेक्षांही मागें जाऊन युद्धपूर्व काळाकडे नजर टाकली पाहिजे. असें सिंहावलोकन करतांना, ही कम्युनिस्ट चळवळ किती किरकोळ

स्वरूपाची होती आणि तिच्या या प्रारंभींच्या काळीं किती थोडे लोक त्या चळवळींत होते हें दिसून येतें. आतां आम्हांला कळतें कीं, प्रारंभीं नेहमींच असे हाताबोटावर मोजण्याइतके लोक या चळवळींत असतात. आरंभीं एखादाच नेता असतो आणि त्याच्यापासूनच सारी सुरुवात होते. एकदां त्यांना ओळखलें कीं, वेळींच आळा घालणें शक्य असतें.

आमच्या बाजूनें सांगायचें झालें तर, अशा आरंभकालांतल्या कम्युनिस्टांना पारखून आम्हीं त्यांना आळा घातला होता. अर्थात् हें काम झटपट झालें नव्हतें आणि पुरतेपणीं झालें नव्हतें. आमच्या लोकशाही चिरेबंदींत त्यांना कांहीं फटी सांपडल्या. त्या फटींतून त्यांनीं चंचुप्रवेश केला. त्यांनीं मंदगतीनें, पण बिनदिक्कतपणें पुढें घुसत राष्ट्राच्या काळजालाच हात कसा घातला, आमच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रवेशद्वारांपर्यंत त्यांनीं धडक कशी मारली आणि कांहींनीं अंतर्भागांतही प्रवेश कसा केला याची ही कहाणी आहे.

त्यावेळीं आमच्या नवजात राष्ट्राचा डोलारा डळमळूं लागला, आम्ही अगदीं जमीनदोस्त होण्याची वेळ आली. त्यावेळची ही कथा आहे.

ही सारी कथा मीं अत्यंत काळजीपूर्वक आणि तपशीलवारपणें सावकाश सांगितली पाहिजे. कारण, कम्युनिस्टांचीं सत्ता काबीज करण्याचीं कारस्थानें ज्या पद्धतीनें घडवून आणलीं जातात आणि चांगल्या समतोल विचाराच्या माणसांचीही दिशाभूल करून त्यांना कम्युनिझमच्या कुटिल कारस्थानांत ज्या पद्धतीनें सहभागी बनविलें जातें, त्याबद्दल अजूनही मला विलक्षण अचंबा वाटत आहे.

कम्युनिस्टांच्या चढाईला एकदां सुरवात झाली कीं, ती जगांत सर्वत्र होते. जिनीव्हाला, अमेरिकेंत आणि फिलिपीन्समध्यें त्याचा प्रत्यक्ष आविष्कार मीं पाहिलेला आहे. आज, मी मागें वळून पाहात असल्यामुळें, फिलिपीन्समध्यें, पर्ल हार्बरवरील हल्ल्यापूर्वींच, बातानच्या लढाईपूर्वींच अगदीं निरुपद्रवी दिसणारें हें कम्युनिस्ट आक्रमण कसें सुरू झालें याचें स्वच्छ चित्र माझ्या नजरेपुढें उभें राहिलें.

इतर ठिकाणांप्रमाणेंच मनिला येथेंही ही चढाई आधीं आमच्या तरुण पिढीवर झाली आणि पुढें तरुणांनीं तिचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 20960 वि. इतिहास
क्रमांक ... नों. दि. २१।७।५६

शिक्षणाच्या बाबतींत, प्रगतीची संधि उपलब्ध करून देण्याच्या बाबतींत आमचा देश जास्तींत जें करूं शकत होता तें आम्ही ह्या तरुणांसाठीं करीत होतों. आणि साहजिकच देशाचें उतराई होण्यासाठीं त्यांनींही जेवढें करता येईल तेवढें केलें पाहिजे अशी आमची अपेक्षा होती. ते तरुणच या आक्रमणाचे सूत्रधार होते.

महायुद्धापूर्वीं किती तरी वर्षें अगोदर मनिला येथें आमच्या कांहीं अत्यंत तल्लख बुद्धीच्या तरुणांनीं प्रथम हें जाळें टाकायला सुरुवात केली. प्रारंभीं या कारस्थानाचें बाह्य स्वरूप केवळ सामाजिक होतें. या कारस्थानाचा एक सूत्रधार फिलिपीन्सच्या विद्यापीठांतील प्राध्यापक डॉ. व्हिसेन्टी लावा हा होता. दुसरा लुई तारुक. तारुक हा तर त्यावेळीं एक माध्यमिक शाळेंतला विद्यार्थी होता, पण तोच पुढें फिलिपीन्सच्या शांततेचा नंबर एकचा शत्रु बनला, आणि अग्रगण्य कम्युनिस्ट ठरला. आणखी, क्रिसान्टो इव्हँजेलिस्टा आणि ग्वीलेर्मो कापादोशिया यांच्यासारखे कामगार पुढारीदेखील त्यांत होते.

लावा हा शिक्षक आणि तारुक हा विद्यार्थी असें त्यांचें नातें असलें तरी ते दोघे एकमेकांचे मित्र होते. त्यांची भूमिका यापेक्षां आणखी निराळी होती, ते कम्युनिझमचे सहप्रवासी होते, हें आज आम्हांला माहीत झालें आहे. लावा हा रसायनशास्त्राचा प्राध्यापक होता. न्यूयॉर्कमधल्या कोलंबिया विद्यापीठाची पीएच्. डी. पदवी त्यानें संपादिलेली होती. या विद्यापीठांत शिकत असतांनाच त्यानें मार्क्स, लेनिन आणि इतर जहाल नेत्यांचें लिखाण अधाशीपणें वाचलें होतें. पण तो एक अत्यंत तैलबुद्धीचा पुरुष होता, हें विसरतां कामा नये.

तारुक हा तरुणही मार्क्स प्रभृतींच्या लिखाणाचा जबरा अभ्यासक होता, आणि कम्युनिझमचे धडे त्याला देणारा लावा पुढील काळांत त्याचा सल्लागार मार्गदर्शक बनला. युद्धाच्या काळांत लावा क्षयाच्या विकारानें मृत्युवश झाला; तोंपर्यंतच्या काळांत त्यानें असंख्य कम्युनिस्ट प्रचाराचे लेख आणि चोपडीं लिहिण्याच्या कामीं हातभार लावला होता. या लेखांचा आणि चोपड्यांचा प्रचार तारुक साऱ्या फिलिपीन्सभर धूमधडाक्यानें करीत असे; आणि तारुकच्या नेतृत्वाखालीं कम्युनिस्ट प्रचाराचें कार्य करणारे अनेक अनुयायी लावानें तयार करून ठेवले होते.

तथापि, प्रारंभींच्या काळांत त्यांच्या सहकार्यांचें उद्दिष्ट, कम्युनिस्टांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें, अनुयायी मिळविणें हेंच होतें; आणि त्यांचा डोळा मुख्यतः बुद्धिजीवी वर्गावर असे.

## कम्युनिस्ट गटांची संघटना कशी केली जाते ?

युद्धपूर्व काळांतील त्या दिवसांत मी वृत्तपत्रांचा संपादक होतों आणि मनिलामध्यें काय चाललें आहे हें मला माहीत होतें, निदान माझी तशी समजूत होती. वरील दोघेजण आणि त्यांचे दोस्त नेहमीं अल्पोपाहारांच्या वा भोजनसमारंभांच्या निमित्तानें बैठका घडवून आणीत. त्यांचें स्वरूप वाङ्मयीन असे. मनिला येथील प्रमुख पत्रकार आणि लेखक यांच्या घरीं हीं संमेलनें होत. माझ्या वृत्तपत्रांतील कित्येक संपादकदेखील अशा डावपेचांना बळी पडले होते आणि आपल्या घरीं हे समारंभ घडवून आणण्याला प्रवृत्त केले गेले होते. या संमेलनप्रसंगीं साहित्यचर्चा, कवितावाचन इत्यादि कार्यक्रम होत आणि गप्पाष्टकांत वेळ मजेंत जाई. या समारंभांचें स्वरूप आपाततः तरी अत्यंत सोज्ज्वळ होतें.

अशा समारंभांचा आणि संमेलनांचा मूळ हेतु आम्हांला नंतर कळला. त्या निमित्तानें जमलेल्या तरुणांचें निरीक्षण, पारख आणि निवड करण्याची संधि तारुक आणि लावा यांना मिळत असे. याच तरुणांना कम्युनिस्ट गट बनविण्याला नंतर उद्‌युक्त करण्यांत येत असे.

अशा रीतीनें आमच्या देखत देखत कम्युनिस्ट गट तयार केले जात होते, आमच्या या खिश्चन भूमींत कम्युनिझम पाय रोवीत होता आणि आम्ही मात्र त्या बाबतींत अज्ञानांत होतों !

जगांत सर्वच ठिकाणीं ह्याच छुप्या पद्धतीचा कम्युनिस्टांकडून अवलंब केला जात होता. आमच्या तरुण पिढींतील उत्तमोत्तम, नेतृत्वाचे सुप्त गुण असलेल्या तरुणांना आपल्या जाळ्यांत ओढायचें ! देखण्या, सुशिक्षित, बुद्धिमान्, भावनाप्रधान नि स्वप्नाळू डोळ्यांच्या तरुणांचा लक्ष्यवेध करायचा !

आणि आजही कम्युनिझमचें लक्ष्य जगांतली तरुणपिढी हेंच आहे. तरुण पिढीला बिघडविणें हेंच त्याचें उद्दिष्ट आहे ! शक्य असेल तिथें तिथें लहान

मुलांच्या मनांत आपल्या विचारांचें बीज रुजविण्याचा प्रयत्न करणें हें जागतिक कम्युनिझमचें उद्दिष्ट आहे!

सोव्हिएट प्रचाराला तरुण वर्ग कां बळी पडतो याचें मला आतां आश्चर्य वाटत नाहीं. तरुणांच्या वाढत्या आकांक्षांना खाद्य पुरविण्याच्या दृष्टीनें काळजीपूर्वक या प्रचाराचें तंत्र बसविलेलें असतें. त्या प्रचारांत तरुण वर्गाची जी खुशामत केलेली असते आणि त्याला जीं आश्वासनें दिलेलीं असतात त्यांतील लबाडी ओळखण्याइतकी तरुणांची बुद्धि परिपक्व नसते. आपल्या स्वतःच्या स्वप्नाळू कल्पनांमुळेंच हा तरुण वर्ग कम्युनिझमच्या जाळ्यांत अडकतो. या तरुण वर्गाबद्दल अनुकंपा बाळगली पाहिजे, त्यांना समजून घेतलें पाहिजे आणि संरक्षण दिलें पाहिजे. शक्य असेल तर त्यांना या जाळ्यापासून बचावलें पाहिजे.

हे तरुण असे कम्युनिझमच्या जाळ्यांत कां अडकतात?

मला तें उमजलें आहे. कारण कम्युनिस्ट कारस्थानाचा आविष्कार मीं स्वतः पाहिलेला आहे. मॉस्कोपासून मनिलापर्यंत, सर्व युरोपभर, आशियाच्या कानाकोपऱ्यांत हें जाळें कसें पसरलें जातें हें मीं पाहिलेलें आहे. प्रत्येक ठिकाणीं, जीवनांतील सुखसोयी-सवलती ज्यांना पुरेशा लाभलेल्या नाहींत, असंतुष्ट रहाण्याला ज्यांना कारणें आहेत अशा तरुणांना आपल्या जाळ्यांत कम्युनिझम कसा ओढतो हें मीं पाहिलेलें आहे. त्याचप्रमाणें जे सर्वप्रकारच्या सुखसोयी-सवलती उपभोगतात आणि ज्यांच्यापुढें भावी उज्ज्वल जीवन-क्रमाचें ताट वाढून ठेवलेलें आहे असे तरुणही त्याला बळी पडतात. यांपैकीं अनेकजण सद्‌हेतु बाळगणारे असतात. पण, आपण काय करीत आहों याची जाणीव होण्यापूर्वींच ते देशद्रोहाच्या मार्गावर वाटचाल करूं लागलेले असतात.

असें कां होतें?

कारण, ते खुशामतीला बळी पडतात.

### 'एका ॲल्गर हिस' चें शब्दचित्र

आपण अशा एका तरुणाचें उदाहरण घेऊं या. कोणत्याही देशांतील हा तरुण ॲल्गर हिसचा नमुना आहे. (स्वदेशद्रोह करून कम्युनिस्टांचा

हेर बनलेल्या अॅल्गर हिसचें नांव आतां 'कम्युनिस्ट हेर' या अर्थी कुविख्यात झालेलें आहे.) हा तरुण आपल्या देशाशीं, आपल्या सरकारशीं, इतकेंच काय पण आपल्या मातापितरांशींही द्रोही वर्तन करायला तयार होण्याइतका कम्युनिझमच्या जाळ्यांत कसा आकर्षिला जातो याचें आपण निर्लेप वृत्तीनें परीक्षण करूं या.

न्यूयॉर्क किंवा मनिला येथील अशा तरुणाचें आपण उदाहरण घेऊं या.

आपण मानूं या कीं हा तरुण श्रीमंत वर्गांतला नाहीं किंवा गरीब वर्गांतलाही नाहीं; साधारण सुखवस्तु अशा जगांतील पन्नास टक्के मध्यम वर्गांपैकीं तो आहे. त्यानें मार्क्स, लेनिन, एंगल्स आणि स्टालिन यांचें लिखाण वाचलेलें आहे. हें जग संक्रमण पावत आहे याचें त्याला ज्ञान आहे.

मानवी स्वातंत्र्याच्या या उत्क्रांतीला हातभार लावून तिचें पाऊल पुढें पडेल असें करण्याची संधि एक बुद्धिजीवी या नात्यानें त्याच्यापुढें वाढून ठेवलेली आहे असा त्याचा समज करून देण्यांत येतो.

तो इतिहासाचें सिंहावलोकन करूं लागतो. सरंजामशाही, राजाचे ईश्वरदत्त हक्क, साम्राज्यवाद इत्यादींपासून उत्क्रांत होत होत जगानें लोकशाहीपर्यंत केलेल्या प्रगतीचें तो अवलोकन करतो. रशियांत सुरू झालेली ही महान् नवक्रांति जगद्व्यापी ठरणार आहे आणि त्या क्रांतींत जर तो सहभागी होईल तर त्यामुळें भावी काळांत निर्माण होणाऱ्या सुंदर नव्या जगांत महत्त्वाचें, सत्तेचें, मानाचें स्थान त्याला लाभेल असा त्याचा समज करून देण्यांत येतो.

या आश्वासनांनीं तो तरुण हुरळून जातो आणि विध्वंसक, अननुभूत, अपूर्व साहसांत उडी घेण्याचें आकर्षण,–दरोडेखोर किंवा पोलिस यांच्या साहसी जीवनाबद्दल वाटावें तसें आकर्षण, त्याला वाटूं लागून तो कम्युनिझमकडे खेंचला जातो.

निषिद्ध वस्तूबद्दल जसें एक आकर्षण वाटतें, तसें त्याला कम्युनिझमबद्दल आकर्षण वाटूं लागतें. एकादी गोष्ट आपल्याला अप्राप्य ठरणें तरुण मनाला रुचत नसतें. आपण इतरांपेक्षां वेगळे आहोंत अशी समजूत करून घेणें तरुणाला आवडतें. जुन्यापुराण्या, टाकाऊ ठरलेल्या गोष्टींविरुद्ध आपण आपल्या

साऱ्या शक्तींनिशीं खडे आहोंत असें मानण्यांत त्याला मौज वाटते. तो तरुण असल्यामुळें केवळ वादासाठीं वाद करणें त्याला प्रिय असतें; आणि वितंडवाद, तार्किक चर्चा, शाब्दिक कसरत या गोष्टींना पुरेपूर वाव कम्युनिझम देत असल्यामुळें या तरुण रंगरूटाला सतत चघळीत बसण्याला कम्युनिझम भरपूर खाद्य पुरवितो. कॉलेजांत असतांनाच बहुधा या तरुणाला प्रथम कम्युनिझमनें भुरळ घातलेली असते. कारण कॉलेजांत जो जास्तींत जास्त आणि मोठ्यांत मोठ्या आवाजांत वितंडवाद घालील तो 'हीरो' ठरतो. आमचा हा तरुण, मॉस्कोनें पुरविलेलीं चोपडीं आणि नियतकालिकें वाचून त्यांतील विचारांच्या शिदोरीवर पोसला जातो आणि स्वतःच्या वक्तृत्वावर स्वतःच मोहित होऊन, त्या शाब्दिक कसरतीच्या मोहांत कायमचा गुरफटतो. अखेर केवळ छंद म्हणून जडलेली ही संवय एक प्रकारच्या वेडांत परिणत होते. चांगल्या प्रकारें वाद घालतां येण्यासाठीं आपल्या मुद्यांवर आपलाच विश्वास असणें आवश्यक असतें, त्यामुळें तो त्या विचारांवर श्रद्धा ठेवूं लागतो. हळूंहळूं मार्क्सच्या लिखाणाचा बडा अभ्यासक म्हणून इतरांकडून त्याच्याविषयीं आदर बाळगला जाऊं लागतो. बुद्धिजीवी वर्गाचा घटक म्हणून त्याचे सहाध्यायी त्याच्याकडे आदरानें पाहूं लागतात. त्याच्याविषयीं त्यांना एक प्रकारचा वचकच वाटूं लागतो. आणि मग त्याला कम्युनिस्ट पंथांत ओढण्याची खटपट जोरानें सुरू होते; त्याची निरनिराळ्या गटांशीं जानपछान करून दिली जाते. वादविवाद, मतपरिवर्तन यांना ऊत येतो आणि हळूहळू कॉलेज विद्यार्थ्यांच्या वर्गाबाहेर त्याची कीर्ति पसरूं लागते. इतर पुरोगामी तरुणांना आपली माहिती आहे, आपलें भाषण ऐकायला ते उत्सुक आहेत असें त्याला दिसून येतें.

अशा रीतीनें, अल्पप्रयत्नांत त्याला उदंड कीर्ति लाभते. निर्लोभी, भांडवलशाहीविरोधी अशा नव्या तेजस्वी पक्षाच्या झेंड्याखालीं आपण आहों, जुन्यापुराण्या मूर्खपणाच्या कल्पनांवर विश्वास ठेवणाऱ्या भोंगळ तरुणांपेक्षां आपण सर्वस्वीं श्रेष्ठ आहों अशी त्याची भावना होते. कॉलेजच्या विद्यार्थीवर्गातील पुरोगामी नेता, मार्क्सवादी अशीं बिरुदें त्याला लाभतात.

आणि असा हा तरुण मग जन्मभर कम्युनिझमचें बिरुद मिरवतो.

आपल्यावर कम्युनिस्ट हा छाप बसेल कीं काय याची प्रारंभीं त्याला पर्वा वाटत नाहीं. आणि जेव्हां वाटते, तेव्हां त्याचे पाय पुरेपूर खोड्यांत अडकलेले असतात.

पुष्कळ वेळां त्याची बडबड केवळ बडबडच असते, केवळ शाब्दिक खणखणाट असतो, तरुण मनांतील भावनेच्या कल्लोळाचा भाग असतो. उर्वरित आयुष्यभर ज्या संशयांच्या कृष्णछायेखालीं त्याला वावरावें लागणार असतें ते संशय साधार ठरावेत अशा प्रकारचे कोणतेच विध्वंसक हेतु आमच्या या तल्लख तरुणाच्या अंतःकरणांत नसतीलही. तो जेव्हां जगाच्या प्रांगणांत उतरेल, आणि स्वतःचें पोट भरण्यासाठीं कमाई करण्याची गरज वाटूं लागून ताळ्यावर येईल, सर्वसामान्य माणसाचें जीवन जगण्याची त्याला मनापासून गरज वाटूं लागेल तेव्हां तो कम्युनिझमचा बुरखा टाकून देण्याला तयार देखील होईल, कदाचित्; किंवा आतां तसें करतां येणार नाहीं, ती वेळ निघून गेली आहे असेंही त्याला आढळून येईल. आणि मग तो मॉस्कोला वाहिलेला होऊन राहील.

‘लाल’ कळपांत त्याला ओढण्याचें हें काम खुशामतीनें साधलेलें दिसून येईल.

याच तरुणाबरोबर दुसराही तरुण विद्यार्थी पदवीधर बनून कॉलेजबाहेर पडलेला असेल. त्यानेंही परीक्षेत उत्कृष्ट यश संपादिलेलें असेल. शाब्दिक चर्चेच्या खणखणाटांत त्यानें भाग घेतलेला नसेल. त्याच्या पदवीपत्रावर, त्यानें देशद्रोह आणि विश्वासघात यांचा अभ्यासक्रमही यशस्वीपणें पुरा केला आहे याचे निदर्शक गुण नोंदलेले नसतील. अभ्यासक्रमांत या विषयांना स्थान नसतें. तथापि हा तरुणदेखील कम्युनिझमचा भयंकर रंगरूट असण्याची शक्यता असते. या प्रकारचा तरुण उगीच बोलण्यांत वेळ घालवीत नाहीं. तो कृतीला सदैव सज्ज असतो. त्याला आदेश मिळालेले असतात आणि गुप्तपणें तो ते पाळीत असतो आणि त्याच्या कृत्यांचा सुगावा मॉस्कोच्या सूत्रधारांखेरीज कोणालाही लागण्याची शक्यता नसते.

कम्युनिझमच्या अनुयायांचा आणखी एक अतिशय आश्चर्यजनक नमुना असतो. हे स्त्रीपुरुष चांगल्या सुखवस्तु वर्गांतील असतात. त्यांना

सुखवस्तु वस्तींतले "लाल" म्हणतां येईल. संशयास्पद अशा कम्युनिस्ट कार्यांना आर्थिक मदत देण्यास सदैव तत्पर असे हे श्रीमंत लोक असतात. त्यांना त्यांच्या संपत्तीचा आयता वारसा लाभलेला असल्यामुळें, स्वतः कमाई करणाऱ्याच्या मनावर जें एक प्रकारचें वस्तुस्थितीच्या जाणिवेचें नियंत्रण असतें तें त्यांच्या मनावर मुळींच नसतें. संपत्तीबरोबरच कांहीं सामाजिक जबाबदारीही व्यक्तीच्या शिरावर येते याचीं उदाहरणें असंख्य ग्रंथालयें, इस्पितळें आणि अन्य धर्मार्थ संस्था यांच्या रूपानें मोठमोठ्या श्रीमंतांनीं दाखवून दिलेलीं आहेत. पण, संशयास्पद कार्यांना देणग्या देणारे हे श्रीमंत ऐतखाऊ, एक प्रकारच्या अपराधगंडानें पछाडलेले असतात आणि समता स्थापित करून व्यक्तीची प्रतिष्ठा वाढविण्याचें कार्य कम्युनिझमच करील असा भ्रम त्यांच्या ठायीं कम्युनिस्ट प्रचारकांनीं निर्माण केलेला असतो.

त्याचप्रमाणें आर्थिक दृष्ट्या दलित असलेल्यांनाही हाच कम्युनिस्ट प्रचार भुरळ पाडतो. निराश झालेल्यांना, सत्प्रवृत्त लोकांना आणि महत्त्वाकांक्षी लोकांना, आत्मप्रतिष्ठा मिळवून देण्याचें, समता निर्माण करण्याचें आणि मानाचें पान मिळवून देण्याचें आश्वासन कम्युनिझम देतो. अशा लोकांना खरोखर वस्तुस्थितीची जाणीव झाली तर किती बरें होईल! कम्युनिझमचा प्रत्यक्ष आविष्कार कोणत्या स्वरूपाचा असतो हें त्यांना कळेल तर किती बरें होईल!

## कम्युनिझमविरुद्ध मानवी प्रतिष्ठा

कम्युनिझम उद्धारकर्ता नाहीं, अधःपात करणारा आहे. कम्युनिझममध्यें व्यक्तीच्या प्रतिष्ठेला स्थान नाहीं. तो व्यक्तीचें महत्त्व मानीतच नाहीं. सर्व कांहीं राज्यासाठीं असतें. तो मानवी स्वातंत्र्याला केवळ लगाम घालीत नाहीं, तर त्याचा तो नाशच करतो. व्यक्तीचें शरीर आणि मन या दोघांनाही गुलाम बनवून तो हें साधीत असतो.

उदाहरणच पाहिजे तर व्हिशिन्स्कीचें घ्या, मलिकचें घ्या, ग्रोमीकोचें घ्या. या माणसांच्या कृती बघा. संयुक्त राष्ट्र संघटनेंत मी माझ्या डोळ्यांनीं त्यांच्या वागण्याचें निरीक्षण केलेलें आहे. अशा माणसांची तुम्हांला अनुकंपाच वाटावी. त्यांच्या भयाकुलतेचा रास्तपणा तुम्हांला पटावा. बाह्यतः पोलादी वाटणारीं हीं

माणसें म्हणजे मॉस्कोंतून सूत्रचालन होईल त्यानुसार हालचाली करणाऱ्या कळसूत्री बाहुल्या होत. स्वतः स्वतंत्र विचार करण्याची हिंमत त्यांच्यांत नसते. कारण स्वतः विचार करून कांहीं केल्यास चूक होण्याचा संभव असतो. आणि त्यांनीं एकादी चूक करणें म्हणजे मृत्यूलाच निमंत्रण होय! ते एका 'धर्मांध' राष्ट्राचे 'धर्मांध' हस्तक असतात.

संयुक्त राष्ट्र संघटनेंतील दुसऱ्या कोणत्याही देशाच्या प्रतिनिधीकडून कांहीं चूक झाली तर, फार फार तर त्याच्यावर त्याच्या मायदेशाकडून नापसंतीचा शिक्का मारला जाईल. पण हे रशियन प्रतिनिधी स्वतःच मारले जातील!

संयुक्त राष्ट्र संघटनेंतला एक प्रसंग सांगतों. आपला ठराव 'निकालांत काढण्यांत आला' ( disposed of ) अशी तक्रार एका प्रतिनिधीनें केली होती. हाच प्रतिनिधि नंतर पुनः तक्रार घेऊन आला कीं रशियन दुभाष्यानें त्या disposed of या शब्दप्रयोगाचें भाषांतर ठरावाचा 'मुडदा पाडला' ( liquidated ) असें केलें आहे! पण त्यांतल्या बिचाऱ्या दुभाष्याचा काय दोष! 'मुडदा पाडणें' ( liquidate ) हाच शब्द त्याच्या अधिक परिचयाचा आहे त्याला तो काय करणार? रशियन भूमिकेचा सूचक असा हा प्रसंग होता. याच भूमिकेमुळें, रशियन प्रतिनिधि आणि जागतिक शांततेसाठीं धडपडणारे अन्य प्रतिनिधि यांच्यामध्यें दुर्लंघ्य भिंत उभी राहिलेली आहे.

मानवी स्वातंत्र्याच्या उत्क्रांतीच्या मार्गातील कम्युनिझम हें नवें पाऊल होय असा तरुणांचा समज करून दिला जातो. पण तो चुकीचा आहे, भयंकर चुकीचा आहे. कम्युनिझमचें पाऊल अधःपाताप्रत नेणारें आहे.

फिलिपीन्समध्यें कम्युनिझमचें बीजारोपण गुप्तपणें चालू असतांनाच मला कम्युनिझमचा भयंकरपणा प्रतीत झाला तो आंतरराष्ट्रीय आघाडीवर. १९४५ सालीं सान फ्रान्सिस्को येथें संयुक्त राष्ट्र संघटनेची मुहूर्तमेढ रोवली जात होती तेव्हां मला हा साक्षात्कार झाला. महायुद्ध अद्याप चालूंच होतें. फिलिपीन्स अद्याप कॉमनवेल्थ होतें—स्वतंत्र राष्ट्र बनलेलें नव्हतें. फिलिपीन्सचा प्रतिनिधि म्हणून मी हजर होतों तो केवळ मेहेरबानीनें. माझ्या शब्दाला

तिथें फारच अल्प महत्त्व होतें. तथापि लोकशाहीच्या बाजूनें माझा आवाज ऐकवण्याचा माझा निर्धार होता. आणि मी जें कांहीं बोलेन त्याचें इतर प्रतिनिधी स्वागत करतील असा माझा समज करून देण्यांत आलेला होता.

हा समज, फक्त एकच उल्लेखनीय अपवाद वगळतां, खरा होता असें नंतर आढळून आलें. हा अपवाद म्हणजे रशिया होय.

इथें मी प्रथमच नमूद करूं इच्छितों कीं, मी जो सान फ्रान्सिस्कोला गेलों तो रशियाविषयीं मनांत स्नेहबुद्धि राखून. माझ्या उच्च शिक्षणाच्या काळापासूनच मला त्या देशाविषयीं कौतुक वाटत आलें होतें. न्यूयॉर्कच्या कोलंबिया विद्यापीठांत मी विद्यार्थी असतांना, नुकतेच सेवानिवृत्त झालेले आणि आज अत्यंत प्रभावी कम्युनिस्टविरोधी असलेले, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक व्हलादिमिर सिम्खोव्हिच यांच्या मार्गदर्शनाखालीं पुरोगामी साहित्याचा मीं खूप अभ्यास केला होता. मीं मार्क्सचे ग्रंथ वाचले होते. तुर्गनेव्ह, गॉर्की आणि अन्य महान् रशियन नाटककार यांचीं पुस्तकें पठण केलीं होतीं. लिओ टॉलस्टॉय यांचें किती तरी लिखाण मीं मुखोद्गत केलें होतें आणि चर्चेच्या ओघांत मी त्यांच्या लिखाणांतील उतारे वारंवार उद्धृत करीत असें. केरेन्स्कींच्या चरित्राचा मीं मागोवा घेतलेला होता आणि सोव्हिएटनें आंखलेला कार्यक्रम हा इतिहासांतील महत्तम प्रयोग आहे असें माझें मत बनलें होतें. दुसऱ्या जागतिक महायुद्धांतील लढवय्ये म्हणून रशियनांचा गौरव करण्यांत जगांतील इतर साऱ्यांबरोबर मीं सुरांत सूर मिळविला होता. स्टालिनग्राडच्या बचावाच्या वेळच्या त्यांच्या प्रचंड साहसाचें कौतुक केलें होतें. महायुद्धांत रशिया आपलें दोस्त राष्ट्र होतें, त्याच्यावर टीका झाली तर मला चीड येई. आणि मी स्वतः कॅथलिक असूनदेखील, कॅथलिक-चर्चकडून रशियाविरुद्ध होणाऱ्या टीकेचा मला राग येई. सोव्हिएटविरुद्ध पहिला इशारा कॅथलिक चर्चनें दिला—मला वाटे, चर्चचा दृष्टिकोन संकुचित मनोवृत्तीचा निदर्शक आहे, धार्मिक माथेफिरूपणाचा आहे.

तोंपर्यंतच्या काळांत माझी कोणा रशियनांशीं प्रत्यक्ष ओळख झालेली नव्हती, पण रशियाच्या इतिहासाचा आणि वाङ्मयाचा मीं अभ्यास केला

होता आणि म्हणून मला रशियनांविषयीं चांगलीच माहिती आहे असें वाटे.

आणि अशा मनोवृत्तीनें, खुल्या मनानेंच मी सान फ्रान्सिस्कोला गेलों होतों.

## संयुक्त राष्ट्र संघटना : "अमंगल प्रारंभ"

आणि आतां मी कबूल करतों कीं पहिल्या उद्घाटनाच्या दिवशींच माझ्या स्नेहभावनेला एक भयंकर धक्का बसला.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेचा विचार करण्यासाठीं भरलेली ती परिषद सुरुवातीस प्रार्थना न होतांच सुरू झाली.

त्यावेळीं मी वॉशिंग्टनला फिलिपीन्सचा रेसिडंट कमिशनर या हुद्यावर असल्यानें कॉंग्रेसच्या प्रतिनिधि सभेची सुरुवात रोज प्रार्थनेनें व्हावी ही गोष्ट माझ्या अंगवळणीं पडली होती. त्यामुळें या परिषदेची सुरुवात मला, कशीबशी एकदम झाल्यासारखें वाटलें, हा प्रारंभ मला अमंगल वाटला. शांतता चिरस्थायी करण्यासाठीं, ऐक्य प्रस्थापित करण्यासाठीं पन्नास राष्ट्रांचे प्रतिनिधी जिथें जमले आहेत अशा महत्त्वाच्या परिषदेची सुरुवात प्रार्थनेनें कां बरें होऊं नये ?

दक्षिण अमेरिकेंतील राष्ट्रांच्या अनेक प्रतिनिधींशीं या प्रश्नावर माझें बोलणें झालें. याबाबत गंभीर स्वरूपाची हयगय झाली आहे असें आमचें सर्वांचें मत पडलें. तीन लॅटिन अमेरिकन राष्ट्रांच्या प्रतिनिधींना बरोबर घेऊन मी एडवर्ड आर्. स्टेटिनिअस यांच्याशीं खाजगी विचारविनिमय करण्यासाठीं गेलों. स्टेटिनिअस हे त्यावेळीं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री होते आणि अमेरिकन प्रतिनिधि मंडळाचे अध्यक्ष होते. या परिषदेचें निमंत्रक यजमान-राष्ट्र अमेरिका असल्यामुळें परिषदेच्या व्यवस्थेची जबाबदारी स्टेटिनिअस यांच्याकडे होती.

सान फ्रान्सिस्को परिषदेच्या वेळच्या माझ्या स्टेटिनिअसबद्दलच्या आठवणी अत्यंत सुखद आहेत. त्यांचें व्यक्तिमत्व मोहक होतें. ते अत्यंत सुजन गृहस्थ होते. पण बिचाऱ्याला औद्धत्यापुढें नमतें घ्यावें लागलें होतें ! परिषदेचा प्रारंभ प्रार्थनेनें कां झाला नाहीं या आमच्या प्रश्नाचें उत्तर देतांना त्यांच्या स्वरांत खेद व्यक्त होत होता.

ते म्हणाले, "सुरुवातीची प्रार्थना झाली नाहीं या गोष्टीमुळें मीही अस्वस्थ झालों आहें. प्रार्थनेनें प्रारंभ व्हावा असें मला स्वतःला आणि युनायटेड स्टेट्स्च्या सर्व प्रतिनिधींना वाटत होतें. पण या बाबतींत आम्हांला रशियन प्रतिनिधींचा विरोध आहे. आणि परिषदेच्या सुरुवातीलाच कार्य-पद्धतीबद्दल घासाघीस व्हावी असें आम्हांला वाटत नव्हतें. आम्हांला एकजूट आणि सुसंवाद राखायचा आहे. तेव्हां, कृपाकरून प्रार्थनेचा हट्ट धरूं नका अशी माझी तुम्हांला विनंति आहे."

यावर आम्ही अधिक काय बोलणार ? रशियाच्या लहरीपणापुढें नमतें घेणें आम्हांला भाग होतें. पुढील अशा अनेक शरणागतींची ती नांदी होती.

आणि त्याच क्षणीं माझ्या मनांत संशयानें प्रथम डोकें वर काढलें. परिषदेच्या पहिल्या बैठकीचीच कुठें सुरुवात झाली होती आणि पहिल्या फेरीलाच अमेरिकेला पडतें घ्यावें लागलें होतें. तें सुद्धां मूलभूत नि महत्त्वाच्या प्रश्नाबाबत. ईश्वराला ज्यांत स्थान नाहीं अशी परिषद आम्ही भरवीत होतों !

कुणाच्या हुकुमानें ?

स्टालिनच्या !

तथापि, सान फ्रान्सिस्को परिषदेंतील माझ्या पहिल्या भाषणाची सुरुवात, "ही परिषद हेंच आपलें अखेरचें रणक्षेत्र ठरो" या वाक्यानें मीं जेव्हां केली तेव्हां खरोखरच तसें ठरेल असें मला वाटत होतें.

## कम्युनिस्ट मुत्सद्याचें शब्दचित्र

परिषदेला रीतसर सुरुवात होण्यापूर्वीं दोन दिवस आधीं निरनिराळ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधि मंडळांच्या प्रमुखांची बैठक प्राथमिक चर्चेसाठीं भरली होती. या बैठकींतला आपला कार्यक्रम रशियनांनीं अत्यंत काळजीपूर्वक रचला होता.

प्रतिनिधी दिवाणखान्यांत इतस्ततः भटकत होते. अद्याप कुणाचींच बसण्याचीं स्थानें निश्चित झालीं नव्हतीं. लहान लहान गट करून ते आप-सांत खालच्या आवाजांत बोलत होते. आणि अकस्मात् त्या दिवाणखान्यांत झंझावाताचा प्रवेश झाल्यासारखें वाटलें, धूळ उधळली जावी तसें इतर प्रतिनिधी बाजूला सारले गेले. सोव्हिएट रशियाच्या प्रतिनिधि मंडळाचे

प्रमुख व्याचेस्लाफ मोलोटॉव्ह यांचा प्रवेश झाला होता! त्यांच्याभोंवतीं शरीररक्षकांचा गराडा होता. आपल्या अस्तित्वाची जाणीव देतच त्यांनीं प्रवेश केला.

आणि या झंझावाती पुरुषाभोंवतीं लगेच छायाचित्रकारांचा गराडा पडला. एकाद्या रणांगणावर खडखडाट करीत जाणाऱ्या रणगाड्याप्रमाणें जोरानें आणि जोमानें मोलोटॉव्हची स्वारी पुढें झाली, परिषदेच्या मुख्य टेबलाशीं गेली आणि जणुं आपलें तें स्थान ईश्वरदत्तच आहे अशा थाटांत स्थानापन्न झाली. फोटोग्राफरांचे कॅमेरे खटखटले, फ्लॅश बल्ब चमचमले; इतर साऱ्यांचा जणुं विसरच पडला होता. आणि मोलोटॉव्ह, चेहेऱ्यावर स्मिताची रेषाही उमटूं न देतां, जणुं तिरस्कारानें, उर्मटपणानें भोंवतीं बघत होते.

खऱ्याखुऱ्या रशियाचें तें माझें पहिलें दर्शन होतें. शांतता प्रस्थापित करण्यासाठीं आलेला कोणी थोर नेता असा माझा त्यांच्याविषयींचा ग्रह झाला नाहीं. तर, सारा सभ्यपणा आणि सौजन्य धुडकावून लावून एखाद्या खुनी दरोडेखोरानें कृष्णकृत्य करण्यासाठीं मुसंडी मारावी तसा मला मोलोटॉव्हचा तो प्रवेश वाटला. माझ्या डोक्यांत विचाराचीं चक्रें फिरूं लागलीं. रशियाचा वास्तववाद तो हाच काय? नवा रशिया तो हाच काय?

मला भयंकर धक्का बसला होता.

आणि बैठकीला सुरुवात होते न होते तोंच मोलोटॉव्हनें आपला वरचष्मा प्रस्थापित केला.

वास्तविक, सर्व आंतरराष्ट्रीय परिषदांची एक सर्वमान्य परंपरा अशी आहे कीं, यजमान-राष्ट्राच्या प्रतिनिधि मंडळाचा अध्यक्ष हाच अशा बैठकींचा प्रारंभींचा अध्यक्ष असतो. पण मोलोटॉव्हनीं ही परंपरा बंद करा अशी मागणी हुकुमी व कंठाळी सुरांत केली. युनायटेड स्टेट्स्कडे अध्यक्षपद न जातां पांच बड्या राष्ट्रांचे प्रतिनिधि प्रमुख आळीपाळीनें अध्यक्षपदीं असावेत आणि त्यांचा क्रम अकारविल्ह्यानें ठरवावा अशी मोलोटॉव्हनीं मागणी केली.

आंतरराष्ट्रीय सभ्याचाराला दिलेली ही सरळ सरळ चपराक होती, आणि तिचा रोख युनायटेड स्टेट्स्वर होता.

मला 'Keeping up with the Joneses' या व्यंग्यचित्रमालेची

आठवण झाली. यापूर्वीं नेहमीं हार खाणारा रशिया, जपानसारख्या छोट्या राष्ट्राकडून पराभूत झालेला रशिया, आतां विजयी पक्षांत होता. विजय मिळविण्यांत साहाय्य करणारा हा रशिया आतां आपल्या अटींवर जागतिक शांतता स्थापन करण्याची धडपड करीत होता—आंतरराष्ट्रीय सभ्याचारांची मामुलीही माहिती नसलेला, ते जाणण्याची पात्रता नसलेला, अन्य देशांच्या गरजा वा इच्छा यांची तमा न बाळगणारा असा हा रशिया !

### ‘ रशियाचा नवा सिद्धांत ’

मोलोटॉव्हच्या या अनपेक्षित मागणीला पहिला विरोध मेक्सिकोचे परराष्ट्र मंत्री इझिकेल पॅडिला यांनीं केला. त्यांचें व्यक्तिमत्व असामान्य होतें आणि ते उत्कृष्ट वक्ते होते. अत्यंत अस्खलित आणि रसाळ असें त्यांचें हें भाषण झालें. असें कांहीं होईल याची त्या रशियन प्रतिनिधीला कल्पना नसावी. पॅडिला आपलें भाषण संपवून बसतात न बसतात तोंच मोलोटॉव्ह उभे राहिले आणि अत्यंत उद्धट सुरांत पॅडिलांच्या भाषणाचें वर्णन ‘ पढ-विलेली पोपटपंची ’ असें करून, त्यांचा मुद्दा गैरलागू आहे अशी घोषणा केली.

हा प्रकार केवळ अपमानाचाच होता असें नव्हे, तर मोलोटॉव्हचा आरोप धादांत खोटाही होता. मोलोटॉव्ह असा एखादा अनपेक्षित आश्चर्य-जनक मुद्दा उपस्थित करतील अशी प्रारंभीं कुणाचीच कल्पना नसल्यानें पॅडिला यांना भाषण तयार करून पाठ करण्याला अवधि मिळणेंच शक्य नव्हतें. विरोधकाला हतबल करण्यासाठीं सत्याची गळचेपी करण्याच्या तंत्राचा, मोलोटॉव्हचे उद्‍गार हा एक नमुना होता.

एकुण, रशियाचा नवा सिद्धांत हा असा होता ! प्रारंभींच जोरानें धडक मारून समोरच्या माणसाला दिङ्मूढ बनवायचें, असें हें नवें तंत्र होतें.

या प्रसंगीं मी केवळ आश्चर्यानें थक्क झालों एवढेंच नव्हे, तर स्पष्टच सांगायचें तर मी अगदीं भयचकित झालों.

या बैठकींत भाषण करण्याचा माझा इरादा नव्हता. मला बैठकींत तसें स्थान नव्हतें. कारण फिलिपीन्स हें अद्याप स्वतंत्र राष्ट्र नव्हतें. तथापि

मी इतका अस्वस्थ झालों होतों कीं, मीं बोलण्याची परवानगी मागितली. माझ्या भाषणांत मी पॅडिला यांना पाठिंबा जाहीर केला.

माझ्या भाषणाला उत्तर देण्याचे कष्ट घ्यावेसे मोलोटॉव्हला वाटलें नाहीं. ते आपल्या खुर्चीवर रेलून बसून कांहीं न बोलतां माझ्याकडे तिरस्कारानें दृष्टिक्षेप करीत होते.

ज्याच्या नुसत्या विषारी दृष्टिक्षेपानें प्राणी मृतप्राय होतात अशा त्या दंतकथेंतील भुजंगाच्या नजरेनें माझ्याकडे टक लावून मोलोटॉव्ह पहात असतां मी निमूट अंगचोरून बसलों होतों. "एकजूट आणि सुसंवाद" हे स्टेटिनिअसचे खाजगी चर्चेतील शब्द मनाशीं एकाद्या मंत्राप्रमाणें जपत होतों. कांहींही किंमत द्यावी लागली तरी त्या शांतता परिषदेंत "एकजूट आणि सुसंवाद" राखण्याची आमच्यावर जबाबदारी होती.

अर्थात्, सरशी मोलोटॉव्हची झाली. पन्नास राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं एकट्या मोलोटॉव्हपुढें पडतें घेतलें. कारण, शांतता स्थापण्याच्या इराद्यानें आम्ही सान फ्रान्सिस्कोला आलों होतों. शांततेच्या वाटाघाटींच्या नांदीच्या क्षणींच, त्या वाटाघाटींना, संभाव्य शांततेला सुरुंग लावण्याची आमची इच्छा नव्हती.

त्यानंतर असे अनेक भयचकित करणारे प्रसंग घडले. त्या दिवसापासून तों पुढील आठ वर्षें, १९४५ पासून १९५३ पर्यंत, सान फ्रान्सिस्कोला सुरुवात करून लंडन, न्यू यॉर्क, जिनीव्हा, पॅरिस या मार्गें संयुक्त राष्ट्र-संघटनेबरोबर मीं केलेला प्रवास म्हणजे जणुं भयंकर स्फोटकावरून केलेली वाटचालच होती. रशियन अस्वलाच्या डोक्याभोंवतीं भुणभुणणाऱ्या चिलटा-सारखी माझी भूमिका होती. पण ती बजावण्यावांचून सुटका नव्हती. विश्वासघात आणि दांडगाईचें वर्तन यांविरुद्ध गप्प बसणें मला अशक्य होतें. आणि मोलोटॉव्हपासून तों व्हिशिन्स्कीपर्यंत प्रत्येक रशियन प्रतिनिधीला विरोध करण्यासाठीं उभें ठाकणें मला प्राप्त झालें. प्रत्येक रशियन प्रतिनिधीची वर्तणूक थेट मोलोटॉव्ह-छाप असे. अत्यंत निर्दय, प्रामाणिक आणि सज्जन माणसाला कदापि आकलन न होणारी, सर्व विरोधकांना नेस्तनाबूद करण्याच्या हेतूनेंच प्रेरित झालेली, अशी त्यांची प्रत्येक हालचाल असे.

सान फ्रान्सिस्कोला माझा निवास सेंट फ्रान्सिस हॉटेलांत होता. रशियन प्रतिनिधि-मंडळाचें वास्तव्यही तिथेंच होतें. परिषदेच्या पूर्वतयारीसाठीं भरलेल्या शिष्टमंडळप्रमुखांच्या बैठकीच्या बहुधा दुसऱ्याच दिवशीं एका तरुणानें–रशियन शिष्टमंडळांतला तो तरुण होता–मला गांठलें. हा तरुण उत्कृष्ट इंग्लिश बोलत होता. त्यानें मला बारमध्यें पेय घेण्यासाठीं पाचारण केलें. मोलेटॉव्ह त्या हॉटेलांत एक मेजवानी देणार होते, त्या मेजवानीचें आमंत्रण मला देण्यांत आलें होतें. तें आमंत्रण मी स्वीकारणार कीं नाहीं याची माहिती त्याला हवी होती. मीं तें निमंत्रण स्वीकारावें असें त्यानें मला आग्रहपूर्वक विनविलें आणि मीं तें आमंत्रण स्वीकारलें देखील. मोलेटॉव्हला अगदीं जवळून पाहण्याची मला उत्सुकता होतीच.

फिलिपीनो लोक, बातानच्या लढाईत आम्हीं गाजविलेली मर्दुमकी, यासंबंधीं तो तरुण रशियन बोलत होता. आमच्या देशाविषयीं त्याला खूपच माहिती असल्याचें दिसलें. ‘ फिलिपीन्सचा पाडाव मीं पाहिला ’ ( I saw the fall of the Philippines ) हें माझें पुस्तकही त्यानें वाचलेलें होतें आणि त्यानें मला त्यासंबंधीं अनेक प्रश्न विचारले. त्यानें विचारलेला पहिला प्रश्न मला आठवतो : “ फिलिपीन्सच्या लढाईत अमेरिकनांनीं तुम्हांला जवळ जवळ दगा देऊन पळ काढला हें खरें काय ? ”

मी ताबडतोब उत्तरलों, “ त्यांनीं पळ काढला नाहीं. जपान्यांनीं संख्याबलानें त्यांच्यावर मात केली. ”

माझ्या पुस्तकांतील कांहीं शब्द, वाक्यें आणि परिच्छेद गाळण्यांत आलेले होते, त्यांचा त्यानें उल्लेख केला तेव्हां मीं खुलासा केला कीं, “ माझें तें पुस्तक युद्धकाळांत प्रकाशित झालें होतें. युद्धकाळांत कडक सेन्सॉरशिप असल्यानें युद्धखात्याकडून सावधगिरीच्या दृष्टीनें त्या उताऱ्यांवर काळ्या पट्ट्या छापल्या होत्या. ”

त्यावर तो कांहींशा बेफिकीरपणें म्हणाला, “ बहुधा गोऱ्या लोकांशीं पीतवर्णियांच्या झालेल्या चकमकींबद्दलचे ते उल्लेख असावेत. अमेरिकनांना साहजिकच ते प्रकार उजेडांत येणें इष्ट वाटलें नसावें. ” त्या संभाषणानें मला कांहींसें अस्वस्थ केलें. तथापि मीं त्याला सांगितलें कीं, तुझी कल्पना

चुकीची आहे. गाळलेले भाग आमच्या युद्धप्रयत्नांना पोषक ठरणारे नव्हते म्हणून गाळले आहेत. युद्धप्रयत्नांना हातभार लावण्यासाठीं मीं तें पुस्तक लिहिलें असल्यानें अशी काटछाट आवश्यकच होती.

तो तरुण बोलतांना 'आम्ही' असें म्हणत असे हें माझ्या ध्यानीं आलें. आपण कांहीं निराळी व्यक्ति आहों अशी जणुं त्याला जाणीवच नसावी. सामुदायिक मनाचे उद्‌गारच जणु तो उच्चारून दाखवीत होता. जणुं, त्याला स्वतःचीं मतें म्हणून कांहीं नव्हतींच. मला तर संशय आला कीं, आमच्या फिलिपीनो प्रतिनिधि मंडळाशीं संबंध स्थापित करण्यासाठींच त्या तरुणाची रशियन प्रतिनिधि मंडळानें नेमणूक केली असावी. अर्थात् ही गोष्ट त्यानें त्यावेळीं किंवा नंतर कधीं मान्य केली नाहींच, पण त्याच्या साऱ्या संभाषणाचा रोख मात्र तसा होता.

मी कांहीं तरी सबब सांगून त्याचा निरोप घेतला. त्याला यापुढें शक्यतों टाळायचें असा निर्धार मीं त्याच क्षणीं केला. तथापि दुर्दैवानें मी बोलतां बोलतां बोलून गेलों होतों कीं, मी सकाळीं लौकर उठतों. त्याबरोबर आपणही सकाळीं लौकरच उठणारे आहों असें त्यानें मला सांगितलें, आणि त्यानंतर जवळजवळ आठवडाभर रोज सकाळीं तो तरुण कॉफीगृहांत माझ्या आधींच येऊन बसलेला असे किंवा रेंगाळत असे, आणि कांहीं ना कांहीं निमित्त शोधून माझ्या टेबलाशीं येत असे.

## सोव्हिएटचें मुख्य सूत्र : द्वेष

आमच्या संभाषणांत वारंवार डोकावणारा सूर हळूहळू माझ्या लक्षांत आला. अमेरिकेबद्दल रशियाला वाटणारा द्वेष हें त्याचें मुख्य सूत्र होतें. संभाषणाला वळण देतांना तो तरुण नेमका वर्णभेदाच्या प्रश्नाकडे वळत असे. नीग्रो लोकांची परिस्थिति हा विषय तर त्याच्या जिभेवर सतत नाचत असे. कोणीही अमेरिकेच्या बाजूनें बोलूं लागलें कीं नीग्रोंच्या परिस्थितीचा उल्लेख करून बोलणाराचें तोंड बंद करण्याचा तो प्रयत्न करीत असे. तो म्हणे, "बिचारे! तुम्हांला त्यांच्याविषयीं अनुकंपा वाटत नाहीं का?"

आणि नंतर तो हळूंच म्हणे, "मला नाहीं वाटत कीं युनायटेड

स्टेट्स् फिलिपीन्सला खरोखरच स्वातंत्र्य देणार आहे. क्यूबांतील साखर कारखानदारांना भुलावणी देण्यासाठीं हा सारा आव आहे."

आणि मग, "खरोखर तुम्ही फिलिपीनो लोक आमच्या बाजूला असायला पाहिजे. तुम्ही आशियायी आहांत. अमेरिकेशीं तुमचा कांहीं संबंध नाहीं" या आशयाचे सूचक उद्गार तो काढीत असे. त्यानंतरच्या काळांत संयुक्त राष्ट्र संघटनेंत मला जो जो रशियन भेटला त्या त्या प्रत्येकानें माझ्या मनावर ही एकच गोष्ट ठसविण्याचा प्रयत्न केला.

एक दिवस सकाळीं बोलतां बोलतां तो तरुण अगदीं सहज बोलतों आहों अशा आविर्भावांत म्हणाला, "आर्जेटीनाला सभासद करून घ्यावें या सूचनेच्या बाजूनें मत देण्याचा ज्या अर्थीं तुमचा विचार चालला आहे, त्या अर्थीं मी असं म्हणतों कीं—"

त्याच्या शब्दांनीं मला इशाराच मिळाला. संयुक्त राष्ट्र संघटनेंत आर्जेटीनाला प्रवेश देण्याचा प्रश्न अत्यंत विवाद्य ठरला होता आणि या वादाचा फायदा घेऊन युक्रेनला सभासदत्व मिळवून देण्याचा डाव सोव्हिएट प्रतिनिधि मंडळ खेळत होतें. मीं त्याला घाईघाईनें उत्तर दिलें, "माझ्या सरकारकडून अद्याप मला त्याबाबत कांहींही आदेश आलेला नाहीं—" आणि मीं झटकन् त्याचा निरोप घेतला. यावेळीं मात्र, त्याचा ससेमिरा कायमचा चुकविण्याचा मीं निर्धार केला आणि माझी सकाळची न्याहारी मी माझ्या खोलींतच मागवूं लागलों. तो पुन्हां भेटला तेव्हां मीं त्याला सांगितलें कीं, "आम्ही भल्या पहांटेच आमच्या प्रतिनिधींची विचारविनिमयासाठीं बैठक घ्यायला सुरुवात केली आहे, तेव्हां आतां न्याहारीच्या स्थळीं न्याहारी घ्यायला मी येणार नाहीं."

तथापि आमच्या त्या वेळेपर्यंत झालेल्या संभाषणांत त्यानें जे मुद्दे उपस्थित केले होते, त्यांमुळें मला रशियाच्या अंतिम उद्दिष्टांची आगाऊ कल्पना आली एवढें मात्र खरें.

मी माझ्या सहकारी फिलिपीनो प्रतिनिधींना इशारा दिला, "त्या तरुणापासून सावध रहा. आपल्याला रशियाच्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न

करण्यासाठीं त्याची नेमणूक झाली आहे याबद्दल मला मुळींच संशय उरलेला नाहीं."

त्या रशियन तरुणाशीं उघड उघड तुटक वर्तन केल्यानंतर थोड्याच अवधींत माझें संयुक्त राष्ट्र संघटनेपुढें भाषण झालें. भाषण संपवून मी बसतों न बसतों तोंच मोलोटॉव्ह उभे राहिले. माझ्याकडे अंगुलीनिर्देश करून त्यांनीं कडवटपणें विचारलें, "फिलिपीन्सच्या प्रतिनिधीचं इथें काय काम? आणि भारताचा प्रतिनिधि इथें कां आला आहे? हे दोन्ही देश स्वतंत्र नाहींत. इथें त्यांना स्थान असतां कामा नये."

आणि त्या क्षणापासून आम्ही वैरी बनलों.

असें झालें तरी मोलोटॉव्ह आपल्या मेजवान्यांना मला पाचारण करण्यास विसरत नसे. संयुक्त राष्ट्र संघटनेंतल्या कोणाही प्रतिनिधीनें दिलेल्या मेजवान्यांपेक्षां या मेजवान्या थाटदार असत. सेंट फ्रान्सिस हॉटेलमध्यें मोलोटॉव्हनें दिलेल्या मेजवानीइतका उधळपट्टीचा देखावा इतरत्र मीं कधींच पाहिलेला नाहीं. त्या भव्य बॉलरूममध्यें परिषदेचे सारे प्रतिनिधी खच्चून भरलेले होते आणि टेबलावर अत्यंत उंची, किंमती खाद्यपदार्थ विपुल प्रमाणांत मांडलेले होते. विशेषतः माशांच्या रंगीबेरंगी अंड्यांचें बनविलेलें निशाण मला अत्यंत आकर्षक वाटलें. त्या निशाणावरील हातोड्या-कोयत्याचा आकार तांबड्या रंगाच्या अंड्यांनीं तयार केलेला होता. खरोखरच ती कृति तोंडाला पाणी सुटावें इतकी सुंदर होती.

आणि मोलोटॉव्हची वागणूक अत्यंत सभ्य आणि सज्जन यजमानाला-देखील लाजवील अशी होती. आदरातिथ्यशील, विनम्र, सभ्याचारसंपन्न अशा यजमानाप्रमाणें ते सर्वत्र हिंडून प्रत्येकाची विचारपूस करीत होते. परिषदेंतला आडमुठेपणाचा अर्क असा इसम तो हाच काय, असा प्रश्न पडावा इतकें त्यांच्या वागणुकींत महदंतर होतें.

परिषदेच्या अधिवेशनाचे दिवस संपत आले तों तों आणखी एक गोष्ट माझ्या निदर्शनास येऊं लागली. मोलोटॉव्ह प्रत्येक देशाच्या प्रतिनिधि मंडळाला आळीपाळीनें खाने देऊं लागले आणि इतर प्रतिनिधींनीं दिलेल्या मेजवान्यांना ते न चुकतां हजर राहत असत. त्याचप्रमाणें कोणत्याही

प्रतिनिधि मंडळाचा प्रमुख जेव्हां जेव्हां परिषदेंत भाषण करी तेव्हां तेव्हां त्याचें अभिनंदन करण्यासाठीं सर्वांच्या आधीं मोलोटॉव्हच पुढें होत असत.

रशियन लोक राजनीतिनिपुण नाहींत असे जे म्हणतात ते चूक करीत आहेत. सौजन्य दाखविणें कोठें परिणामकारक ठरतें आणि दरोडेखोराच्या धमकीबाजपणानें कोठें काम साधतें हें रशियनांना फार चांगलें माहीत आहे.

सान फ्रान्सिस्कोच्या या थाटदार मेजवान्यांमुळें मला युद्धाच्या बरेंच पूर्वीं क्लीव्हलंड येथें भरलेल्या एका रोटरी परिषदेची आठवण झाली. त्या परिषदेला मी हजर होतों. त्या परिषदेंत प्रत्येकजण जपानी प्रतिनिधीच्या आहारीं गेलेला दिसला. त्या जपानी प्रतिनिधीची वागणूक मोठी स्नेहशील असे, पण आपल्या उद्दिष्टाबाबत तो तितकाच खंबीर होता. त्यानें दोन मोठ्या ट्रंका भरून उत्तमोत्तम वस्तु–पंखे, किमोनो, रंगीबेरंगी सदरे–युनायटेड स्टेट्सच्या प्रतिनिधींना देणगीदाखल देण्यासाठीं आणल्या होत्या. या देणग्या त्यानें ज्या दिवशीं उदारहस्तें युनायटेड स्टेट्सच्या प्रतिनिधींना दिल्या त्याच दिवशीं रात्रीं तो माझ्या खोलींत आला, आणि माझ्याशीं झालेल्या खाजगी संभाषणांतील पहिल्याच वाक्यांत त्यानें युनायटेड स्टेट्स्‌विषयीं अत्यंत अनुदार उद्‌गार काढले.

आतां रशियन लोक हाच डाव खेळत होते. सर्वांचें लक्ष आपल्याकडे वेधून घ्यायचें, थाटदार मेजवान्यांनीं अमेरिकन प्रतिनिधींचा गौरव करायचा आणि खाजगी बोलण्यांत मात्र अमेरिकेला हीन लेखण्याची एकही संधि वायां जाऊं द्यायची नाहीं असें हें तंत्र होतें. अमेरिकेबद्दल त्यांच्या मनांत स्नेहभावाचा लेशही नाहीं ही गोष्ट, अमेरिकेविषयीं इतरांचीं मनें कलुषित करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांवरून स्पष्ट दिसत होती.

त्यांनीं अमेरिकेविरुद्ध अपमानकारक टीका करतांच मीं त्यांना उलट जबाब द्यावा असा प्रकार अनेक वेळां झाल्यावर हा गृहस्थ बधणारा नाहीं हें उमगून त्यांनीं माझा नाद सोडून दिला.

सान फ्रान्सिस्कोला रशियनांचें आगतस्वागत बादशाही स्वरूपाचें झालें. सर्व गोष्टी त्यांना दाखविण्यांत आल्या. जहाजांचे धक्के, गोद्या, निरनिराळे उद्योगधंदे सर्व कांहीं रशियनांना दाखविण्यांत आलें.

रोटरी इंटरनॅशनलचे माजी अध्यक्ष चार्लस व्हीलर आणि बँक ऑफ अमेरिकेचे एके काळचे अध्यक्ष फ्रेड स्टीव्हनॉट या माझ्या मित्रांशीं मी यासंबंधीं बोललों. मी म्हणालों, "संरक्षणाच्या दृष्टीनं महत्त्वाच्या असलेल्या जागा रशियनांना कां म्हणून दाखवितां ? त्यांच्याबद्दल तुम्हीं सावधगिरीचें धोरण ठेवलें पाहिजे. ते तुमचे कट्टर शत्रू ठरणार आहेत."

पण, त्या काळांत, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेच्या त्या दिवसांत उत्तमोत्तम मेजवान्या कुणाला दिल्या गेल्या असतील तर त्या रशियाच्या प्रतिनिधींनाच.

मी माझ्या देशाच्या प्रतिनिधींना पुनः इशारा दिला, "हे रशियन लोक शांततेच्या हेतूनें इथें आलेले नाहींत. आपली जग जिंकण्याची योजना पूर्ण करण्यासाठीं आणि त्या योजनेला पूरक अशा गोष्टी साधण्यासाठीं ते इथें आलेले आहेत. त्यांच्या या योजनेच्या आराखड्याची कल्पना तुम्हांला त्यांच्या उद्गारांमागील अर्थ शोधलात तर येईल. जपानच्या योजनेच्या धर्तीवरच ही योजना असेल."

आणि माझा कयास खरा ठरला आहे. ज्या ज्या देशावर रशियाचें आक्रमण झालें, तिथें तिथें त्यांनीं जपाननें वापरलेल्या तंत्राचाच अवलंब केलेला दिसून येतो. सोव्हिएट युनियन आणि युनायटेड स्टेट्स् यांच्या दरम्यान केव्हां ना केव्हां तेढ माजणार अशी ठाम खात्री पटूनच मीं सान फ्रान्सिस्कोचा निरोप घेतला.

रशियाविषयीं मला वाटणारी कौतुकभावना साफ नष्ट झाली होती. तिची जागा जबरदस्त कुशंकांनीं घेतलेली होती. सान फ्रान्सिस्कोला मीं जें पाहिलें आणि जें ऐकलें त्यावरून माझी खात्री पटली कीं, 'उगवत्या सूर्या'चा–जपानचा–डाव फसला,–पण रशियानें तेंच तंत्र यशस्वी करण्याचा निर्धार केला आहे; रशियाची ही योजना जागतिक स्वरूपाची आहे, अनेक आघाड्यांवरून एकसमयावच्छेदेंकरून हल्ला चढविण्याचा हा डाव आहे.

आम्हांला कल्पना येण्यापूर्वींच या हल्ल्याची सुरुवातही झाली.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेनंतर एकच वर्षानें आमचा देश स्वतंत्र

झाला. त्यानंतर मी संयुक्त राष्ट्र संघटनेंतील माझ्या कामाची तात्पुरती रजा घेऊन फिलिपीन्समध्यें परत आलों. फिलिपीन ट्रेड ॲक्टवर राष्ट्रीय सार्वमत घेण्यांत यावयाचें होतें. या कायद्याच्या बाजूनें प्रचार करण्यासाठीं राष्ट्राध्यक्ष रोक्सास यांच्या विनंतीवरून मी मायदेशीं परतलों होतों.

★ ★ ★

## प्रकरण २ रें : : रशियन राजनीतीची कार्यपद्धति कशी आहे ?

मीं सभांतून भाषणें करीत सर्व फिलिपीन्सभर प्रवास केला, त्यांत मला दिसून आलें कीं लोकांत भरपूर उत्साह होता, आत्मविश्वास होता. जिथें तिथें रोक्सासबद्दल कौतुकोद्गारच ऐकूं येत होते. पण, त्यांतूनही विसंवादी सूर कानांवर पडत असत. रोक्सास आणि त्यांचे धीरोदात्त सहकारी टीकास्त्राच्या माऱ्याखालीं काम बजावीत होते. ट्रेड ॲक्ट हा कम्युनिस्टांच्या टीकास्त्राचें लक्ष्य बनला होता; आणि आपल्या टीकेनें त्यांनीं एक चांगलीच गोष्ट घडवून आणली होती—मी मायदेशीं परत आलों होतों !

माझें आगमन होतांच कम्युनिस्टांच्या गालिप्रदानाचा वर्षाव माझ्यावरहि होऊं लागला. त्यांच्या मतें माझ्यावरचा सगळ्यांत वाईट आरोप म्हणजे मी अमेरिकनाळलेला होतों. माझ्यावर इतरही अनेक प्रकारचे आरोप केले जात होते. ज्या माणसानें, आपला देश स्वतंत्र करणें हें एकमेव ध्येय डोळ्यांपुढें ठेवून आयुष्यभर कार्य केलें, त्याच्यावर केले जाणारे कांहीं आरोप अगदींच विक्षिप्त स्वरूपाचे होते.

आतां आम्ही स्वतंत्र झालों होतों आणि ज्या मित्र राष्ट्रानें आपणहून आम्हांला स्वातंत्र्य अर्पण केलें होतें, त्याच्याविषयीं कृतज्ञ राहिल्याबद्दल माझ्यावर चिखलफेंक करण्यांत येत होती.

संयुक्त राष्ट्र संघटनेंत मीं कम्युनिस्टांविरुद्ध भाषणें केलीं होतीं. आतां खुद्द माझ्या देशांत मी प्रथमच कम्युनिस्टांशीं प्रत्यक्ष सामना देण्यासाठीं उभा ठाकलों होतों. फिलिपीन्समध्यें कम्युनिस्टांनीं इतका भक्कम पाय रोवलेला असावा, आपल्या हातीं गुप्तपणें इतकीं सूत्रें केंद्रित केलेलीं असावींत आणि या गोष्टी अत्यंत अल्पावधींत घडून आलेल्या असाव्यात, या साऱ्या घटना कल्पनेलाही अनाकलनीय होत्या.

मीं पूर्वींच सांगितलें आहे कीं, युद्धापूर्वींही, मधून मधून पृष्ठभागावर येणाऱ्या बुडबुड्याप्रमाणें, फिलिपीन्समध्यें कम्युनिस्ट तुरळकपणें डोकें वर काढतांना दिसत असत. पाम्पांगामधील कम्युनिस्ट गटानें तर एका कम्युनिस्टाला मेयरपदीं निवडून आणण्याइतकें यश संपादिलें होतें. या कम्युनिस्ट मेयरचें शिक्षण युनायटेड स्टेट्स्‌मध्यें झालें होतें व तो कांहीं दिवस शिकागोच्या पोस्ट कचेरींत नोकरीला होता.

### “ विद्रोहाचे जनक ”

त्यावेळीं ही चळवळ पाम्पांगामध्यें सुरू झाली आणि त्या भागापुरतीच मर्यादित होती ही महत्त्वाची वस्तुस्थिति आपण डोळ्यांआड करतां कामा नये. या प्रांतांत मोठमोठ्या जमीनदाऱ्या होत्या. हे ऐतखाऊ श्रीमंत जमीनदार शेतकऱ्यांना अतिशय पिळून काढीत असत. शेतकरी सदासर्वदा या जमीनदाराच्या कर्जांत गळ्यापर्यंत बुडालेला असे. बापजाद्यांपासून चालत आलेलें कर्ज त्यानें कितीही फेडलें तरी भरमसाट व्याजामुळें वाढतच राही आणि त्या कर्जांचा वारसा बापाकडून मुलाकडे, मुलाकडून त्याच्या मुलाकडे असा पिढ्यान् पिढ्या चालूंच राही. पिढ्यान् पिढ्या हा शेतकरी वर्ग गुलाम बनला होता.

या चळवळीच्या संस्थापकांचा मुख्य नेता पेद्रो अबाद सान्तोस हा होता. तो पक्का समाजवादी होता.

युद्धाला तोंड फुटल्यावर या चळवळ्या लोकांनीं आपल्या गनिमी टोळ्या तयार केल्या आणि जपानविरुद्ध शौर्यानें प्रदीर्घकाळ त्यांनीं लढा दिला. युद्ध चालू असतांनाच पेद्रो अबाद सान्तोस हा मरण पावला.



... संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 20768 दि. ...
क्रमांक ...... नों: दि: ...

युद्धसमाप्तीनंतर या चळवळ्या लोकांत नवेच पुढारी उदयाला आले. त्यांपैकीं एक प्रमुख म्हणजे कामगार नेता क्रिसान्तो इव्हान्जेलिस्ता हा होय. याचा व्यवसाय छपाईचा होता आणि फिलिपीन्समधील मुद्रण व्यवसायांतील कामगारांचा संघ त्यानें संघटित केला होता. तो मॉस्कोची वारी करून आलेला होता आणि तिथेंच कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानाचे आणि आचार-धर्मांचे घडे त्यानें गिरविले होते. दुसरा कम्युनिस्ट नेता म्हणजे ज्वलज्हाल लुई तारुक. आतां तो 'साहित्यचर्चे'च्या बैठका भरविणारा विद्यार्थी राहिलेला नव्हता.

युद्धसमाप्तीनंतर लगेच झालेल्या निवडणुकांत लुई तारुकनें हातोड्या कोयत्याच्या निशाणाखालीं राजकीय क्षेत्रांत पदार्पण केलें. आमच्या पार्लमेंटच्या कनिष्ठ सभागृहांत निवडून आलेला तो एकमेव कम्युनिस्ट उमेदवार होता.

मॅन्युएल एल्. क्वीझॉन हे फिलिपीन कॉमनवेल्थचे अध्यक्ष असतांनाच कम्युनिझमची चळवळ बेकायदा ठरविण्यांत आलेली होती. कम्युनिझमला असलेल्या या बंदीचा फायदा घेऊन सभागृहानें तारुकचें सभासदत्व रद्द करणारा ठराव केला. लोकसभेंतून अशा रीतीनें हकालपट्टी झाल्यावर तारुकनें उघडपणें चळवळ करण्याचा प्रयत्न केला नाहीं. त्यानें मनीलाला रामराम ठोकला आणि डोंगराळ मुलुखाचा आसरा घेतला. तेथें तो गनिमी टोळ्यांत सामील झाला. या गनिमी टोळ्यांनीं फार दिवसांपासून त्या भागांत अराजक माजविलें होतें. तारुकनें स्वतःवर लादून घेतलेल्या त्या भूमिगत जीवनांत त्याचा विद्यार्थीदशेंतील गुरु डॉ. व्हिन्सेन्टी लावा हा त्याला जाऊन मिळाला.

आतां या नेत्यांनीं गनिमी टोळ्यांची संघटना फिलिपीन्सची लालसेना म्हणून करायला सुरुवात केली. ही संघटना म्हणजेच हुक्स्–संघटना होय. विनाशांतून डोकें वर काढण्याचा प्रयत्न करीत असलेल्या आमच्या राष्ट्राची सत्ता काबीज करण्याच्या योजना आंखण्यास या लाल नेत्यांनीं जोरानें सुरुवात केली.

त्यांच्या त्या योजनेचें स्वरूप आणि व्याप्ति तोंवेळपर्यंत स्पष्ट झालेली नव्हती. उपद्रवाचे प्रकार चालू असल्याचें तेवढें आम्हांला दिसत होतें.

तुरळक उठावाचे, धाकदडपशाहीचे प्रकार चालू असत. शिवराळ प्रचाराची राळही खूप उडविली जात होती. धमक्याही दिल्या जात होत्या. ट्रेड ॲक्टला पाठिंबा मिळविण्याच्या मोहिमेला जसजसा जोर चढत चालला, आणि आगामी सार्वमतांत विजयाचा कांटा आमच्या बाजूला झुकण्याची शक्यता जसजशी वाढत चालली तसतशा त्यांच्या धमक्याही वाढत गेल्या.

## बॉम्बकटाची कहाणी

ज्या दिवशीं सार्वमत घेतलें जाणार होतें त्याच्या आदल्या रात्रीं मनीलाच्या मिरांडा चौकांत एक प्रचंड जाहीर सभा भरली होती. ट्रेड ॲक्टचा पुरस्कार करणाऱ्या दोघा वक्त्यांचीं-राष्ट्राध्यक्ष रोक्सास यांचें आणि माझें-भाषणें ऐकण्यासाठीं एक लाख तरी समुदाय जमलेला असावा. आधीं माझें भाषण झालें. त्यानंतर रोक्सास बोलले. आपलें भाषण संपवून ते बसतात न बसतात आणि मी त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं त्यांचा हात हातीं घेतों न घेतों तोंच व्यासपीठावर बॉंबचा स्फोट झाला. आमचें छायाचित्र घेण्यासाठीं समोर उभ्या असलेल्या फोटोग्राफरचा त्या बॉंबला बळी पडला. बिचारा ! त्याच्या बलिदानानें आम्हांला जीवदान मिळालें. त्याच्यापासून चार फुटांवर उभा असलेला आणखी एक इसम ठार झाला.

आणि त्या गोंधळांत एक इसम जमावांतून मार्ग काढून पळत जातांना आम्हांला दिसला. पोलिसांनीं त्याला ताबडतोब अटक केली. त्याचें नांव ग्विलेन असून तो धंद्यानें नापित होता. तो कम्युनिस्ट असल्याचें कळलें. व्यासपीठासमोरच्या पहिल्याच रांगेंत तो बसला होता आणि तिथूनच त्यानें तो बॉंब फेंकला होता.

या घटनेंतून रोक्सासचे प्राण बचावले हीच गोष्ट त्या क्षणीं आमच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची होती.

दुसऱ्या दिवशीं पहांटे पांच वाजतां मनीला हॉटेलांतील माझ्या खोलीचा दरवाजा ठोठावला गेला. एक स्त्री रडत उभी होती. मीं तिला ओळखलें. आमादो व्ही. हेर्नान्देजची ती पत्नी होती. हेर्नान्देज हा एक बुद्धिमान तरुण कवि, लेखक आणि फर्डा वक्ता होता. युद्धपूर्व काळांत तो तगालोग

भाषेंतील ‘ मात्रुहाय ’ नांवाचें नियतकालिक संपादीत असे. कम्युनिस्टांच्या साहित्यविषयक बैठकांना तो नियमानें उपस्थित रहात असे आणि अशा बैठका त्यानें कितीदां स्वतःच्या घरींही भरविल्या होत्या.

मी या तरुण लेखकाचा मोठा चाहता होतों आणि त्याच्यावर माझा दृढ विश्वास होता. युद्धानंतर माझें स्वतःचें वृत्तपत्र नव्हतें, त्यामुळें मी त्याला वृत्तपत्रांत काम देऊं शकत नव्हतों. फिलिपीन्समधील अमेरिकन सैन्यांतील प्रसिद्धिखात्यांतील एका जागेसाठीं मीं त्याची शिफारस करावी अशी त्यानें विनंति केली. मीं मोठ्या आनंदानें तशी शिफारस केली. सैन्याच्या प्रसिद्धि-खात्यांत तगालोग भाषेंत भाषांतरें करण्याच्या कामावर त्याची नेमणूकही झाली. नंतर मी अमेरिकेंत असतांना मला जें कळलें त्यामुळें मी आश्चर्य-चकितच झालों. तो तरुण म्हणे आतां सैन्यांत नोकरीवरच नव्हता. मनीलाच्या नगरपालिकेच्या निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून तो उभा राहिला होता म्हणे.

आणि मीं त्याचीं भाषणें कधीं ऐकलीं आहेत काय असें लोक मला विचारूं लागले. लोक सांगूं लागले, “ त्याचीं भाषणें अतिशय विध्वंसक असतात. तो नक्कीच कम्युनिस्ट असला पाहिजे. ”

क्रेमलिनच्या प्रचाराला आमादो हेर्नान्देज कधींकाळीं बळी पडेल अशी मला सुतराम् कल्पना नव्हती. ज्यानें ज्यानें माझ्यापाशीं त्याचा विषय काढला त्याला त्याला मीं तसें बोलून दाखविलें. अशा रीतीनें गेलें एक वर्षभर, दूर अमेरिकेंत माझ्या कामावर असतांना मी त्या तरुणाचें समर्थन करीत आलों होतों.

आणि आज त्याची बायको माझ्या दाराशीं रडत उभी होती. कालच्या सभेंत बॉंब फेकल्याबद्दल ज्या ग्विलेन नांवाच्या नापिताला अटक झाली होती त्यानें, आपण तो बॉंब आमादो हेर्नान्देजच्या प्रेरणेनें टाकला असा कबुली-जबाब दिला होता.

त्या स्त्रीनें रडत रडत मला सांगितलें कीं, आपल्या नवऱ्यालाही अटक झाली असून फिस्कालनें ( डिस्ट्रिक्ट ॲटर्नी ) दोघाही इसमांना जामिनावर सोडण्यास नकार दिला आहे. आपला नवरा निरपराध आहे असा तिचा

विश्वास होता आणि तिनें माझीही तशी खात्री पटवून दिली. शिवाय पूर्वी तो माझ्या हाताखालीं काम करीत होता, माझा सहकारी होता आणि गेलीं कित्येक वर्षें माझा त्याच्यावर दृढ विश्वास होता.

म्हणून मीं फिस्कालला फोन केला. इतक्या पहांटे झोपमोड केल्याबद्दल तो जरासा नाराजच झाला; आणि मी जेव्हां माझें काम त्याला सांगितलें तेव्हां तर तो अगदींच नाखुष झालासा वाटला. खरें म्हणजे तो चकितच झाला होता.

त्यानें विचारलें, "जनरल, तो इसम कम्युनिस्ट आहे हें तुम्हांला माहीत नाहीं का ?"

मला तशी कांहीं माहिती नाहीं असें सांगून मी त्याला म्हणालों, "मी नुकताच अमेरिकेंतून आलों आहें. तिथें, कोणत्याही माणसावर आरोप शाबीत होईपर्यंत त्याला निरपराध मानलें जातें आणि त्याच परंपरेचें शिक्षण आपल्यालाही मिळालेलें आहे. हेर्नान्देज हा निरपराध आहे असा माझा समज आहे. तेव्हां त्याला जामिनावर सोडण्याची व्यवस्था आपण कराल अशी मी आशा करतों."

हेर्नान्देजची सुटका करण्यांत आली. ग्विलेन मात्र तुरुंगांतच होता. खटला उभा राहिला. हेर्नान्देज दोषमुक्त ठरला. मॉस्कोच्या ध्येयवादाचा बळी ग्विलेन मात्र दोषी ठरून त्याला फांशीची शिक्षा झाली.

हेर्नान्देजचा आणि माझा पुनः एकदां त्यानंतर संबंध आला, ती हकीकत नंतर सांगेन.

मध्यंतरींच्या काळांत, सार्वमत घेतलें जाऊन त्याचा निर्णयही लागला. राष्ट्रानें प्रचंड बहुमतानें ट्रेड ॲक्टला मान्यता दिली होती.

### फिलिपीन्सची युद्धोत्तर प्रगति

फिलिपीन्समध्यें मिळालेल्या यशानें संतुष्ट होऊन, माझ्या प्रचाराला आलेल्या यशाबद्दल आनंदित होऊन आणि रोक्सासना जीवदान मिळालें याबद्दल परमेश्वराचे आभार मानून मी पुनः संयुक्त राष्ट्र संघटनेंतील माझ्या कामगिरीसाठीं अमेरिकेंत परत गेलों. युद्धोत्तर काळांतील सर्व प्रकारच्या

अडचणींना तोंड देऊन रोक्सासनीं राष्ट्राचें नेतृत्व छान बजावलें होतें. सरकारी खात्यांचा कारभार त्यांनीं सुरळीत चालू केला होता. न्यायालयें पुनः नीट कामकाज करूं लागलीं होतीं. जपान्यांनीं अखेर अखेर बेफाम बॉंबफेक करून नासधूस केलेल्या भागांतील पुनर्रचनेचें कार्य, रस्ते पुनः बांधण्याचें कार्यही त्यांनीं हातीं घेतलें होतें. पण या सर्वांपेक्षांही त्यांची एक कामगिरी अधिक महत्त्वाची होती. युद्धकाळांत जपान्यांना सामील झालेले लोक आणि अमेरिकेच्या पक्षाचे लोक अशी जनतेंत जी फूट पडली होती ती नष्ट करून जनतेचें ऐक्य प्रस्थापित करण्याचें महान् कार्यही त्यांनीं साधलें होतें. रोक्सासनीं केलेल्या असंख्य बिकट आणि किचकट कार्यांत हें कार्य अत्यंत बिकट होतें. कारण कटुता आणि संशय यांचा निरास करून ही कामगिरी साधावयाची होती.

न्यू यॉर्क येथें संयुक्त राष्ट्र संघटनेंतील फिलिपीन्सचा कायम प्रतिनिधि म्हणून असतांना मला एक गोड कामगिरी नेहमीं करावी लागे. ती म्हणजे फिलिपीन्समधून आलेल्या पाहुण्यांचें आदरातिथ्य करणें. एक दिवस माझ्या कचेरींत आलेला एक पाहुणा बघून मला आश्चर्य वाटलें. हा पाहुणा म्हणजे हेर्नान्देज होय! आतांचा त्याचा अवतार निराळा होता—तो आतां कामगार पुढारी बनला होता! अमेरिकेंतील कामगारांच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठीं आपल्याला पाठविण्यांत आलें असून आपल्या या दौऱ्याचा खर्च फिलिपीन्समधील कामगार संघांकडून भागविला जात आहे असें त्यानें मला सांगितलें.

मनीला ते अमेरिका हा त्याचा प्रवास मोठा खळबळीचा झाला होता. त्याच्याबद्दल अमेरिकन गुप्त हेर खात्याकडे कांहीं तरी माहिती असावी हृ उघड होतें. कारण, होनोलुलूमध्यें इमिग्रेशन अधिकाऱ्यांनीं त्याला जाबजबाब घेण्यासाठीं अडकवून ठेवलें होतें. तिथून सुटका झाल्याबरोबर त्यानें पत्रकारांना एक मुलाखत दिली; आणि त्या मुलाखतींत त्यानें जीं विधानें केलीं तीं धक्का देणारीं होतीं. जगांतील वृत्तपत्रांत मोठमोठीं खळबळजनक शीर्षकें देऊन त्याची ही मुलाखत प्रसिद्ध करण्यांत आली होती. अमेरिकन इमिग्रेशन अधिकाऱ्यांनीं आपल्याला, आपण फिलिपीनो नागरिक आहों

म्हणून वाईट रीतीनें वागविलें, अपमानकारक वागणूक दिली असा आरोप त्यानें केला होता. अमेरिकेंत स्वातंत्र्य नाहीं असेंही विधान त्यानें केलें होतें.

झालेल्या प्रकाराबद्दल मीं खेद व्यक्त केला, पण त्याचें कारण मात्र मला उमजूं शकलें नाहीं. आणि हेर्नान्देज हा सान फ्रान्सिस्कोला हॅरी ब्रिजेसला भेटायला गेला होता, हेंही मला पुढें कळलें. हॅरी ब्रिजेस हा कामगार पुढारी असून कम्युनिस्टांशीं संबंध असल्याचा त्याच्यावर दीर्घकालपासून आरोप होता.

माझ्या मायदेशांतून आलेल्या इतर कोणत्याही पाहुण्याचें केलें असतें तसें मीं हेर्नान्देजचें आतिथ्य केलें. त्याला संयुक्त राष्ट्र संघटनेच्या बैठकांना घेऊन गेलों. त्याच्याबरोबर स्वतःचा फोटोही मीं काढूं दिला आणि त्याच्या त्या भेटीचें स्मृतिचिन्ह म्हणून त्या फोटोवर मीं स्वतःची स्वाक्षरीही केली.

त्यानंतर हेर्नान्देज न्यूयॉर्क सोडून गेलाच नाहीं.

पुढें मला असें दिसून आलें कीं, जिथें जावें तिथें हेर्नान्देज आपला हजर! फिलिपीनो प्रतिनिधि-मंडळांत एक तरुण हंगामी सभासद होता. त्याच्याबरोबर हेर्नान्देज नेहमीं दिसायचा. अगदीं सांवलीसारखा! मनीला विद्यापीठांतील अनेक विद्यार्थ्यांतून मीं या तरुणाची निवड केली होती. कारण, नेतृत्वाला आवश्यक असे सुप्तगुण त्याच्यांत असल्याचें मला आढळून आलें होतें. तो बुद्धिमान होता. त्याचे विचार उदारमतवादी होते आणि त्याचें व्यक्तित्व आकर्षक होतें. आमच्या देशांतील अत्यंत तेजस्वी तरुणांपैकीं तो एक होता. आमच्या देशाच्या सेवेंत तो उत्कृष्ट कामगिरी बजावील असा विश्वास वाटावा असें त्याचें व्यक्तिमत्व होतें; आणि म्हणूनच, या तरुणाला पुढें आणण्याच्या कामीं माझ्याकडून होईल तितकी मदत करण्याचें मीं ठरविलें होतें.

त्या तरुणाचें नांव रॉबेर्टो होतें, असें आपण धरून चालूं या.

रॉबेर्टो आणि हेर्नान्देज यांची न्यूयॉर्कमध्येंच प्रथम भेट झाली, पूर्वी ते अनोळखी असावेत असें निदान वरवर तरी दिसलें. ते दोघेही एकाच हॉटेलांत राहातात असें कळलें. तेव्हां मी धरून चाललों कीं, परक्या देशांत आलेले दोन परस्थ या नात्यानें त्यांचा स्नेह जुळावा ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे.

चार मुलांचा बाप असलेल्या माणसाला, आपल्याला तरुणांचें मन कळतें असा समज करून घेणें आवडतें. रॉबेर्टो आमच्या कायम नोकरवर्गातला नसल्यामुळें मधून मधून तो आपल्या हंगामी कामगिरीसाठीं माझ्याकडे येत असे. त्या त्या प्रत्येक वेळीं त्याच्या हातीं 'डेली वर्कर' चा अंक असल्याचें मला दिसून आलें. तथापि मी मनाशीं म्हणालों कीं, कम्युनिस्टांचे मुद्दे खोडून काढण्यासाठीं आधीं त्यांच्या लिखाणाचें वाचन करणें आवश्यकच आहे. तो कित्येकदां धर्मविरोधी उद्‌गार काढायचा, तेव्हां मी मनांत म्हणे कीं, तरुण माणसें अशीं कित्येकदां नास्तिक विचाराचीं असतातच.

[ अ‍ॅल्गर हिस हाही असाच तरुण होता. असाच भिडस्त होता. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेच्या काळांत मीं त्याला विशेष महत्त्वाचा चळवळ्या असें कधींच मानलें नाहीं. सान फ्रान्सिस्को परिषदेच्या काळांत त्यानें सहज लक्ष वेधावें अशी कांहीं भूमिका बजावल्याचें मला आठवत नाहीं. ]

जसजसे दिवस गेले, तसतसा मी रॉबेर्टोवर आणखी आणखी जबाबदाऱ्या टाकीत गेलों. या जबाबदाऱ्या निमसरकारी स्वरूपाच्या असत. रॉबेर्टो माझा एक विश्वासू दूत बनला होता. संयुक्त राष्ट्र संघटनेंत कामाची धमाल असते, जीवन धांवपळीचें असतें. एकाच वेळीं सहा सहा समित्यांच्या बैठका चालू असतात. या सर्वच बैठकांना एकट्या माणसाला हजर राहणें शक्य नसतें. म्हणून मीं आमच्या प्रतिनिधि-मंडळांतील सभासदांना, मतदान कसें करायचें यासंबंधीं सूचना देऊन, या बैठकींना हजर राहाण्यासाठीं पाठवीत असें आणि कामाचें स्वरूप झटकन् आकलन करण्याइतका चलाख असलेला रॉबेर्टो माझ्या सूचना सभासदांना कळविण्याच्या बाबतींत माझा निरोप्या बनला होता.

या बाबतींत कित्येकदां मला न आवडणारे प्रकार घडत; पण तो त्यां-संबंधीं नेहमीं समाधानकारक खुलासा करीत असे. एक दिवस त्यानें मला आपण एका वादविषय होऊं शकेल अशा राजकीय बैठकीला हजर राहणार असल्याचें सांगितलें. कोणत्याही राजनैतिक मंडळाच्या सदस्यांनीं वा त्या मंडळाशीं संबंध असलेल्या लोकांनीं दुसऱ्या देशाच्या राजकीय पक्षाच्या बैठकांना हजर राहूं नये अशी अपेक्षा असते, असें मीं त्याला सांगितलें.

माझें म्हणणें त्याला पटलेलें दिसलें. पण नंतर मला कळलें कीं तो त्या बैठकीला हजर होता.

तरी देखील मी मनाशीं म्हणालों, "जाऊं दे. तरुण रक्त आहे!"

जसजशी गरज पडली तसतशा मीं त्याच्यावर अधिकाधिक जबाबदाऱ्या सोंपविल्या.

त्यानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या बैठका युरोपांत भरूं लागल्या. रोम, जिनीव्हा, लंडन, पॅरिस इत्यादि ठिकाणच्या या बैठकांच्या वेळीं रॉबेर्टोंची मदत अत्यावश्यक ठरूं लागली; आणि पॅरिसच्या बैठकीच्या वेळीं परिषदेच्या परिसरांत वावरतांना मला कोण दिसावा?—तर हेर्नान्देज! युनायटेड स्टेट्स्-मधील कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्याच्या कामगिरीवर आपण आहों याचा जणु त्याला विसर पडला होता. इथें संयुक्त राष्ट्र संघटनेच्या बैठकांना तो अनाहूत पाहुणा म्हणून हजर राहत असे आणि रॉबेर्टो जिथें राहात असे त्याच हॉटेलांत त्याचा मुक्काम होता. जिथें जावें तिथें हे दोघे नेहमीं जोडीनें फिरतांना दिसत.

## लालतंत्राचा नमुना

पॅरिसच्या बैठकीच्या वेळीं एक प्रकरण उपस्थित झालें. चेकोस्लोव्हाकियाचा नागरिक यान पापानेक याच्यावर त्याच्या देशांतील कम्युनिस्टांची गैरमर्जी झाली होती. आणि त्यानें युनायटेड स्टेट्स्मध्यें आसरा घेतला होता. हा पापानेक संघटनेच्या कारभारमंडळाच्या निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून उभा होता. या मंडळावर त्यानें यापूर्वी काम केलें होतें. माझी त्याची चांगलीच जानपछान होती. त्याच्या कार्यक्षमतेबद्दल मला आदर होता. पापानेक यालाच मत देण्याचें मीं ठरविलें आणि त्याप्रमाणें, ज्या कमिटींत हें मतदान व्हावयाचें होतें तिच्या बैठकीला हजर राहाणाऱ्या आमच्या प्रतिनिधीला 'पापानेकच्या बाजूनें मत दे' अशी सूचना मीं रॉबेर्टोमार्फत पाठविली.

या घटनेनंतर कांहीं दिवसांनीं आम्ही कांहीं प्रतिनिधि सभागृहाबाहेर गप्पागोष्टी करीत असतां मी म्हणालों, "पापानेक निवडून आला नाहीं याचं मला फार वाईट वाटतं."

त्यावर कोणी तरी कडवटपणानें उद्गारलें, "तुम्हांला कां वाईट वाटावं? तुम्हीं तर त्याला मत दिलं नाहींत!"

मी सात्त्विक रागानें म्हणालों, "असं कसं? मीं पापानेकलाच मत दिलं आहे. तशा स्पष्ट सूचना दिलेल्या होत्या मीं."

या प्रकरणाबाबत मीं रॉबेर्टोला झाडलें तेव्हां तो शांतपणें म्हणाला, "तुमच्या सूचनेचा कांहीं तरी गैर अर्थ करून घेतला मीं असं दिसतं."

त्याचा गैरसमज झाला असणें शक्य नव्हतें, हें मला आज कळतें आहे. आणखीही पुष्कळ गोष्टी आज मी जाणतों. पण त्यावेळीं मात्र, सोव्हिएटच्या अवकृपेला पात्र झालेल्या एका चांगल्या माणसाचा–पापानेकचा–माझ्याकडून न कळत का होईना विश्वासघात झाला याबद्दल मला अत्यंत खेद झाला होता.

ही गोष्ट मला जास्तच अस्वस्थ करणारी होती. कारण, कम्युनिस्ट प्रतिनिधींचा मुख्य विरोधक अशी भूमिका संयुक्त राष्ट्र संघटनेंत माझ्याकडे आलेली होती. पण पापानेक प्रकरणीं माझ्याकडून कम्युनिस्टांना अनुकूल असें वर्तन न कळत का होईना झालें होतें. आणि मी याबाबत अधिक स्पष्टपणें सूचना द्यायला हव्या होत्या असें मला वाटूं लागलें. माझें मन मला खाऊं लागलें आणि मी माझ्याच मूर्खपणाला दोष देऊं लागलों. पण रॉबेर्टोला दोष देण्याची बुद्धि कांहीं मला झाली नाहीं. कोणतेंही काम करण्याला नेहमीं तत्पर, बुद्धिमान् अशा त्या तरुणाची कांहीं चूक असेल असें त्यावेळीं मला वाटलें नाहीं.

कांहीं दिवसांनीं रॉबेर्टोनें मनीलाला परत जायचें ठरविलें. मीं मोठ्या आनंदानें त्याला तिथें एक जबाबदारीची नोकरी मिळवून देण्याला मदत केली. त्यानें माझा निरोप घेतला तेव्हां त्याच्या निष्ठेवरील, विश्वासूपणावरील माझा विश्वास कायम होता. तो लौकरच नांवारूपाला येईल अशी खात्री मला वाटत होती. त्याच्याबरोबर त्याचा सांगाती हेर्नान्देज हाही मनीलाला परत गेला.

मी हेर्नान्देजबद्दल आतां अधिक लिहिणार नाहीं; फिलिपीन्समधील घटनांबद्दलच्या माझ्या सिंहावलोकनांत त्याचा पुन्हां उल्लेख करण्याचें कारण पडणार नाहीं. इथें त्याच्याबद्दल अधिक कांहीं सांगायचें झालें तर तें इतकेंच

कीं तो सध्यां राजद्रोहाच्या आरोपावरून झालेली शिक्षा भोगीत आहे. मला इथें विशेषतः हें दाखवून द्यावयाचें आहे कीं, त्यावेळीं किरकोळ आणि बिनमहत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी, एकेक तुकडा चतुरपणें जुळवून एकदम कांहीं तरी मोठा डोलारा डोळयांपुढें उभा केला जावा, त्याप्रमाणें घडत होत्या. आमच्या डोळयांपुढें, अगदीं देखत देखत फिलीपीन्समध्यें मॉस्कोचें कारस्थान कुशलपणें, बिनचूकपणें रचलें जात होतें; आणि तें सगळें पुरें झालें तेव्हां एकदम आमच्यापुढें उभें राहिलें.

कांहीं असो, या भयंकर कारस्थानांत, इतक्या तरुण, मनमिळाऊ रॉबेर्टोचें कांहीं स्थान असेल असा कधीं संशयही आम्हांला आला नाहीं. मनीलामधून येणाऱ्या सर्व बातम्यांवरून, तो तेथें आपलें काम उत्तम प्रकारें करीत होता असाच सूर निघत होता.

माझ्या स्वतःच्या देशांत कसलें कारस्थान शिजत आहे यासंबंधांत मी अज्ञानांत होतों, त्याच काळांत इकडे संयुक्त राष्ट्र संघटनेंत मात्र रशियाच्या डांवपेंचांची मला अगदीं सुस्पष्ट कल्पना आली होती. १९४८ सालीं जिनीव्हा येथें संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विद्यमानें भरलेल्या वृत्तस्वातंत्र्य परिषदेंत सोव्हिएट मुत्सद्यांचें खरें स्वरूप उघड झालें. सोव्हिएट प्रकृतीचे नवे आणि आश्चर्यजनक पैलू त्यावेळीं आमच्या दृष्टीस पडले.

या बैठकीच्या वेळीं, केवळ त्या परिषदेलाच नव्हे तर अखिल जगाला रशियानें आपल्या खऱ्या स्वरूपाची जाणीव करून दिली.

## जिनीव्हा : रशियानें बदललेला पवित्रा

संयुक्त राष्ट्र संघटनेंत रशियन मुत्सद्यांचें वर्तन तुसड्या रानवट माणसां-सारखें दिसे, पण जिनीव्हाला त्यांत एकदम बदल झालेला दिसला. आपण सुसंस्कृत मुत्सद्देगिरींत मुरलेले आहोंत असें त्यांनीं इथें दाखवलें. या परिषदेला चौसष्ट राष्ट्रांचे प्रतिनिधि हजर होते. अल्बेनिया, ऑस्ट्रिया, स्वित्सर्लंड इत्यादि संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य नसलेलीं राष्ट्रेंही या परिषदेंत भाग घेत होतीं. ही इतकी मोठी परिषद असूनही, एकमतानें निर्णय घेण्याच्या कामीं या परिषदेंतच प्रथम आम्हांला यश आलें होतें. आणि त्याचें

विस्मयजनक कारण हें कीं, नेहमीं 'नाहीं!' हा शब्द उच्चारणाऱ्या रशियनांच्या तोंडून या परिषदेंत एकदांही तो शब्द बाहेर पडला नाहीं. मला वाटतें, रशिया नेहमींच विरोधी भूमिका घेतों असें नाहीं, तडजोडीची, जुळवून घेण्याची समजूतदार वृत्तिही रशियापाशीं आहे असें जगाला दाखवून देण्याचा चंग बांधूनच रशियाचे प्रतिनिधि–प्रमुख अलेक्झांडर बोगॉमोलॉव्ह आणि त्यांचे सहकारी या परिषदेला उपस्थित राहिले असावेत.

तथापि ही तडजोड–वृत्ति, हा समजूतदारपणा, परराष्ट्रीय धोरणाच्या दृष्टीनें बिनमहत्त्वाच्या गोष्टींपुरताच राखून ठेवलेला होता हें लौकरच स्पष्ट झालें. ज्या ज्या गोष्टींशीं युनायटेड स्टेट्स्‌चा संबंध येत होता त्या त्या गोष्टींबाबत रशियाचा आडमुठेपणा कायमच होता असेंच अखेर दिसून आलें. सौजन्याच्या आवरणाखालीं आपला कठोर भक्कम उद्देश त्यांनीं दडविला होता एवढेंच. बोगॉमोलॉव्ह यांना जादुगाराचें सारें लाघव अवगत होतें. बचावाच्या वकिलाचें आणि राजनीतिनिपुण मुत्सद्याचें सारें तंत्र अवगत होतें. अत्यंत महत्त्वाचे प्रश्न किरकोळ भासविणें आणि किरकोळ प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत असा आभास निर्माण करणें या कलेंत ते निपुण होते. सभागृहाबाहेरील मंडपांत, उपाहारगृहांत आणि पानगृहांत रशियन मुत्सद्दी मनमोकळेपणा आणि स्नेहभाव यांचें चांगलेंच प्रदर्शन करीत. पण खुद्द सभागृहांत मात्र, एकादा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला कीं, त्यांचा माथेफिरूपणा उसळून येई. इशारा देतांच हवे त्या प्रकारचे मुखवटे चढविणाऱ्या रंगभूमीवरील पात्रांप्रमाणें त्यांचें वर्तन दिसे.

बोगॉमोलॉव्हला जिनीव्हा परिषदेच्या वेळीं सामाजिकदृष्ट्या व अन्यप्रकारें जें यश मिळालें त्याचें पुष्कळसें श्रेय त्याच्या बायकोला द्यायला पाहिजे. ही सुंदर स्त्री इंग्रजी भाषा चांगली बोलत असे. पतीची चिटणीस आणि दुभाषी या भूमिका ती बजावीत होती. आणि यजमानिणीची भूमिकाही ती उत्कृष्टपणें पार पाडीत असे. ती जितकी सुंदर तितकीच बुद्धिमानही होती. शिवाय, ती सिव्हिल इंजिनिअरही होती! जिनीव्हाची परिषद संपेतों तिनें रशियासाठीं किती तरी मित्र जोडले होते.

## ‘ स्नेहभाव ’ हें एक शस्त्रच !

सारांश, संयुक्त राष्ट्र संघटनेंत रशियन प्रतिनिधींचा उद्धटपणा, तुटक वर्तन यामुळें त्यांच्याविषयीं आम्हांला तिटकारा वाटूं लागला होता, तर इथें जिनीव्हाला त्यांनीं आम्हांला स्नेहपूर्ण वर्तणुकीनें थक्क केलें होतें. या ठिकाणीं ते जिव्हाळ्यानें, सौजन्यानें बोलत वागत होते, मित्र जोडीत होते. त्यामुळें इतर देशांचे प्रतिनिधि बोलूं लागले होते, “ कांहीं म्हणा, रशियन लोक कांहीं तसे वाईट नाहींत. एकदां त्यांची आपली ओळख नीट झाली कीं मग त्यांचा हटवादीपणा मुळींच उरत नाहीं. ”

पण, सान फ्रान्सिस्कोच्या बैठकीच्या वेळीं माझ्या मनांत निर्माण झालेले संशय इतके सहजासहजीं विरून जाणारे नव्हते. या झटपट रंगारी पद्धतीनें राष्ट्रीय वागणूक बदलण्याच्या कसबाला भाळणारा मी नव्हतों. नात्सी जर्मनीचें अंतःकरण बदललें आहे का ? जपानची पूर्वापार वृत्ति बदलली आहे का ?

म्हणून, जिनीव्हाला रशियन मुत्सद्दी सदासर्वदा हंसतमुख, सौजन्यशील, खेळीमेळीनें हस्तांदोलन करणारे दिसत असले तरी, रशियाचें हें खरेंच नवें स्वरूप आहे का ? या वरवरच्या अघळपघळपणावर विश्वास ठेवणें शक्य आहे का ? असे प्रश्न मी स्वतःला विचारी.

झोंपेव्यतिरिक्त दिवसाचा प्रत्येक क्षण रशियन लोक मित्र जोडण्याच्या खटाटोपांत खर्ची घालीत होते. जसजसे दिवस चालले तसतसें माझ्या लक्षांत आलें कीं, ते केवळ आपल्या बाजूला मित्र जोडण्याचा प्रयत्न करीत होते असें नाहीं, तर पाश्चात्य राष्ट्रांच्या दोस्तांना फोडून आपल्या बाजूला वळवून घेत होते. खेळीमेळीच्या आणि ख्यालीखुशालीच्या वृत्तीच्या आवरणाखालीं त्यांनीं आपली ‘ शांतता-मोहीम ’ चालविली होती याबद्दल शंका घेण्याचें मुळींच कारण नाहीं.

मात्र रशियनांच्या या मोहिमेमुळें एक विलक्षण आणि अनपेक्षित परिणाम झाला. आतांपर्यंत आंतरराष्ट्रीय परिषदांच्या वेळीं बडीं राष्ट्रें छोट्या राष्ट्रांकडे विशेष लक्ष देत नसत. बड्या राष्ट्रांची ही मोठीच चूक होत होती.

सान फ्रान्सिस्को परिषदेंत छोट्या राष्ट्रांना पहिल्यांदा हिशेबांत घेतलें गेलें आणि त्यांना आपलें म्हणणें मांडण्याचा हक्क बहाल केला गेला. याबद्दल खरोखरच आम्ही सोव्हिएटचे आभार मानले पाहिजेत! पण एवढ्यापुरतेच.

संयुक्त राष्ट्र संघटनेंत सर्वांच्या आदराला पात्र झालेलीं जीं थोडीं माणसें होतीं त्यांत लक्झेम्बर्ग या चिमुकल्या राष्ट्राच्या प्रतिनिधि मंडळाचे अध्यक्ष जोसेफ बेश हे होते. मोलोटोव्ह आणि व्हिशिन्स्की हेही त्यांना मान देत असत. त्यांनीं आम्हांला मागची एक आठवण सांगितली. वर्सायच्या तहाच्या वाटाघाटींसाठीं पंतप्रधानांची जी बैठक भरली होती तिला ते लक्झेम्बर्गचे पंतप्रधान म्हणून उपस्थित होते. प्रे. विल्सन, क्लेमांसो यांसारख्या थोर नेत्यांच्या त्या बैठकींत त्यांनीं आपल्या छोट्या राष्ट्राकडेही लक्ष दिलें पाहिजे असें प्रतिपादन करणारें भाषण केलें. त्यावेळीं बड्या राष्ट्रांपैकीं एका राष्ट्राच्या प्रतिनिधीनें कुत्सितपणें विचारलें, “ तुमचा हा देश आहे तरी कुठें ? मला तर कांहीं तो नकाशांत दिसत नाहीं ! ”

त्यावर बेश यांनीं पटकन् चोख उत्तर दिलें होतें, “ कसा दिसणार ? कारण तो तुमच्या अंगठ्याखालीं आहे ! ”

जोसेफ बेश यांच्या भावना मी जाणूं शकतों. कारण संयुक्त राष्ट्र संघटनेचें अभिज्ञानचिन्ह लेक सक्सेस येथें तयार झालें तेव्हां त्यावर रेखाटलेल्या जगाच्या नकाशांत फिलिपीन्सला मुळींच स्थान नव्हतें. याबद्दल मीं तक्रार केली तेव्हां तो नमुना तयार करणारा कलावंत उलट म्हणाला, “ यांत फिलिपीन्स दाखवायचं म्हटलं तर तें टांचणीच्या टोंकाइतकंही मोठें दिसणार नाहीं ! ”

मी म्हणालों, “ चालेल–पण तेवढी जागा आम्हांला द्याच ! ”

त्याप्रमाणें त्या नकाशांत फिलिपीन्सला स्थान मिळालें. निरखून काळजीपूर्वक बघितल्याशिवाय तुम्हांला नकाशांत तें दिसणारदेखील नाहीं. पण जगाच्या नकाशांत आपल्याला स्थान आहे याचें आमच्या छोट्या राष्ट्राला फार महत्त्व वाटतें, ही वस्तुस्थिति विसरून चालणार नाहीं.

एकादा देश कितीही छोटा असो, त्याचे म्हणून कांहीं हक्क असतात.

इतकेंच नव्हे तर त्याचें महत्त्वही एकादेवेळीं फार असतें. हें महत्त्व केव्हां आणि कसें प्रकट होतें हें कोणी सांगूं शकणार नाहीं. अशी एक दंतकथा आहे कीं, हॉलंडमधल्या एका छोट्या मुलानें तिथल्या धरणाला पडलेल्या छिद्रांत आपलें चिमुकलें बोट घालून पाणी अडविलें त्यामुळेंच त्याचा सारा देश जलप्रलयापासून बचावला गेला. ही दंतकथा आधुनिक काळालाही लागूं पडेल. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या ग्रीसचेंच उदाहरण घ्या. अल्बेनियांतून आणि रशियाच्या पंजाखालील इतर शेजारी देशांतून आलेल्या तथाकथित गनिमी टोळ्यांच्या चोरट्या हालचालींना ग्रीसमध्यें ऊत आला होता. लोकांत कम्युनिझमचा जोरदार प्रचार करून त्यांना भारून टाकण्यांत आलें होतें आणि ग्रीक जनतेंत फूट पाडून त्यांना एकमेकांविरुद्ध झगडायला प्रवृत्त करण्यांत आलें होतें. ग्रीस हें रशियाच्या छत्राखालचें मांडलिक राज्य बनूं लागलें होतें. अगदीं झपाट्यानें.

भूमध्य समुद्रांत शिरण्यासाठीं मार्ग म्हणून रशियाला ग्रीस हवा होता. आजपर्यंत रशियाचा हा उद्देश असफल राहिला होता. तो साधण्यासाठीं रशियाचा सगळा प्रयत्न चालला होता. रशियाची ही योजना यशस्वी झाली असती तर युरोपचीं दोन शकलें झालीं असतीं. आणि सुएझ कालव्याचा उपयोग करण्याच्या हक्काला पाश्चात्य राष्ट्रें आंचवलीं असतीं; आणि अखेर युरोपवर सोव्हिएटचें वर्चस्व प्रस्थापित झालें असतें.

अमेरिकेनें ही योजना उधळून लावली. सोव्हिएटच्या हस्तकांविरुद्ध आपल्या चिमुकल्या देशाचा बचाव करण्यासाठीं झगडणाऱ्या ग्रीक देशभक्तांना लष्करी डावपेचांचें शिक्षण घेण्याच्या कामीं मदत करण्यासाठीं अमेरिकन लष्करी युद्धतंत्र विशारदांसह जनरल जेम्स व्हॅन फ्लीट यांना ग्रीसमध्यें पाठविण्यांत आलें.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत हिटलर आणि मुसोलिनी यांच्या सैन्यांनीं ग्रीसमध्यें हातमिळवणी करण्याची आखलेली योजना ज्याप्रमाणें ग्रीक देशभक्तांनीं उधळून लावली होती, त्याचप्रमाणें सोव्हिएटचा हा डावही ऐंशी लाख ग्रीक प्रतिकारकांनीं हाणून पाडला. दुसऱ्या महायुद्धांत ग्रीकांनीं हिटलर-मुसोलिनींचीं सैन्यें थोपवून धरून अवधि मिळविला त्यामुळेंच त्यावेळीं

आयझनहॉवर यांना आफ्रिकेंत आणि नंतर ॲन्झीओ येथें सैन्य उतरविणें शक्य झालें.

फिलिपीन्समध्यें देखील, बातान आणि कॉरीजिडॉर या आघाड्यांवर शत्रूला थोपवून चार मौल्यवान महिन्यांचा अवधि मिळविण्याचे आमचे डावपेंच यशस्वी झाले, म्हणूनच ऑस्ट्रेलियाला आणि पॅसीफिकच्या किनाऱ्यावरील राष्ट्राला–म्हणजेच अमेरिकेला तयारी करण्याला अवसर मिळाला, ही गोष्ट अमेरिकेचे त्यावेळचे सैन्याधिकारी–प्रमुख मार्शल यांनीं जाहीरपणें कबूल केलेली आहे.

अशा रीतीनें या दोन छोट्या राष्ट्रांनीं दुसऱ्या महायुद्धांत लोकशाही गटाच्या संरक्षणाच्या कामीं महत्त्वाच्या कामगिऱ्या बजावलेल्या आहेत.

स्वतःच्या सामर्थ्याच्या अहंकारापायीं युनायटेड स्टेट्स्, इंग्लंड आणि फ्रान्स यांनीं पूर्वीं नेहमींच छोट्या राष्ट्रांच्या मतांकडे दुर्लक्ष केलें होतें. जिनीव्हा बैठकीच्या वेळीं रशियन प्रतिनिधी आम्हां छोट्या राष्ट्रांच्या मतांना मान देत होते, यापूर्वीं आमच्या दैवीं कधीं न लाभलेलें महत्त्व आम्हांला देत होते. या गोष्टीचा अगदीं अकल्पित पण अत्यंत चांगला असा परिणाम झाला. बऱ्या पाश्चात्य राष्ट्रांविषयींच्या द्वेषामुळेंच रशिया आम्हांला महत्त्व देत होता ही गोष्ट, तोंवेळपर्यंत उपेक्षिल्या गेलेल्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींपैकीं बहुतेकांच्या लक्ष्यांत आली नाहीं. युनायटेड स्टेट्स्, इंग्लंड आणि फ्रान्स यांना कःपदार्थ ठरविण्याचा रशियाचा हव्यास ह्या धोरणाच्या मुळाशीं होता हें त्यांच्या लक्ष्यांत आलें नाहीं.

## माझें मन वळविण्यासाठीं रशियानें केलेले प्रयत्न

माझीं रशियाविरोधी मतें आतां अगदीं उघड झालेलीं होतीं. रशियनांना त्याची पूर्ण कल्पना आतांपर्यंत आलेली होती. तरी देखील माझें मन वळविण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. कारण, मी एका छोट्या देशाचा प्रतिनिधि होतों. वॉशिंग्टन येथें ‘फार ईस्टर्न कमिशन’च्या बैठकींत फिलिपीन्सला मिळावयाच्या युद्धांतील नुकसानभरपाईच्या प्रश्नावर मला खूप झगडा करावा लागला. या चर्चेंत अमेरिकेला प्रतिकूल अशीं भाषणेंही

मला करावीं लागलीं. अशा वेळीं रशियन प्रतिनिधि हटकून नंतर माझी भेट घेत आणि माझें अभिनंदन करीत. अर्थात् त्यांच्या या कृत्याचा परिणाम इतकाच होई कीं, त्यानंतरच्या बैठकींत मी माझ्या भाषणांतील अमेरिकेविरुद्धच्या टीकेचा सूर सौम्य करीत असे.

जिनीव्हाला वृत्तस्वातंत्र्य परिषदेंत अध्यक्षपदासाठीं माझें नांव सुचविण्यांत आलें. त्याबरोबर रशियनांनीं भारतांतून आलेल्या प्रतिनिधीच्या उमेदवारीला पाठिंबा दिला. माझें प्रकरण रशियनांना जरा गरम वाटलें असावें. या निवडणुकीच्या आदल्याच दिवशीं एक रशियन प्रतिनिधि मला भेटायला आला होता आणि रशियाचा पाठिंबा मलाच मिळेल असें त्यानें मला अगदीं ठांसून सांगितलें होतें. हे लोक माझ्याविरुद्ध आहेत याबद्दल माझी इतकी खात्री पटलेली होती कीं, त्याच्या आश्वासनाबद्दल मला संशय आल्याशिवाय राहिला नाहीं. म्हणून निवडणूक झाल्यावर मीं मतमोजणीची मागणी केली. मला मतें देण्याचें आश्वासन कोणीं कोणीं दिलें होतें तें मला पक्कें माहीत असल्यामुळें, त्या मतमोजणीवरून मी निश्चित सांगूं शकत होतों कीं, रशियानें माझ्या बाजूनें मुळींच मत दिलेलें नव्हतें.

तें कांहीं असो, पण रशियानें मला मत देण्याचें आश्वासन देतांना स्नेहभावाचा आव पुरेपूर आणला होता आणि जिनीव्हाच्या या बैठकीच्या काळांत रशियन मुत्सद्दी प्रत्येक गोष्टच मोठ्या सौजन्याचा, गोडव्याचा आव आणून करीत होते.

रशियनांनीं दिलेल्या मेजवान्यांना, त्यांच्या मांडलिक राष्ट्रांनीं दिलेल्या खान्यांना मला पूर्वींप्रमाणेंच निमंत्रणें येत होतीं. आणि भरपूर दारू आणि उत्कृष्ट रशियन पद्धतीचे खाद्य पदार्थ यांच्या जोडीनें सोव्हिएट प्रचाराचे डोसही निमंत्रितांच्या घशाखालीं उतरविण्याचा प्रयत्न होत असे. प्रचार-पुस्तिका वाटण्यांत येत, चित्रपट दाखविण्यांत येत,—त्यांत सोव्हिएट राजवटी-खालीं पोलंड किंवा चेकोस्लोव्हाकिया किंवा अशाच दुसऱ्या मांडलिक राष्ट्रानें केलेल्या प्रगतीचेंच प्रदर्शन असे. रशियन लोक जें कांहीं करीत तें अगदीं चोखपणेंच !

मला दिसून आलें कीं, हे लोक नेहमीं मेजवान्या देतात आणि दुसऱ्यांनीं

दिलेल्या मेजवान्यांना हटकून हजर राहातात. आमचे सदा कठोर–गंभीर असणारे रशियन मुत्सद्दी या परिषदेंत मात्र उत्सवमूर्तीसारखे वागत होते. त्यांचा संचार सर्वत्र होता आणि सर्वांशींच ते मिळून मिसळून वागत होते.

जिनीव्हा परिषदेच्या वेळीं मला आणखी एक गोष्ट आढळून आली. अमेरिकन प्रतिनिधि बहुतकरून स्वतःच्या गोटांतच असत. संध्याकाळीं, भोजनगृहांत जेवण्यासाठींही ते एकत्र बसलेले दिसत. परदेशांत आलेल्या एकाद्या देशांतील नागरिकांनीं आपलाच गट करून राहावें तसें त्यांचें वर्तन असे. तें पाहून माझ्या मनांत विचार येई, रशियनांप्रमाणें हे अमेरिकनही इतर देशांच्या लोकांत मिसळतील तर त्यांच्या अनुभवांत भर पडेल आणि त्यांच्याविषयीं इतरांचा ग्रहही चांगला होईल.

## राष्ट्राध्यक्ष रोक्सास यांचें निधन

जिनीव्हामध्येंच एका संध्याकाळीं, लेबननच्या प्रतिनिधीनें माझ्या सन्मानार्थ मेजवानी दिली. मेजवानी चालू असतां सहज माझें लक्ष दरवाजाकडे गेलें. माझा मदतनीस मेजर सीझर बी. जिमेनेझ आणि माझा मुलगा ग्रेगोरिओ हे दोघे दरवाजांत उभे असलेले दिसले. त्यांच्या चेहऱ्यां-वरील भकास छटा बघतांच मी ओळखलें कीं, कांहीं तरी भयंकर घटना घडली आहे. ते दोघे घाईनें माझ्यापाशीं आले आणि त्यांच्यापैकीं एकजण हळूंच माझ्या कानाशीं पुटपुटला, "वॉशिंग्टनहून आतांच फोन आला आहे." प्रथमतः माझ्या मनांत कुणाबद्दल भीतीची कल्पना उभी राहिली असेल तर ती माझ्या पत्नीबद्दल. पण लगेच तो पुढें पुटपुटला, "राष्ट्राध्यक्ष रोक्सास नुकतेच निधन पावले."

मी माझ्या यजमानाचा निरोप घेऊन तेथून बाहेर पडलों. माझी पत्नी व्हर्जीनिया खुशाल आहे याबद्दलची सुटकेची भावना आणि रोक्सासच्या निधनाचें अतीव दुःख अशा संमिश्र भावनेनें माझा ऊर भरून आला होता. चालतांना माझे पाय लटपटत होते.

पुनः एकदां, अत्यंत निकडीच्या क्षणीं फिलिपीन्सवर नेत्याविना पोरकें होण्याचा प्रसंग ओढवलेला होता. क्वीझॉनच्या रूपानें आम्हांला थोर नेता लाभला होता. पण फिलिपीन्सच्या विमोचनासाठीं चाललेल्या आमच्या

प्रयत्नाच्या ऐन आणीबाणीच्या क्षणीं काळानें त्यांना आमच्यांतून नेलें होतें. आणि आतां आम्ही स्वतंत्र होऊन दोनच वर्षें झालीं नाहींत तोंच आमच्या राष्ट्राध्यक्षावर–रोक्सासवर–काळानें घाला घातला होता. उपाध्यक्ष एल्पीडिओ क्विरीनो यांनीं हंगामी राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथपूर्वक अधिकाराचीं वस्त्रें धारण केलीं होतीं.

मॅन्युएल रोक्सास यांच्या निधनाचा प्रसंग अर्थपूर्ण होता. फिलिपीन्स-मधील अमेरिकन सैन्याचा विमानतळ असलेल्या क्लार्क फील्डवर भरलेल्या सभेंत ते भाषण करीत होते. आपल्या भाषणाच्या अखेरीस त्यांनीं आश्वासन-पूर्वक घोषणा केली कीं, “ कम्युनिझमविरोधी लढ्यांत अमेरिकेच्या पाठीशीं आपल्या सर्व शक्ति खड्या करण्यास फिलिपीन्स सज्ज आहे ! ”—ही नाट्य-पूर्ण घोषणा त्यांच्या तोंडून पुरी होते न होते तोंच त्यांचा देह धाडकन् खालीं कोसळला !

अमेरिकन डॉक्टरांनीं त्यांना उचलून विमानतळावरच असलेल्या अमेरिकन इस्पितळांत नेलें. तिथें–फिलिपीन्समध्येंच पण अमेरिकेच्या मालकीच्या भूमीवर–रोक्सासनें शेवटचा श्वास सोडला.

आमच्या देशाच्या इतिहासांतील अत्यंत आणीबाणीच्या क्षणीं आम्ही आमच्या महान् नेत्याला मुकलों होतों. त्यानंतर जें घडलें तें अपरिहार्य होतें–लांचलुचपत, सत्तेमत्तेचा लोभ यांचा सुळसुळाट झाला आणि परिणामीं सरकार बदनाम ठरून जनतेच्या विश्वासाला सुरुंग लागला.

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ....

प्रकरण ३ रें : : आशियांत गोऱ्या माणसाचा झालेला पराभव

पर्ल हार्बरवर हल्ला झाल्यापासून हिरोशिमावर अणुबॅाँब पडेपर्यंतच्या साडे-तीन वर्षांच्या काळांत एक गोष्ट घडवून आणण्यांत जपानी लोक यशस्वी झाले होते. आपल्या युरोपियन सत्ताधाऱ्यांना तोंड देऊन त्यांचा पाडाव करण्याचें सामर्थ्य आशियन लोकांमध्यें आहे कीं नाहीं याबद्दल आशियायी जनतेच्या मनांत असलेल्या-नसलेल्या साऱ्या शंकांचा जपान्यांनीं निरास केला होता. जपाननें युद्ध जवळ जवळ जिंकलेंच होतें; आणि त्यानें जे विजय मिळविले ते सर्व ' आशियायी जनतेसाठीं आशिया ' ही प्रभावी घोषणा करीत मिळविले होते.

पण आपल्या हातीं आलेलें हें नेतृत्व त्यांनीं आपल्या अतिलोभापायीं बदनाम करून टाकलें. " आशियायी जनतेसाठीं आशिया " ही त्यांची घोषणा केवळ वरवरची होती. जपानी प्रचारयंत्रणेची घोषणा खऱ्या अर्थानें पाहिली तर ' जपान्यांसाठीं आशिया ' अशीच होती. फिलिपीन्सपासून तों उराल्सपर्यंत जपान्यांनीं सर्वांचा अनुनय केला. त्याचें ध्रुपद एकच होतें. तें म्हणजे " आपण सारे आशियायी बांधव आहोंत. गोऱ्या सत्ताधाऱ्यांची उचलबांगडी करून त्यांना समुद्रांत फेंकून देण्याच्या कार्यांत आमचे सहभागी व्हा. "

आशिया स्वातंत्र्यप्रेमी आहे. निराळ्या स्वरूपांत येऊं पाहणाऱ्या नव्या गुलामगिरीचा धोका त्यानें चटकन् ओळखला. जपान्यांचा हल्ला त्यानें परतवून लावला. आणि जपानी साम्राज्यशाही आक्रमणाचा नायनाट करण्यासाठीं तो पश्चिमी राष्ट्रांच्या खांद्याला खांदा लावून उभा ठाकला.

या युद्धाच्या काळांतच आशियाला आत्मसामर्थ्याचा साक्षात्कार झाला. जपानी लष्कराच्या बुटांच्या खाडखाड् होणाऱ्या आवाजाच्या तालावर ऐकूं

येणारी " आशियायी जनतेसाठींच आशिया " ही घोषणा सतत आशियायी जनतेच्या कानांवर पडत होती. जोंपर्यंत सर्वांवर समान संकटाची तलवार लटकत होती तोंपर्यंत सारा आशिया एकामुखानें बोलत होता. कांहीं काळ-पर्यंत तरी सर्वांचें उद्दिष्ट एकच होतें : उर्मट आक्रमकाचा निःपात हेंच तें उद्दिष्ट होतें.

## युद्धोत्तर आशियांतील दुही

जपानचा पाडाव होतांच आशियाची एकजूट दुभंगूं लागली. कारण सर्वांना एकत्र राखणारा समान संकटाचा दुवा आतां उरला नव्हता. या एकजुटीची जागा परस्परविरोधी प्रादेशिक आकांक्षांनीं घ्यावयास सुरुवात केली. तथापि याही परिस्थितींत सर्वांचें उद्दिष्ट मात्र समान होतें : परकी सत्तेपासून विमोचन हें उद्दिष्ट पूर्वीप्रमाणेंच आतांही होतें.

परकी सत्तेंतून मुक्त होण्याचा आशियायी जनतेचा शतकानुशतकांचा निर्धार युद्धामुळें व जपानच्या पराभवामुळें अधिक भक्कम बनला होता. आक्रमक जपानचा पाडाव झालाच होता. आतां गोऱ्या सत्ताधाऱ्यांना अतिपूर्वेंतून हांकलणें सहज शक्य आहे असें, दुर्बल झालेल्या, ओसाड बनलेल्या आशियालाही वाटूं लागलें होतें !

* * *

सारांश, आपण हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं प्रत्यक्ष युद्धामध्यें जपान जरी हरला असला तरी आशियांतील गोऱ्या सत्ताधाऱ्यांच्या सत्तेवर आघात करण्याच्या बाबतींत तो यशस्वी ठरला होता. जपानच्या बादशहानें सैन्याला माघार घेण्याचा हुकूम दिल्यानंतरदेखील दीर्घकालपर्यंत गोऱ्या सत्तेविरुद्धचा संग्राम आशियांतील इतर भागांत चालूंच राहिला.

इंडोनेशियांतील सत्ताधारी राष्ट्र नेदर्लंडस् आपली अत्यंत संपन्न वसाहत सोडण्याला तयार होईना; तिथें युद्ध चालूंच राहिलें. इंडोचीनमध्यें, परसत्तेचें उच्चाटण करण्याची युद्धकाळांत निर्माण झालेली आकांक्षा आतां फ्रेंच सत्तेविरुद्ध वळली. आग्नेय आशियाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत 'उगवत्या सूर्या'नें (जपाननें) पेटवलेला वणवा अद्याप भडकत होता.

युद्धामुळें उध्वस्त झालेल्या त्या भूमींत स्वातंत्र्यसंग्रामाच्या ज्वाला अद्याप उफाळत होत्या. या भागांतील दळणवळणाचीं साधनें नष्टप्राय झालीं होतीं, शतकानुशतकें चालत आलेली समाजव्यवस्थेची घडी विस्कटली होती, जुनीं मूल्यें नष्ट झालीं होतीं, भावना विरून गेल्या होत्या; पण एकच ऊर्मी मात्र अभंग राहिली होती : परकी सत्तेंतून मुक्त होण्याची उत्कट, अविनाशी ऊर्मी ! आणि आशियांत परसत्तेविरुद्ध लढा याचा अर्थ गौरवर्णीयांच्या वर्चस्वाविरुद्ध लढा असा होता.

आणि तेवढ्यांत या नेतृत्वहीन, अराजकानें बुजबुजलेल्या, विनाश, उपासमार, मृत्यु यांचा धुमाकूळ चालू असलेल्या प्रदेशांत, नव्या आणि अधिक मोठ्या आवाजांत "आशियायी जनतेसाठीं आशिया" या घोषणेचे निनाद उमटूं लागले. आतां ही घोषणा मॉस्कोहून केली जात होती आणि जगाला हादरा देऊं बघत होती.

सुखसोयींना पारख्या असलेल्या, भरल्यापोटीं झोंपीं जाण्याचें सुख माहीत नसलेल्या आशियायी जनतेला कम्युनिझम पोटभर अन्नाचें आश्वासन देत होता, परसत्तेपासून मुक्त होण्याच्या हक्काचें आश्वासन देत होता. जें त्यानें पूर्वीं कधींच उपभोगिलेलें नव्हतें तें नागरिक स्वातंत्र्य रशियाच्या जग जिंकण्याच्या योजनेच्या गाड्याला जुंपायला दिलें कीं जादूची कांडी फिरावी तसा स्वर्गच त्याच्या हातीं येईल, असें आश्वासन कम्युनिझम आशियायी माणसाला देत होता. रशियाचा डाव जगाचा हा भाग जिंकण्याचा आहे हें आशियायी माणसाला माहीत नव्हतें. आशियांतील सामान्य माणसाच्या दृष्टीनें ध्येयवाद वगैरे गोष्टींना महत्त्व नव्हतें. मॉस्कोप्रणीत ध्येयवाद, नीति वगैरेपेक्षां कितीतरी श्रेष्ठ आणि उच्च दर्जाची नीति आणि ध्येयवाद यांचा वारसा अनेक शतकांपासून चालत आलेला आशियायी जनतेजवळ होता. तेव्हां रशियाच्या ध्येयवादाशीं त्याला कांहींच कर्तव्य नव्हतें. आशियायी माणसाला आज एकच गोष्ट माहीत होती : ती म्हणजे, आपल्या पोटांत भुकेचा डोंब उसळला आहे, उपासमारीनें आपली बायको मेली आहे आणि आपल्या मुलांच्या तोंडांत घांस घालतां न आल्यामुळें तीं मेलीं आहेत, त्यांच्या प्रेतांवर असंख्य जखमा आहेत आणि त्यावर माशा भणभणत आहेत.

ही भयंकर परिस्थितिच काय ती त्याला माहीत होती. मरमर काम करूनही पोटापुरतें मिळत नाहीं, जीवनांत आशेला स्थान नाहीं, क्रौर्य, अपमान आणि अवनतावस्था यांचे आपण बळी आहोंत, आपल्याला न्याय मिळण्याची सुतराम् संधि नाहीं; ही जाणीव त्याला जाळीत होती.

आणि आपल्या या दुरवस्थेला गोरे लोक जबाबदार आहेत असें त्याला वाटत होतें.

अशा उपाशीतापाशी लोकांच्या दृष्टीनें मार्क्सची शिकवण निरर्थक होती. त्याच्या दृष्टीनें महत्त्व होतें मूठभर तांदुळाला, वाडगाभर चहाला ! जगण्याचा हक्क हीच गोष्ट त्याच्या दृष्टीनें महत्त्वाची होती. अंगावर चिंध्या असलेल्या अशा पाप्याच्या पितराच्या हातीं बंदुक देऊन त्याला, "लढ ! आपल्या देशासाठीं आणि त्यावर राज्य करणाऱ्या परक्या सत्ताधाऱ्यासाठीं लढ !" असें कोणी सांगू लागला तर त्यानें काय उत्तर द्यावें ?

गोऱ्या लोकांसाठीं त्यानें कां म्हणून लढावें ?

पण, परिस्थितींत बदल होणार असेल तर मात्र तो लढायला सज्ज होईल. मग, त्या स्थित्यंतराचें स्वरूप कांहीं का असेना.

आपल्या भूमीवर राज्य करणाऱ्या सरकारवरचा ज्यांचा विश्वास उडालेला आहे त्यांची सामुदायिक प्रार्थना एकच असते : "बदल हवा ! आहे त्या परिस्थितीपेक्षां इतर कोणतीही परिस्थिति पतकरेल."

चीनमध्यें जनतेचें हेंच आक्रंदन चालू होतें. इंडोनेशियांत, इंडोचीन-मध्यें जनता आक्रंदून हेंच मागत होती.

भुकेल्या जनतेचा हा आक्रोश होता. लंडन, पॅरिस, हेग या ठिकाणीं तो ऐकूं गेला नाहीं. पण मॉस्कोमध्यें ऐकूं गेला.

मॉस्कोनें या लोकांना बंदुका दिल्या. द्वेषाच्या विषाचे डोस पाजले. पददलित जनतेला, आपण ज्या टांचेखालीं चिरडले जात आहों ती टांच गोरी आहे कीं पिंगट आहे याची तमा नसते. ती टांच ज्याची आहे त्याचा द्वेष करायचा एवढेंच तिला माहीत असतें. चीन, इंडोनेशिया, इंडोचीन अशा टांचेखालीं पिचत होते. त्या द्वेषानें जळफळणाऱ्या जनतेला कम्युनिझमनें बंदुका बहाल केल्या; आणि आश्वासन—हें आश्वासन वरवरचें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.



अनुक्रम 20978 वि. इतिहास
क्रमांक ५२६ नों: दि: १९८१०१५४

होतें, केवळ शाब्दिक होतें–पण आश्वासन दिलें, "आमच्या पौरस्त्य बांधवांनो, समानता मिळविण्याची ही घ्या संधि! गोऱ्या माणसाला हाकलून देण्याची, स्वतंत्र होण्याची, समानतेचा दर्जा मिळविण्याची, पोटभर जेवण्याची, आत्मसन्मानानें इतरांप्रमाणें जगण्याची ही घ्या तुम्हांला हवी असलेली संधि!..."

आशियाच्या आकांक्षा कम्युनिझम बोलून दाखवीत होता असें मात्र मुळींच नाहीं. त्यानें फक्त पोकळी भरून काढण्याचें काम केलें होतें. अतिपूर्वेंतील कोट्यवधि जनतेच्या नेत्यांना फक्त एकच उद्दिष्ट माहीत होतें. तें म्हणजे आशियांतून गोऱ्या सत्ताधाऱ्यांची हकालपट्टी करणें; आणि ह्या आधारावरच आपल्या गुप्त चळवळीचे पाश पसरण्याची योजना कम्युनिस्टांनीं आंखली होती. निराश झालेल्या जनतेला बंदुका आणि हितोपदेश त्यांनीं बहाल केला, त्यांना नव्यानें पुनः घोषणा शिकविली :

"आशियायी जनतेसाठीं आशिया!"

हीच घोषणा करीत जपाननें आपल्या आक्रमणाच्या कार्यक्रमाची सुरुवात केली होती. फिलिपीन्सपर्यंत येऊन ठेपल्यावरच जपानचें पाऊल रोखून धरण्यांत आलें होतें.

## मॉस्कोची जागतिक आक्रमणाची योजना

जपाननंतर आतां मॉस्कोनें तीच जागतिक आक्रमणाची योजना, तीच घोषणा करीत अंमलांत आणण्याला प्रारंभ केला. आणि याबाबतही जपानचेंच अनुकरण करून रशियानें आपल्या मोहिमेचें लक्ष्य फिलिपीन्स हेंच ठेवलें होतें.

१९४८ साल उजाडेतों ही मोहीम जगांतील प्रत्येक भागांत जोरानें सुरूही झाली होती. 'आशियायी जनतेसाठीं आशिया' ही घोषणा केवळ पौरस्त्य जनतेच्याच कानांत ओरडून केली जात होती असें नव्हे तर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या परिसरांतही व्होडका किंवा गरमगरम रशियन चहाचें पान चालू असतां मोठ्या कौशल्यानें तिचे पडसाद उमटविले जात होते. याच वर्षी रोक्सास यांचें निधन झालें आणि खऱ्या अर्थानें फिलिपीन्समधील

गडबडीला सुरुवात झाली. जिनीव्हाच्या परिषदेनंतर पॅरिस येथें संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेची बैठक भरली त्यावेळीं रशियन प्रतिनिधि इतके धीट बनले होते कीं त्यांनीं आपल्याला काय हवें आहे तें केवळ आपल्याबरोबरच्या इतर प्रतिनिधींपुढेंच नव्हे तर सर्व जगापुढें अगदीं उघडपणें दाखवून दिलें.

तो सप्टेंबर महिना होता. बर्लिनच्या नाकेबंदीमुळें जगावर युद्धाचे ढग जमू बघत होते. अशा वेळीं, पॅरिसमध्यें भरलेल्या बैठकींत, आपण किती औद्धत्यपूर्ण वर्तणूक करूं शकतों हें रशियनांनीं साऱ्या जगाला दाखवून दिलें. जिनीव्हा परिषदेच्या वेळचा गोडवा, उल्हसित वृत्ति यांचा पॅरिसला मागमूसही राहिला नव्हता. सदासर्वदा युद्धाचा पवित्रा घेऊन ठाकणाऱ्या व्हिशिन्स्कीचें प्रथम दर्शन याच पॅरिसच्या बैठकींत आम्हांला घडलें. आक्रमकवृत्ति त्यांच्या रोमरोमांत मुरलेली दिसत होती. याच बैठकींत व्हिशिन्स्कींची आणि माझी पहिली चकमक झडली. खरें म्हणजे, आमची दणकेबाज साठमारीच झाली असें मी म्हणेन.

## व्हिशिन्स्की : ‘ वितंडवादांत अजिंक्य ’

आपण शाब्दिक कसरतीचे पंडित आहों आणि वितंडवादांत अजिंक्य आहों, हें व्हिशिन्स्कींनीं सिद्ध करून दाखविलें. शब्दच्छल, हुज्जतखोरपणा यांचा अर्क असलेला हा विवादपटु वादविवादांतल्या साऱ्या खुब्या जाणून होता, आणि कोणत्याही मुद्याचा आपल्याला पाहिजे तसा अर्थ करण्यांत निष्णात होता. माझ्याशीं झालेल्या सर्व शाब्दिक चकमकींत तो विशेष उद्धटपणानें वागला. मी भांडवलशाही राष्ट्रांचा हस्तक आहे असें ठरवूनच तो बोलत होता ही गोष्ट अगदीं उघड दिसत होती.

मी, हंगामी राजकीय व सुरक्षितता समितीचा अध्यक्ष झालों तेव्हांची गोष्ट. या समितीनेंच रशियाचा दुटप्पीपणा चव्हाट्यावर आणला. या समितीच्या अध्यक्षपदीं असतांना, आज केलेले करार उद्यां, जणुं केलेच नाहींत अशा थाटांत धुडकावण्याचे प्रकार पाहून मी अक्षरशः आश्चर्यानें थक्क झालों.

सिलोनच्या सभासदत्वाच्या प्रश्नावर आमच्या समितींत मतदान व्हायचें होतें त्याच्या आदल्या रात्रीं पोलंडच्या एका प्रतिनिधीनें आमच्याशीं करारावर

सही केली. पण दुसऱ्या दिवशीं मतदानाच्या वेळीं त्यानें सरळ आमच्या विरुद्ध मत दिलें. साक्षीदारांच्या देखत त्याची सही असलेला कराराचा कागद त्याला दाखविला तेव्हां त्यानें चक्क सांगितलें कीं, ही सही आपण केलेलीच नाहीं ! अर्थात् अशा प्रकारापुढें आमचें काय चालणार ?

अशा लोकांच्या विरुद्ध उभें ठाकणार तरी कसें ? इतरांना संयम पाळण्याला धर्म शिकवितो, पण या रशियनांना आणि त्यांच्या हस्तक राष्ट्रांना धर्माचा गंधही नव्हता. त्यांचा धर्म म्हणजे मॉस्कोप्रणीत माथेफिरू विचार-प्रणाली. अशा माणसांवर समजुतीच्या–शहाणपणाच्या गोष्टी, सभ्यपणा राखण्यासाठीं केलेल्या विनंत्या यांचा कदापि परिणाम व्हावयाचा नाहीं. हीं माणसें कदापि बदलायचीं नाहींत. त्यांची घडण जणुं न वाकणाऱ्या लोखंडाची असते. नात्सींप्रमाणेंच ते निर्दय असतात. मॉस्कोप्रणीत धोरणांवर त्यांची आंधळी श्रद्धा असते. आपलें म्हणणें दुसऱ्याला पटवून तरी देऊं किंवा त्याचा नायनाट तरी करूं, असा त्यांचा बाणा असतो.

पॅरिसच्या बैठकींतच माझी प्रथम खात्री पटली कीं, हे रशियन जागतिक शांततेचे शत्रू आहेत आणि आम्हां लोकशाहीवादी राष्ट्रांना त्यांच्याशीं जुळवून घेणें सर्वस्वीं अशक्य आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेंत आम्हांला फक्त एकच गोष्ट करण्यासारखी होती, ती म्हणजे कालहरण करणें. आणि अशा रीतीनें जगांत रक्तपात घडण्याचा क्षण कांहीं काळ लांबणीवर पडेलसें करणें. आणि मध्यंतरीं एखादा चमत्कार घडून कदाचित् जगांत शांतता अवतीर्ण होईल अशी आशा करणें.

या बैठकीनंतर आणखी एक वर्षानें माझी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आम-सभेच्या अध्यक्षपदीं निवड झाली. मी अध्यक्षपदाचा स्वीकार केला त्याच दिवशीं दुपारीं व्हिशिन्स्कीनें पत्रकारांची बैठक घेऊन जाहीर केलें कीं, " अणुबॉंबची अमेरिकेची मिरासदारी रशियानें खतम् केली आहे !–रशि-यानेंही अणुबॉंब तयार केला आहे ! "

ही भयंकर बातमी मुद्दामच जाहीर करण्यांत आली होती. अणुबॉंबच्या बलावर रशियाला धमकावण्यांत अर्थ नाहीं, रशियाजवळही अणुबॉंब आहे, हें अमेरिकेनें उमजावें असें बजावण्याचा उद्देशच या घोषणेमागें होता.

तथापि, खाजगी व्यवहारांत रशियन लोक पूर्वीप्रमाणेंच सुप्रतिष्ठितपणानें आणि गोडव्यानें वागत. खाजगी मेजवानीच्या किंवा समारंभाच्या वेळीं व्हिशिन्स्की, झारशाहीच्या काळांतील एकाद्या रशियन सरदार-उमरावाला शोभेल अशा प्रकारें वागत असत.

विनोदी चुटके सांगण्याची त्यांना भारी आवड. त्यांतले कांहीं चुटके खरोखरच चांगले विनोदी असत. ते दुसऱ्याचें कौतुक करीत आणि मित्रही जोडीत.

आमसभेच्या अधिवेशनाला आलेल्या देशोदेशींच्या परराष्ट्रमंत्र्यांना मी न्यू यॉर्क येथें दिलेल्या एका मेजवानीच्या वेळचा प्रसंग मला आठवतो. नगराध्यक्ष समितीचे अध्यक्ष असलेले ग्रोव्हर व्हेलन यांनीं मला आयुरारोग्य चिंतिलें. "न्यू यॉर्कच्या सत्तर लाख नागरिकांचीं मनें जिंकणाऱ्या अध्यक्षांना आणि मिसेस रोम्युलो यांना" असे उद्‌गार त्यांनीं काढतांच व्हिशिन्स्की पेयाचा पेला हातीं घेऊन ताडकन् उभे राहिले आणि म्हणाले, "न्यू यॉर्कच्या त्या सत्तर लाख नागरिकांत एका रशियनाची भर घाला!"

एका रात्रीं संगीतिकेच्या कार्यक्रमाला माझ्याबरोबर येण्याचें निमंत्रण मी व्हिशिन्स्कींना दिलें. गायन चालू असतां त्यांतील प्रत्येक स्वरन् स्वर ते गुण-गुणतांना मला आढळून आले. त्यांना संगीताचा षोक आहे हें सहज दिसून येत होतें. आणि आपण व्हायोलिन वाजवितों हें त्यांनींच मला सांगितलें.

स्वतः व्हिशिन्स्कींनीं दिलेल्या मेजवान्या आणि घडवून आणलेले समारंभ मोठे आनंदमय असत. तिथें खर्चाच्या कामीं हात बिलकुल आंखडता घेतलेला नसे. त्यांनीं पार्क ॲव्हेन्यूवरील आपल्या निवासस्थानीं दिलेली एक मेजवानी मला आठवते. या मेजवानीला बेल्जमचे हेन्री स्पाक आणि मी असे दोघे सन्मान्य निमंत्रित होतों. सर्व रशियन आणि रशियाच्या अंकित राष्ट्रांचे प्रतिनिधि हजर होते. असे ते सुमारे चौदा प्रतिनिधि होते. आम्हांला खूष ठेवण्यासाठीं ते सारे लोक कसून प्रयत्न करीत होते. पण हें करीत असतांनाच कम्युनिस्ट ध्येयवादाचे डोस पाजण्याची एकही संधि वायां दवडली जात नव्हती. अटीतटीचा खेळ खेळून जिंकण्याची त्यांची

घडपड चालू होती आणि खेळाचे सारे नियम न चुकतां पाळले जात हो .
मला एकीकडे गांठतां यावें असा डाव मुद्दाम जमवून आणला जात होता आणि तसा मी एकीकडे सांपडलों कीं अगदीं सूक्ष्म कौशल्यानें, आतां चिरपरिचित झालेल्या सूत्राची पुनरुक्ति करण्यांत येई : " आम्हीही पौर्वात्यच आहों त्याअर्थी..."

त्या दिवसांत या सूत्राचा डिंडिम रशियाकडून साऱ्या जगभर ऐकविला जात होता. पॅसीफिकच्या पलीकडल्या बाजूलाही रेडिओवरून त्या त्या आशियायी देशाच्या भाषेंत तासातासाला ध्वनिक्षेपित करण्यांत येणाऱ्या प्रचाराचें सूत्र एकच होतें : " आम्ही रशियन लोक तुमचेच आहोंत. आम्ही पौरस्त्यच आहोंत. तिरस्करणीय गोऱ्यांची हकालपट्टी आपण सर्व मिळून करूं या. "

* * *

## रशियाच्या रोमरोमीं भिनलेला अमेरिकेविषयींचा " तिरस्कार "

वॉशिंग्टन येथें फार ईस्टर्न कमिशनवरील एक प्रतिनिधि या नात्यानें काम करतांना मला प्रथम रशियाच्या अमेरिकेसंबंधांतल्या वृत्तीची कल्पना आली. ज्या ज्या गोष्टीशीं अमेरिकेचा संबंध येई त्या त्या बाबतींत रशियनांचें वर्तन निर्दयपणाचें, औद्धत्याचें आणि दांडगाईचें असे. जपानमध्यें लोकशाही पद्धति रुजविण्याच्या कामीं मॅकार्थरला मार्गदर्शन करणारें हें कमिशन होतें. जपानशीं जीं जीं राष्ट्रें लढलीं त्यांचे त्यांचे प्रतिनिधि या कमिशनमध्यें होते. परस्पर समजूतदारपणाची जाणीव निर्माण व्हावी या हेतूनें भरलेल्या या कमिशनच्या प्रत्येक बैठकींत युनायटेड स्टेट्स्संबंधीं कोणी कांहींही विधान करो, त्यावर तुच्छतादर्शक भाष्य केल्याविना किंवा उद्‌गार काढल्याविना रशियन प्रतिनिधि कधींच राहात नसे. कमिशनचे आम्ही अकराच सभासद होतों आणि आमच्या भेटी वारंवार होत असत. त्यामुळें रशियन मुत्सद्यांचीं मनें मी फार जवळून पारखूं शकलों. आधीं ग्रोमीको होते, नंतर मलिक आले, त्यांच्या मागून पान्युश्किन आले, आलटूनपालटून लष्करी आणि नाविक अधिकारीही असत,—पण सर्वांचा खाक्या एकच.

कम्युनिस्टांच्या कारस्थानी योजनेचें अंधुकसेंच आणि ओझरतें दर्शन

मला सान फ्रान्सिस्कोला झालें होतें. आतां मला त्या योजनेचा संपूर्ण आराखडा स्पष्ट दृष्टीस पडला. माझ्या मनांतील वाईटांतल्या वाईट शंका-कुशंका खऱ्या असल्याची खात्री पटली. सोव्हिएट रशियाची वृत्ति एकट्या युनायटेड स्टेटस्‌बद्दलच नव्हे तर सर्वच पाश्चात्य राष्ट्रांविषयीं तिरस्काराची आणि औद्धत्यपूर्ण असल्याचें मला दिसून आलें.

मला अगदीं स्पष्ट कळून चुकलें कीं या लोकांचें उद्दिष्ट एकच आहे– युनायटेड स्टेट्‌सचा निःपात करणें !

एवढी गोष्ट साधण्याचीच काय ती रशियाला आवश्यकता होती. एकदां अमेरिका नेस्तनाबूद झाली कीं तिच्याबरोबर इतर राष्ट्रेंही जमीनदोस्त होतील हें तो जाणून होता.

रशियाच्या त्या उद्धट आणि निर्दय प्रतिनिधींना बघितलें कीं, माझें मन वाढत्या भीतीनें भारून जात असे. जग जिंकण्याचा चंग बांधलेल्या देशाचे ते प्रतिनिधि होते.

जगाच्या दुसऱ्या टोंकाला– आशियांत– गोऱ्या सत्ताधाऱ्यांविरुद्ध द्वेष पेटविण्याची जी कावेबाज चळवळ चालली होती तिचा उद्देश सारा आशिया रशियाच्या बाजूला वळवावा आणि अतिपूर्वेकडील देशांत कम्युनिस्टांना सहज विजय मिळेल अशी परिस्थिति निर्माण करावी हा होता.

एकदां आशिया घशांत पडला कीं मग सारें जगच !–जपाननें टोकिओंत, नात्सींनीं बर्लिनमध्यें यापूर्वीं शिजविलेल्या कारस्थानाप्रमाणें हें मॉस्कोंत शिजलेलें कारस्थान होतें.

रशियाचें कारस्थान हें असें होतें. आतां एकदांचें तें उघड झालें होतें, अगदीं स्पष्ट झालें होतें.

द्वेषावर आधारलेलें हें कारस्थान १९४९ पर्यंत खूपच शिजलें होतें. त्या वर्षाच्या मध्याला, आमचें एक शेजारी राष्ट्र, शतकानुशतकें आमचें मित्र असलेलें राष्ट्र–चीन–कम्युनिझमच्या कारस्थानाला बळी पडलें.

★ ★ ★

प्रकरण ४ थें : : १९४९ : एक 'दुःस्वप्न'

फिलिपीन्सच्या युद्धोत्तर इतिहासांत १९४९ हें वर्ष अत्यंत आणी-बाणीचें ठरलें.

माझ्या देशांतून ज्या ज्या बातम्या येत होत्या त्या त्या सर्व, लांचलुचपत, सत्तालोभ, फिलिपीनो जनतेंतील यादवी यासंबंधींच्याच असत. मी जिनीव्हाला असो, रोमला असो, अथेन्सला असो, नव्या दिल्लींत असो, याकार्ताला असो; न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, लंडन, रिओ द जनेरो किंवा पॅरिस, कुठेंही असो मी, तिथें तिथें याच बातम्या मला वाचायला मिळत आणि त्यामुळें माझें अंतःकरण व्यथित होई. आमचें छोटेसें राष्ट्र नुकतेंच कुठें स्वतंत्र झालें होतें; आणि थोड्याशाच अवधींत हास्यविषय ठरलें होतें. मी जिथें जाई तिथें थट्टेनें वा कुचेष्टेनें प्रश्न विचारले जात. शेवटीं शेवटीं तर स्नेहभावानें केलेली चौकशीही कर्णकटु वाटूं लागली. आमच्या राष्ट्राच्या जीवनांतील तेजस्वी घटका भयंकर दुःस्वप्नाची ठरली होती.

* * *

आमच्या देशांतील कम्युनिस्ट चळवळीची लष्करी आघाडी म्हणजे हक्स् किंवा 'एच् एम् बी " 'हकबलाहाप ' चे ते घटक होते. 'हकबलाहाप ' संघटनेचें संपूर्ण नामाभिधान " हकबॉंग मगपापालाया नूग् बायान " म्हणजे " जनता–विमोचन–दल " ( Army of Liberation of the People ). १९३१ ते १९४० या दशकाच्या पूर्वार्धांत पेद्रो अबाद सान्तोस आणि त्याचे सहकारी यांनीं स्थापन केलेल्या फिलिपीन्सच्या कम्युनिस्ट पक्षाच्या बीजांकुरा-पासून वाढलेला हा वृक्ष होता.

* * *

युद्धाच्या अखेरीस हक्स् संघटना खूप वाढली होती. असंतुष्टांचा हा भला मोठा प्रभावी गट बनला होता; युद्धकाळांत पाणबुड्यांतून आलेलीं

चोरटीं शस्त्रास्त्रें, अमेरिकन बंदुका, पकडलेल्या जपान्यांकडून जप्त केलेलीं हत्यारें, अशी विपुल शस्त्रसामुग्री या दलापाशीं होती. त्याचबरोबर त्यांच्याजवळ इतका विपुल दारूगोळा होता कीं, मनांत आणतील तेव्हां यशस्वीपणें युद्ध करण्याची त्यांची तयारी होती.

ही संघटना स्वावलंबी बनली होती आणि उघडपणें हालचाली करूं लागली होती. लोकशाहीच्या बाजूनें लढलेल्या गनिमी दलांबरोबर या लोकांचे संबंध स्नेहभावाचे कधींच नव्हते. या दोन्ही दलांत नेहमींच तेढ असे, ही एकच गोष्ट हक्‌स्‌च्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकण्यास पुरेशी होती. आणि हें उद्दिष्ट म्हणजे फिलिपीन्समध्यें सोव्हिएट कम्युनिस्ट राजवटीची स्थापना करणें.

त्यांना लाभलेला नवा नेता, 'वरिष्ठ हक्' (Supreme Huk) म्हणजे मनीलाच्या राजकीय क्षेत्रांतून कम्युनिस्ट म्हणून ज्याची हकालपट्टी झाली होती तो लुइस तारुक. इतर नेते म्हणजे तारुकचे सहकारी कास्तो आलेजान्द्रीनो, ग्विलेर्मो कापादोसिया, बाल्गोस वगैरे. यांच्यापैकीं कोणीही स्वतःला 'सोव्हिएट छाप कम्युनिस्ट' म्हणवून घेत नसे. गरीब बिचाऱ्या शेतकऱ्याला त्याचा जमिनीचा तुकडा मिळवून देण्यासाठीं, त्याला समाजांत त्याचें स्थान प्राप्त करून देण्यासाठीं झगडणारे आपण 'शेतकी सुधारणांचे पुरस्कर्ते' आहोंत असा त्यांचा दावा असे. कोमिन्टर्नच्या सूत्रधारांनीं घालून दिलेल्या मार्गानें आणि मान्य केलेल्या कार्यक्रमानुसार कार्य करणारीं अशीं आपलीं लष्करी पथकें आहेत हें ते कदापि मान्य करीत नसत. मॉस्कोमध्यें ठरलेल्या त्या त्या वेळच्या धोरणानुसारच वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या आपल्या चोपड्यांतील किंवा पत्रकांतील प्रचार असतो, आपल्या तोंडीं असलेल्या घोषणा म्हणजे त्या धोरणाचेच पडसाद होत ही गोष्ट ते कदापि मान्य करीत नसत.

### कम्युनिझम विरुद्ध धर्म

ज्या देशांतील ऐंशी टक्के प्रजा कॅथलिक आहे अशा देशांत, जिचें ध्येयधोरण मूलतः कम्युनिस्ट आहे अशी हक्‌स्‌सारखी संघटना कशी फोफावूं शकते, असा प्रश्न नेहमीं विचारला जातो. या प्रश्नाचें उत्तर अगदीं सोपें आहे. या संघटनेचे आधारस्तंभ, निष्णात आणि निष्ठावंत नेते कम्युनिझमचे

शिक्षण देणाऱ्या तरबेज गुरूच्या हाताखालीं शिकून तयार झालेले होते. कांहींजणांचें शिक्षण तर क्रेमलिनच्या देखरेखीखालींच झालेलें होतें. हे 'तज्ज्ञ' लोक मध्य-लुझॉनमधील शेतकरी जनतेंत करावयाच्या प्रचाराला चुकूनही नास्तिकपणाचा वास येऊं देत नसत. वास्तविक हा भाग म्हणजे कम्युनिझमला पोषक अशीच भूमि होती. आधीं धार्मिक संस्थांच्या आणि नंतर त्यांच्या मागून आलेल्या बड्या श्रीमंत जमीनदारांच्या-ऐतखाऊ सरंजामशाही जमीनदारांच्या-पिढ्यान्‌पिढ्यांच्या अनुभवानें तिथल्या शेतकऱ्यांची मनोभूमि तयार झालेली होती. पण लुझॉनमधील प्रचारांत हक् नेत्यांनीं कधींच आपल्यामागील प्रेरक शक्ति रशिया आहे हें दिसूं दिलें नाहीं किंवा बाहेरच्या जगाला तसें भासूं दिलें नाहीं. गरीब बिचाऱ्या जनतेचे आपण उद्धारकर्ते आहोंत–बस्! यापेक्षां आपला निराळा कांहींच उद्देश नाहीं असेंच ते नेहमीं भासवीत असत.

अशा रीतीनें त्यांनीं जनतेचें लक्ष वेधून घेतलें. युद्धाच्या अखेरीला आपल्या पदरांत खूपसें पडेल अशी अपेक्षा ज्यांनीं बाळगिली होती, पण ज्यांच्या पदरांत फारच थोडें पडलें किंवा कांहींच पडलें नाहीं अशा लोकांच्या विरून चाललेल्या आशा त्यांनीं पुनरुज्जीवित केल्या. सरकारी यंत्रणेंतील गैरप्रकार, 'निवडणुकीच्या थोतांडांत' होणारा मतदारांचा विश्वासघात, वगैरे गोष्टी म्हणजे या कम्युनिस्ट नेत्यांच्या प्रचाराचीं साधनें होतीं. आणि या साधनांचा परिणामकारक उपयोग ते क्रेमलिनकडून आत्मसात् केलेल्या कौशल्यानें, सत्ता काबीज करण्यासाठीं करीत असत. प्रत्येक गोष्ट भडक स्वरूपांत ते रंगवीत. प्रत्येक परिस्थितीचा आपल्या प्रचारासाठीं उपयोग करून घेत. जनतेविषयींचें कर्तव्य न बजावणाऱ्या सरकारविरुद्ध जनतेला भडकविण्यासाठीं छापील पत्रकांद्वारें आणि तोंडीं प्रचाराद्वारें ते सर्व प्रकारें प्रयत्न करीत. विद्यमान राजवटीचें अपयश हें लोकशाहीचेंच अपयश आहे असा प्रचार हक संघटना करीत असे.

ज्यांनीं लोकशाहीसाठीं लढा दिला होता आणि लोकशाही राजवट टिकावी म्हणून पूर्वी जे प्राणार्पण करायला सज्ज होते अशा लोकांना सरकारविरुद्ध उठविण्याचा डाव कम्युनिस्टांनीं सुरूं केला होता.

कम्युनिस्टांचें हें तंत्र सुपरिचित आहे. चीनमध्यें याच पद्धतीचा अवलंब करण्यांत आला आणि त्याच वर्षी चीनचा पाडाव झाला.

## हक संघटनेची अनुयायी मिळविण्याची पद्धति

हक संघटनेच्या सैनिकांच्या दरोडे घालणाऱ्या टोळया बनविण्यांत आल्या होत्या. आपल्या या भूमीला चांगले दिवस आणणारें स्थित्यंतर घडून यावें या उद्देशानें युद्धकालांत लुटारूपणा आणि खुनाखुनी करण्यास ज्यांना शिकविलें गेलें होतें, पण युद्धानंतर ज्यांना अपेक्षित असें कांहींच स्थित्यंतर दिसलें नव्हतें असे निराश तरुण माजी सैनिक या टोळयांत सामील झाले होते.

जपानी आक्रमणाच्या काळांत तुरुंगांतून पळालेले किंवा जपान्यांनीं मुक्त केलेले गुन्हेगारही त्यांना येऊन मिळाले होते. बलात्कारी, खुनी, गुन्हेगार, अशा सर्व प्रकारच्या लोकांना हक संघटनेनें उभारलेल्या लाल पथकांत स्थान मिळालें, आणि हे लोक, गोंधळून गेलेल्या शेतकरी समाजाला दिवसेंदिवस द्रुत गतीनें पसरत चाललेल्या कम्युनिस्ट सत्तेपुढें नमायला भाग पाडण्यासाठीं सामदामदंडभेद या साऱ्या उपायांचा अवलंब करीत.

अशा रीतीनें जनतेला वश करण्याचें जें कार्य जपान्यांना साधलें नाहीं तें साधण्यांत हक्स् यशस्वी झाले. उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांत बोकाळलेली लांचखोरी त्यांना मोठ्या प्रमाणावर साहाय्यक ठरली. या लांचखोरीमुळें, विद्यमान सरकार टिकविण्याच्या लायकीचें नाहीं ही जनतेंतील भावना वाढत गेली, आणि हक संघटनेचें सामर्थ्य आणि संख्याबल वाढत गेलें. लोक या संघटनेच्या लोकांना संरक्षण देत, त्यांना अन्नपुरवठा करीत,—केवळ भीती-मुळें नव्हे, तर निराशेनें बेदरकार बनून हक्स्च्या लोकांना ते मदत करीत.

खरें पाहतां, हक् संघटनेचें लष्कर संख्याबलानें कधींच प्रचंड नव्हतें. लुझॉनमध्यें, त्यांच्या चळवळीच्या ऐन भरभराटीच्या काळांत, या दलाची शस्त्रसज्ज सैनिकांची संख्या वीस हजार होती. नंतरच्या अंदाजाप्रमाणें अखिल देशांतील या संघटनेचें संख्याबल साठ हजाराच्या घरांतच होतें. दोन कोटी दहा लक्ष लोकसंख्येच्या मानानें ही संख्या कांहीं तशी फार मोठी

नव्हती. पण कम्युनिस्टांच्या आक्रमणाची सुरुवात फार मोठ्या संख्येनिशीं कधींच होत नसते. श्वेत रशियाभर तांबडा रंग किती झपाट्यानें पसरला तें आम्हीं पाहिलेलें होतें. त्यावरून अल्पसंख्य गटाचें सामर्थ्य कमी लेखूं नये हा धडा आम्ही शिकलों होतों.

जनतेची विशिष्ट मनोवृत्ति हीच खरोखर धोक्याची बाब होती. मनीलाच्या आसपास चाललेल्या हक संघटनेच्या चळवळीचें सामर्थ्य, मध्य लुझॉनच्या समृद्ध भात-शेतीच्या क्षेत्रांत वसणाऱ्या दोन लाख शेतकऱ्यांकडून त्या संघटनेला जो निमूट, कित्येकदां सक्रिय आणि नेहमींच खुषीचा पाठिंबा मिळे त्यांत होतें.

या संघटनेचे नेते अत्यंत चलाख होते. सर्व शेतकरी वर्गाचा उठाव घडवून आणण्यापेक्षां गुप्त हालचाली करण्याच्या कलेंत ते कमालीचे तरबेज होते. त्यांच्या कार्याचें स्वरूप आडवळणाचें असे. चीनमधील त्यांच्या सहधर्मीयांनीं अवलंबिलेल्या पद्धतीनुसार त्यांनीं शेतकऱ्यांच्या संघटना बन-विल्या; लायक लोकांना सरकारी कामकाजाचें शिक्षण देऊन तयार केलें, आणि त्यांना लटपटी खटपटी करून सरकारी नोकऱ्यांत घुसविलें. अशा रीतीनें लौकरच अशी परिस्थिति निर्माण झाली कीं मनीलासुद्धां सर्व महत्त्वाच्या शहरांत सरकारी यंत्रणेंत कम्युनिस्टांचीं माणसें स्थानापन्न झालीं. कम्युनिस्ट क्रांतीचा उठाव होतांच सारीं सूत्रें हातीं घेण्याला विपुल माणसें सज्ज होतीं. मेयरचीं आणि स्थानिक नगरपालिकांचीं कामें हातीं घेण्याला, सरकारी पोलिस दलाचीं सूत्रें हातीं घेण्याला त्यांचीं माणसें सरकारी यंत्रणेंतच घुसून ठाण मांडून बसलेलीं होतीं. सारांश, टेलिग्राफपासून तों नभोवाणीपर्यंत सर्व प्रकारचीं दळणवळणाचीं साधनें नियंत्रित करून सरकारी कारभार हातीं घेतां यावा इतकी त्यांची तयारी झालेली होती.

१९५० साल उजाडेपर्यंत हक संघटनेचें सामर्थ्य कळसाला पोहोंचलें होतें. या संघटनेचे अनुयायी उजळ माथ्यानें, स्वेच्छया देशाच्या काना-कोपऱ्यापर्यंत, अगदीं आडबाजूच्या दूरवरच्या दक्षिण विभागापर्यंत पोहोंचले होते. त्याबरोबरच सरकारी यंत्रणेंतील लांचखोरीही कळसाला पोहोंचली होती आणि सरकारची इभ्रत संपूर्णतः रसातळाला गेली होती. सरकारची पत

औषधालाही शिल्लक उरली नव्हती. पेसो ( फिलिपीन्सचें नाणें ) गडगडणार अशा अफवा उठत होत्या आणि सर्वांत कटु घटना म्हणजे नवजात प्रजासत्ताकाचा विकास व्हावा म्हणून अमेरिकेनें जनतेला दिलेली दोन अब्ज डॉलर्सची रक्कम त्या कामीं खर्ची पडण्या ऐवजीं सरकारी संरक्षणखालीं चाललेल्या लांचखोरींत गडप झाली होती. खुद्द देशाचा खजिना कधींच लाचखोरीपायीं रिता झालेला होता. शहरांतून आणि खेड्यांतून लाल दहशतवादी मनास येईल तसा धुडगूस घालीत होते. जपानी आक्रमणाविरुद्ध वापरण्यासाठीं या देशांत सांठवून ठेवलेला विपुल दारूगोळा त्यांना लाभला होता. सरकारी अधिकाऱ्यांच्या कृष्णकारवायांपायीं, गैरव्यवहारापायीं तो सारा दारूगोळा कम्युनिस्टांच्या हातीं पडला होता. या हक संघटनेला आशियाच्या मुख्य भमीवरून पाणबुड्यांच्या साह्यानें किंवा गांवठी गलबतांवरून दारूगोळ्याचा पुरवठा केला जात होता असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपल्या सोव्हिएट धन्याकडून त्यांना अशा मदतीची जरुरीच नव्हती. जो दारूगोळा सरकारी शस्त्रागारांत सुरक्षितपणें सांठवून ठेवला जावयाचा तो सरकारी अधिकाऱ्यांच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळें लुझॉनच्या दुर्गम जंगलांतील आणि डोंगरांतील गुप्त ठिकाणीं केव्हांच जाऊन दडलेला होता. हक संघटनेंतील अंतर्वर्तुळांतील हट्टवादी नेते अगदीं शेवटच्या क्षणींही आपल्याकडील अमेरिकन शस्त्रें सरकारच्या हवालीं करण्यास तयार झाले नाहींत याचें कारण हेंच होतें. कारण, त्यांना हें पूर्णपणें माहीत होतें कीं त्या शस्त्रांसाठीं लागणारा अमेरिकन दारूगोळ्याचा कधींही न संपणारा सांठा आपल्याजवळ आहे.

साऱ्या द्वीपसमूहावर एक प्रकारची भीतीची छाया पसरली होती. कोणतेंही स्थित्यंतर घडण्यापूर्वींचा सभय प्रतीक्षेचा काळ असतो तसें सारें वातावरण भीतीनें भारलेलें होतें. खेडींपाडीं ओस पडलीं होतीं. झोपड्या निर्मनुष्य झाल्या होत्या, शेतकरी शेतांत काम करीत नव्हते. भाताचीं उभीं पिकें धुळीला मिळत होतीं आणि लोक उपासमारीनें तळमळत होते. खेड्यांतील लोक शहरांकडे पळ काढीत होते. मनीलामध्यें कम्युनिस्टांच्या पोलिट ब्यूरोनें आपल्या कम्युनिस्ट परंपरेला अनुसरून मुख्य छावणी थाटली होती. हक

संघटनेचे नेते सारीं सूत्रें हलवीत होते. सचिवालयाचा ताबा घेऊन राष्ट्राध्यक्षाला अटक करायची आणि नंतर सर्व शहरावर काबू करायचा अशा निश्चित योजना आंखल्या जात होत्या. मनीलाच्या रस्तोरस्तीं दहशतीचें वातावरण पसरलें होतें. हक्स्‌च्या लुटारू टोळ्यांच्या भीतीनें शहराच्या विशिष्ट भागांत रात्रीं अपरात्रीं हिंडण्याफिरण्याचें धाडस लोक करीतनासे झाले. हक संघटनेनें आपल्या योजनेची चांगलीच जाहिरात केली होती : आणखी एका वर्षांत आम्ही वीस लाख सभासद करणार आणि मग—मग, फिलिपीन्सचे सत्ताधारी आम्हीच !

फिलिपीन्समधील लोकशाही मृत्युशय्येवर पडलेली होती आणि कम्युनिस्ट हक संघटनेचीं दलें तिच्यावर शेवटचा घाव घालण्याची जोरांत तयारी करीत होतीं.

या सर्व गोष्टी सरकारी सैन्याधिकाऱ्यांना माहीत होत्या. लष्करी दलांतील अगदीं उदासीन अधिकारीसुद्धां त्या घटकेला म्हणूं लागले होते कीं, कांहीं तरी भयंकर घडणार खास. राष्ट्राध्यक्ष क्विरिनो यांच्याभोंवतीं कडक संरक्षक पहारा होता. आपल्या जिवाला धोका आहे या अखंड धास्तींत त्यांना वावरावें लागत होतें. हक्स् सत्ता केव्हां काबीज करतील याचा नेम नव्हता. तो केवळ कालावधीचाच प्रश्न होता.

* * *

युद्धानें जिंकलेली शांतता चिरस्थायी करण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न जागतिक आघाडीवर चालू होते. पण कोरियांत, चीनमध्यें, मलायांत, इंडोचीनमध्यें शांतता नव्हती. त्याचप्रमाणें शांतता नव्हती आमच्या फिलिपीन्समध्यें.

त्याच वर्षीं राष्ट्राध्यक्ष क्विरिनो यांनीं मला, आंद्रे व्हिशिन्स्कीशीं संयुक्त राष्ट्र संघटनेंत चालू असलेलीं वाग्युद्धें थांबवून, फिलिपीन्समध्यें भरणाऱ्या पहिल्या आग्नेय आशिया परिषदेची तयारी करण्यासाठीं व या परिषदेला फिलिपीन्सचा मुख्य प्रतिनिधि म्हणून उपस्थित राहाण्यासाठीं पाचारण केलें. फिलिपीन्समधील बाग्विओ या थंड हवेच्या स्थळीं ही बैठक भरली. भारत, थायलँड, सिलोन, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया आणि फिलिपीन्स या सात राष्ट्रांनीं भाग घेतला होता. आशियायी एकतेच्या या प्रयत्नाला मदत

मिळवण्याच्या आशेनें मी वॉशिंग्टनमध्यें कित्येक उंबरठे झिजविले. पण जिथें तिथें मला वाटाण्याच्या अक्षताच मिळाल्या. आशियांतील राष्ट्रांच्या अशा बैठकीचें महत्त्व वॉशिंग्टनमधील कोणालाच त्या वेळीं वाटत असलेलें दिसलें नाहीं. कित्येक अमेरिकन नेते तर मला म्हणाले, " ही कल्पना अव्यवहार्य आहे. अशी गोष्ट घडणं शक्य नाहीं. "

पण आणखी चारच वर्षांनीं याच लोकांनीं, त्या क्षणापर्यंत स्वतंत्र राहिलेल्या मूठभर आशियायी देशांची तशीच संघटना घडवून आणण्याचा प्रयत्न घाईघाईनें पण फार उशीरां सुरू केला.

आमचा पहिलाच प्रयत्न यशस्वी झाला असता तर?–तर इंडोचीनचा बचाव खात्रीनें झाला असता.

पॅसीफिक ओलांडून मी अमेरिकेंतून जेव्हां जेव्हां फिलिपीन्समध्यें येई तेव्हां तेव्हां फिलिपीन्समधील घटनांची अधिकाधिक कल्पना मला येई. म्हणूनच त्याच सालांत जेव्हां राष्ट्राध्यक्ष क्विरिनो यांनीं मला परराष्ट्र-मंत्रिपद स्वीकारण्यासाठीं मनीलाला परतण्याचा आदेश दिला तेव्हां मी तें खातें हातीं घेण्याला एका पायावर तयार झालों. संयुक्त राष्ट्र संघटनेंत व्हिशिन्स्कीशीं होणाऱ्या वाग्युद्धामुळें सोव्हिएट संकटांची मला इतकी चांगली जाणीव झाली होती कीं, माझ्या मायभूमीच्या आघाडीवर कम्युनिझमविरोधी संग्रामाला हातभार लावण्याच्या या संधीचें मी स्वागतच केलें.

★ ★ ★

## प्रकरण ५ वें : : फिलिपीन्समधील ' हिस–प्रकरण '

संयुक्त राष्ट्र संघटनेंत रशियन प्रतिनिधींशीं अनेक वाग्युद्धें केल्यामुळें, फिलिपीन्समध्यें पाय रोवून बसलेल्या कम्युनिझमला आव्हान देण्याचें धाडस करण्याच्या दृष्टीनें माझी चांगलीच तयारी झालेली असायला पाहिजे होती. पण दुर्दैवानें तसें झालें नव्हतें. माझ्या मायदेशांत कम्युनिस्टांनीं आपलें जाळें इतक्या मोठ्या प्रमाणांत पसरलेलें असेल, आपलीं उद्दिष्टें धूमधडाक्यानें जाहीर करण्याइतका बेडरपणा दाखवायची हिंमत त्यांच्यांत आलेली असेल आणि तीं उद्दिष्टें पार पाडण्याचें इतकें सामर्थ्य त्यांच्यांत आलें असेल याची मला कल्पनाच नव्हती.

जपान्यांनीं केलेले अत्याचार मी स्वतः पाहिले होते. पण लाल निशाणा-खालीं फिलिपीनो लोक आपल्याच बांधवांवर जे अत्याचार करीत होते त्यांची कल्पना मला आलेली नव्हती. आमचें प्रजासत्ताक दुभंगून टाकण्याचा डाव कम्युनिस्टांनीं पुरेपूर साधला होता. कित्येकांना दहशतवादानें नमविण्यांत आलें होतें. तसे जे नमले नाहींत त्यांना हक्स् राजवटींत संरक्षण आणि सुखसोयी उपलब्ध करून देण्याचीं आश्वासनें देऊन खुषामतीनें वळविण्यांत आलें होतें. याबाहेर असलेले असंख्य लोक, कोण आले नि कोण गेले याविषयीं बेफिकीर बनलेले, गलथान असे होते.

बातानच्या आणि कॉरिजिडॉरच्या आघाडीवर खांद्याला खांदा लावून लढलेले लोक एकमेकांचे शत्रू बनावेत, एकमेकांचे गळे कापायला तयार व्हावेत आणि तेही इतक्या अत्यल्प काळांत !– मला ती कल्पनाच करवत नव्हती. पण, कम्युनिझमचें सामर्थ्य तें हेंच आहे. बुद्धि आणि विवेक संपूर्ण खची करून द्वेषभावनाच तेवढी जागती कशी ठेवावी हें त्यांना माहीत आहे. लोकांची दिशाभूल कशी करावी, वातावरण दूषित कसें करावें हें त्यांना चांगलें अवगत आहे, आणि हें सारें रशियाचा प्रत्यक्ष हस्तक्षेप न

होतां घडून आलेलें होतें आणि तशा हस्तक्षेपाची आवश्यकताच नव्हती. लाल दहशतवादाचे फिलिपीनो अनुयायी रशियाचें काम चोखपणें बजावीत होते.

## चोरप्रवेश करण्याचें हक संघटनेचें तंत्र

अमेरिकन जनतेला जॉर्ज वॉशिंग्टन यांची स्मृति जशी पवित्र, आदरणीय वाटते तशी फिलिपीनो जनतेला क्विझॉन यांची स्मृति पवित्र वाटते. त्यांची जयंती आम्ही एक राष्ट्रीय दिन म्हणून साजरी करतों. मनीला येथें मोठ्या प्रमाणावर सैन्याची परेड होते. हक्सूनीं सरकारच्या प्रत्येक खात्यांत, खात्यांच्या शाखोपशाखांत अत्यंत उच्च अधिकारापर्यंतही कसा चोरटा प्रवेश केलेला होता याचें एकच उदाहरण सांगतों. एका क्विझॉन जयंतीला, राष्ट्राध्यक्ष क्विरिनो आणि इतर उच्चाधिकारी, मंत्री वगैरे लष्करी कवाईत पहाण्यासाठीं उंच व्यासपीठावर बसलेले होते. इतक्यांत, कशीं कोण जाणे, आमच्या हातीं कांहीं पत्रकें या हातांतून त्या हातांत अशा पद्धतीनें आलीं; आणि तीं पत्रकें जेव्हां निरखून पाहिलीं गेलीं तेव्हां आमच्यांत कडाक्याची चर्चा सुरू झाली. हीं पत्रकें वांटायला सुरुवात कोणीं केली ?

अखेरपर्यंत या गोष्टीचा पत्ताच लागला नाहीं.

हीं पत्रकें हक् संघटनेचीं प्रचारपत्रकें होतीं. क्विरिनोचा कारभार आणि राज्यघटना यांवर आरोप–टीका करणारीं हीं पत्रकें होतीं आणि त्यांत नॅशनल बॅंकेसकट सरकारी कारभारांतील गैरप्रकारासंबंधींच्या खऱ्याखोट्या प्रवादांचीं माहिती अगदीं नांवनिशीवार देण्यांत आली होती. या पत्रकांतील यादींत, व्यासपीठावर राष्ट्राध्यक्षांच्या आंवतीभंवतीं बसलेल्या कित्येक उच्चपदस्थांचीं नांवें होतीं.

व्यासपीठावर हीं पत्रकें गुप्तपणें कोणीं आणलीं हें आम्हांला कधींच कळलें नाहीं, पण इतकें मात्र खास कीं, तीं प्रसृत करणारा इसम राष्ट्राध्यक्षांच्या अंतर्वर्तुळांतलाच कोणी तरी असला पाहिजे.

त्या कालांत जिथें पाहावें तिथें कम्युनिस्ट दृष्टीला पडत असत. अनेक प्रकारच्या भूमिकांत ते वावरत, अनेक प्रकारचे मुखवटे त्यांनीं घेतलेले होते,

पण त्या आवरणाखालीं मॉस्कोच्या शिकवणीनें बाणलेला एकच एक भयंकर निर्धार लपलेला होता.

मी रॉबेर्टोबद्दल लिहिलेलेंच आहे. न्यूयॉर्क येथील फिलिपीन्सच्या राजनैतिक कचेरींत माझा हंगामी मदतनीस म्हणून या तरुणाची खास निवड मीं केली होती. नवी दिल्ली, जिनीव्हा, रोम, पॅरिस इत्यादि ज्या ज्या शहरीं मी कामगिरीवर गेलों होतों तिथें तिथें तो माझ्याबरोबर होता. आतां मी परराष्ट्रमंत्री असल्यामुळें पुनः त्याला माझ्या हाताखालीं मीं मोठ्या आनंदानें घेतलें. कारण परराष्ट्रीय खात्याच्या कामकाजाची त्याला चांगली माहिती होती आणि त्याचा उपयोगही मला फारच चांगला होत असे. तथापि अद्याप त्याचा दर्जा बिनसरकारीच होता. तो चलाख होता, हौशी होता, माझ्या खात्यापुढील प्रश्नांचें त्याला चांगलेंच ज्ञान होतें. त्यामुळें पूर्वीप्रमाणेंच आतांही तो माझा एक महत्त्वाचा बिनसरकारी मदतनीस होता. त्यानें आग्नेय आशिया परिषदेच्या वेळीं अत्यंत चोख कामगिरी बजावली होती. त्याच्याइतकाच मला अगत्याचा वाटणारा आणखी एक तरुण होता. त्याचें नांव मॅन्युएल होतें असें गृहीत धरूं या. मॅन्युएल हा रॉबेर्टोचा मित्र होता. रॉबेर्टोनेंच त्याला माझ्याकडे आणलें होतें. माझ्या परदेशांतील कामगिरीच्या वेळीं त्याचा विशेष उपयोग होईल, मदतनीस म्हणून तो अमोल ठरेल अशी जोरदार शिफारस रॉबेर्टोनें केली होती.

१९५० मध्यें बाग्विओ येथें भरलेल्या आग्नेय आशिया परिषदेच्या वेळीं दोघेही माझ्याबरोबर होते. जागरूक, बुद्धिमान असे हे तरुण माझ्या खाजगी कचेरींत निःसंकोचपणें वावरत. पत्रव्यवहार, खलिते, त्यांच्या नजरेखालून जात. राष्ट्राध्यक्ष-निवासाजवळील मॅन्शन हौसमध्यें त्यांचें निर्वेध जाणेंयेणें असे. अतिपूर्वेंतील स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं धडपडणाऱ्या देशांच्या वकिलांच्या आणि राजनैतिक प्रतिनिधींच्या ते भेटीगांठी घेत. या दोन हुषार तरुणांविषयीं मी फार मोठमोठे बेत आंखीत होतों.

एक दिवस दुपारीं मी सरकारी कामासाठीं वॉशिंग्टनला प्रयाण करण्याची तयारी करीत होतों. माझ्याबरोबर मॅन्युएल येणार होता. इतक्यांत माझ्या कचेरींत दोन व्यक्ति मला भेटायला आल्या. एक व्यक्ति मध्यवर्ति हेर-

खात्यांतील अधिकारी असून दुसरी व्यक्ति नॅशनल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन या खात्यांतील अधिकारी होती. अमेरिकेच्या एफ्. बी. आय. प्रमाणेंच ही फिलिपीन्सची नॅशनल ब्यूरो आहे. हे दोघे अधिकारी एकांतांत माझ्याशीं बोलूं इच्छीत होते. बोलतांना ते अतिशय गंभीर झाले होते.

" जनरल, आपल्या परराष्ट्रीय खात्यांत दोन कम्युनिस्ट आहेत याची आपल्याला कल्पना आहे का ?"

त्यांनीं रॉबेर्टो आणि मॅन्युएल यांचीं नांवें घेतलीं.

मी संतापलोंच. त्यांच्या विधानांचा जोरांत इन्कार केला–" त्या दोघांपैकीं एकजण संयुक्त राष्ट्र संघटनेंत माझ्या हाताखालीं होता. आणि दोघेही बाग्विओच्या आग्नेय आशिया परिषदेच्या वेळीं माझे मदतनीस होते!"

माझें बोलणें ऐकून घेऊन झाल्यावर त्या अधिकाऱ्यांनीं मला त्या दोघांविषयींच्या गुप्त माहितीच्या फायली दाखविल्या. त्या वाचल्यावर मात्र माझ्यापाशीं बोलायला शब्दच उरला नाहीं. या दोघां तरुणांना मी माझ्या मुलांप्रमाणें मानलें होतें. त्यांना सर्व प्रकारच्या संधी उपलब्ध करून दिल्या होत्या, त्यांच्या प्रगतीला हातभार लावावा म्हणून त्यांच्यावर विश्वासपूर्वक जबाबदाऱ्या सोंपविल्या होत्या; आणि तेच तरुण, आमच्या देशाच्या स्वातंत्र्याच्या रक्षणाचा हा अखेरचा मोका साधूं नये म्हणून प्रयत्न करणाऱ्या पक्षाचे निघावेत ना !

हिस प्रकरणाची ही पुनरावृत्ति होती.

मी असा कसा बनविला गेलों ? मागच्या गोष्टी मी आठवूं लागलों. रॉबेर्टोचे मित्र, त्याचीं मतें, त्याच्या हालचाली या सर्वांचें सिंहावलोकन मीं केलें. त्याची खुषमस्करी करून त्याला भुरळ पाडून कम्युनिस्टांनीं आपल्या गोटांत पुरा खेचला हें मी ओळखलें. पण आतां वेळ निघून गेली होती. माझ्या सूचना काय आहेत हें जाणून घेण्यासाठीं ते दोघे हेर थांबले होते. पण मी काय सूचना देणार होतों ? कोणत्याही सबबी सांगायला जागाच उरली नव्हती. त्या दोघांचें समर्थन करायलाही वाव नव्हता. आणि त्यांच्या विश्वासघातकी कारस्थानांत अजाणतां त्यांना माझ्याकडून झालेल्या साहाय्याचें

समर्थन तरी काय करणार? मी मान हलवून फक्त म्हणालों, "त्यांच्या बाबतींत काय करणं आवश्यक असेल तें करा."

आमच्याभोंवतीं काय चाललें आहे याची मला व्यक्तिशः मिळालेली ती पहिली चुणूक होती. कम्युनिस्टांचा शिरकाव जिथें तिथें झाला होता. शेजारच्या टेबलाशीं बसलेला, शेजारच्या खोलींत बसलेला, शेजारच्या खुर्चीवर बसलेला कोणताही इसम कम्युनिस्ट असण्याची शक्यता होती. हें असें कसें घडून आलें? त्यांचे पाश इतके दूरवर, खोल कसे पसरले गेले?

* * *

"ही क्रांति आहे"

१९५० च्या पानझडीच्या ऋतूंत कम्युनिस्टांच्या हक संघटनेच्या नेतृत्वाखालील बंडानें इतकें उग्र स्वरूप धारण केलें कीं, आम्ही खऱ्या अर्थानें म्हणूं शकलों, "होय, ही क्रांति आहे." सचिवालयांत बैठका भरूं लागल्या. फिलिपीन्सच्या बचावासाठीं काय केलें पाहिजे याची चर्चा सुरू झाली. सनदशीर सरकारवर चहूंबाजूंनीं रोखलेल्या भाल्यांमुळें राष्ट्राध्यक्ष क्विरिनो भीतीनें अस्वस्थ झाले. सरकारी यंत्रणेंत बदल झाला पाहिजे या जनतेच्या वाढत्या मागणीची दखल घ्यायचें त्यांनीं अखेर ठरविलें आणि हक्सच्या उपद्रवाचीं पाळेमुळें खणून काढण्याची जबाबदारी स्वीकारूं शकेल असा माणूस राष्ट्रीय संरक्षण खात्याचें मंत्रीपद स्वीकारण्यासाठीं मिळतो का याची शोधाशोध त्यांनीं घाईघाईनें चालवली.

* * *

नेहमीं कांहीं तरी कृति करण्याला उत्सुक असलेल्या मॅगससाय् यांना स्वतःबद्दल खात्री होती कीं, ही कामगिरी बजाविण्याला आपणच योग्य आहों. त्यामुळें त्यांचें मत अजमावण्यासाठीं राष्ट्राध्यक्षांनीं जेव्हां त्यांना पाचारण केलें तेव्हां ते हक्सच्या बंदोबस्ताची आपली योजना घेऊनच हजर झाले. राष्ट्राध्यक्षांनीं त्यांची योजना मंजूर केली आणि तिची अंमलबजावणी करण्याचें कामही त्यांच्यावरच सोपविलें. अखेर रॅमॉन मॅगससाय् यांची राष्ट्राध्यक्षांनीं राष्ट्रीय संरक्षण खात्याचे मंत्री म्हणून नेमणूक केली. त्यावेळीं मॅगससाय् ह्यांची फारशी कोणाला माहिती नव्हती.

मी परराष्ट्रमंत्री या नात्यानें वॉशिंग्टनला आर्थिक मदत मिळविण्यासाठीं जावें असें मॅगससाय् यांनीं राष्ट्राध्यक्ष किरिनो यांना सुचविलें. पैसे मिळविण्या-बरोबरच, लोकशाही राष्ट्र म्हणून जगण्याची फिलिपीन्सची ही अखेरची सुसंधि कम्युनिझमरूपी कॅन्सर पोखरून टाकीत आहे याची जाणीव मीं अमेरिकेला करून द्यावी हाही माझ्या कामगिरीचा एक भाग होता.

मी वॉशिंग्टनला जाऊन अमेरिकेचे संरक्षणमंत्री जनरल जॉर्ज मार्शल यांच्यापुढें आमच्या योजना सादर केल्या. त्यांनीं जनरल हॉब्ज यांना तांतडीनें मनीलाहून वॉशिंग्टनला तारेनें बोलावून घेतलें. ज. हॉब्ज यांनीं माझ्या म्हणण्याला पाठिंबा दिला. कॉंग्रेसकडून रक्कम मंजूर होण्याची वाट पाहत जर आम्ही थांबलों तर संधि गमावल्यासारखें होईल, आमच्या हक्क-विरोधी मोहिमेचा जोर ओसरून जाईल, असें मी मार्शल यांना सांगितलें.

जनरल मार्शल यांनीं सैन्याधिकाऱ्यांच्या प्रमुखांशीं, राष्ट्रीय सुरक्षितता समितीशीं आणि अमेरिकेचे त्यावेळचे अध्यक्ष ट्रूमन यांच्याशीं विचार-विनिमय केला. संरक्षण खात्यांतून एक कोटि डॉलर्सची उचल करण्यांत आली आणि ते पैसे मॅगससाय् यांच्याकडे त्यांना योग्य वाटेल त्या प्रकारें खर्च करण्यासाठीं सुपूर्द करण्यांत आले.

या रकमेपैकीं पैन् पैचा विनियोग प्रामाणिकपणें होईल याबद्दल युनायटेड स्टेट्स्च्या सरकारची खात्री होती.

अशा रीतीनें, १९५० सालीं, फिलिपीन्समधला नवा शत्रु जो कम्युनिझम त्याच्याशीं आम्हांला लढतां यावें व त्याचबरोबर अतिपूर्व भागांत 'युनायटेड स्टेट्स्च्या साम्राज्यशाही' विरुद्ध रशियन प्रचार जो चालू होता त्याचें निर्मूलन करतां यावें यासाठीं अमेरिकेनें ही मदत केली होती.

पुनः एकदां फिलिपीनो आणि अमेरिकन लढवय्ये खांद्याला खांदा लावून लढूं लागले. आशियाच्या रणभूमीवरील हें बचावयुद्ध मोठें गौरवास्पद नव्हतें. लाखो लोकांच्या मनाला विळखा घालून बसलेल्या राक्षसी विचार-प्रणालीच्या अष्टपाशाचा नायनाट करण्यासाठीं करावयाचा हा एक किचकट, शेतांतील तण उपटून काढण्याच्या कामासारखा, कंटाळवाणा झगडा होता.

पण कांहीं झालें तरी तें युद्धच होतें. मात्र कामावरून परत आल्यावर

आपल्या घरापुढील बागेंत स्वस्थपणें काम करणाऱ्या सर्वसामान्य अमेरिकन नागरिकाला त्यावेळीं कल्पनाही नसेल कीं, आपल्या बागेंत आपल्याला निर्वेधपणें काम करतां यावें यासाठीं आपल्या देशानें फिलिपीन्सच्या भूमीवरील सर्वंकष युद्धाला मदत दिलेली आहे.

एक कोटि डॉलर्सच्या त्या मदतीनें हक्सविरोधी मोहिमेला एकदम जोरदार चालना दिली. पण त्याचबरोबर हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, या कम्युनिझमविरोधी संग्रामापायीं आमच्या राष्ट्रीय उत्पन्नांतील एक तृतीयांश भाग खर्ची पडत होता. जीवनमरणाचा झगडा करणाऱ्या दरिद्री नवजात राष्ट्राला एवढा मोठा भूर्दंड कम्युनिझममुळें सोसावा लागावा ही फारच कठोर शिक्षा होय. प्रजासत्ताक म्हणून जगणें कम्युनिस्टांनीं फिलिपीन्सला अशक्यप्राय करून सोडलें होतें आणि प्रकरण इतकें पुढें गेल्यानंतर फिलिपीन्सचा बचाव करण्याचें सामर्थ्य फक्त रॅमॉन मॅगससाय् यांच्या ठिकाणींच होतें. कारण त्यांच्या ठिकाणीं धडाडी आणि प्रामाणिकपणा हे दोन्ही गुण होते.

मॅगससाय् यांनीं चाळीस हजार सैनिकांना पुनः संघटित आणि सुसज्ज केलें आणि जपान्यांवर ज्या धूमधडाक्यानें ते चालून गेले होते त्याच धूमधडाक्यानें ते आतां हक्स दलांविरुद्ध तुटून पडले. मॅगससाय् यांचा उत्साह आणि निर्धार जपानी किंवा हक संघटनेचे सैनिक यांच्या उत्साहाला आणि निर्धाराला मागें सारणारा होता. ते फक्त रात्रीची चारच तासांची झोप घेत. बाकीचा सारा वेळ ते या ना त्या आघाडीवर असत. शत्रूला ते उसंत मिळूं देत नसत. स्वतःच्या सैन्यांतील हटवाद्यांनाही वठणीवर आणीत.

* * *

मॅगससाय् यांची कार्यपद्धति धडाडीची होती, ठराविक चाकोरी सोडून ते पवित्रे टाकीत होते. आमच्या गोटांत कम्युनिस्टांनीं चोरप्रवेश केला होता ना ? मॅगससाय् यांनीं त्यांच्या गोटांत चोरून आमचीं माणसें घुसविण्याचें प्रतितंत्र अवलंबिलें. डोंगराळ मुलुखांत हक्सनीं आपले हेर शिकवून तयार करणारें केंद्र काढलें होतें. तसेंच हेर तयार करणारें केंद्र मॅगससाय् यांनींही स्थापन केलें. हक्स निरनिराळ्या प्रकारें वेषांतर करीत. ते कित्येकदां

स्त्रियांचा वेष घेत. आमच्या सैनिकांनींही प्रसंगीं स्त्रीवेष धारण करून कामगिऱ्या बजावल्या.

हक्सविरोधी मोहिमेचें स्वरूप बव्हंशीं परंपरागत युद्धासारखें असलें तरी शत्रूचा माग काढणें, त्यांच्या आघाडीवर टेहळणी करणें आणि हल्ले करणें या बाबतींत गनिमी तंत्राचा अवलंब करण्यांत येई. महायुद्धाच्या काळांत मॅगससाय् हे स्वतः गनिमी टोळ्यांचे एक निष्णात नेते होते. त्यांनीं या कलेंत अनेक सैनिकांना शिकवून तयार केलें. आमच्या पुष्कळशा हाल-चाली नागरिकांना विश्वासांत घेऊन त्यांच्या सहकार्यानें केल्या जात. सैन्यावर त्यांचा विश्वास पुनः बसतांच त्यांच्यांत धैर्य बाणलें. त्यामुळें शहरांतून आणि खेड्यांतून हेरांना हुडकून काढण्याच्या कामीं चांगलेंच यश येत गेलें. आमच्या हेरांकडून आलेल्या बातम्यांनुसार शत्रूच्या मागावर राहण्यासाठीं छुपीं पथकेंही पाठविलीं जात. हक्स दलांत आपलीं माणसें गुप्तपणें घुसवून त्यांच्याच तंत्रानें त्यांच्याशीं सामना देतां देतांच, आजवर हक्सना आसरा देणाऱ्या जनतेचा विश्वास मॅगससाय् यांनीं पुनः संपादन केला. त्यांनीं हक संघटनेंतील सैनिकांच्या कुटुंबियांशींही मैत्रीचे संबंध जोडले आणि "त्या देशद्रोह्यांना आसरा न द्याल आणि त्यांना सामुग्री पुरविण्याचें नाकाराल तर तुम्हांला पूर्ण संरक्षण देऊं," असें आश्वासन देऊन त्यांचीं मनें आपल्याकडे वळविलीं.

त्यानंतर मॅगससाय् यांनीं घोषणा केली कीं, जे हक सैनिक आपणहून शरण येतील त्यांना गुन्हामाफी मिळेलच, पण त्यांना पुनः नागरिकत्वाचा दर्जा दिला जाईल, आणि काम दिलें जाईल. सारांश नव्या जीवनाची संधि दिली जाईल.

या घोषणेनंतर हक सैनिक शरण येण्यास सुरुवात झाली. अशा सैनिकांशीं मॅगससाय् व्यक्तिशः बातचीत करीत. त्यामुळें ते त्यांचे मित्र बनले.

पकडलेल्या हक सैनिकांशींही त्यांनीं खेळीमेळीनें बोलून त्यांच्या मनांत स्वतःविषयीं स्नेहभाव निर्माण केला. या आपल्या नव्या मित्रांनीं पुनः हक दलांत जावें आणि तिथें आपले हेर म्हणून काम करावें यासाठींही त्यांनीं कित्येकांचीं मनें वळविलीं. बाकीच्या हक सैनिकांचीं पथकें तयार

-ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २०७८ वि: इतिहास
क्रमांक नों: दि.

करून त्यांना आपल्या पूर्वीच्या मित्रांविरुद्ध लढायला लावलें आणि हे माजी हक सैनिक पूर्वी हक दलांतून ज्या हिरिरीनें लढत त्याच हिरिरीनें आणि जोमानें आतां हक दलांविरुद्ध लढूं लागले. आणि आश्चर्य हें कीं, यांपैकीं एकाही माजी हक सैनिकानें मॅगससाय् यांचा विश्वासघात केला नाहीं.

संपूर्णपणें माजी हक सैनिकांचीच एक पलटण तयार करून मॅगससाय् यांनीं पानाय बेटावरील डोंगराळ भागांत असलेल्या हक दलाच्या सहाव्या विभागाच्या आश्रयस्थानावर हल्ला केला. या हक सैन्यविभागाचा प्रमुख वरिष्ठ कम्युनिस्ट नेता ग्विलेर्मो कापादोशिया हा होता. या ठिकाणीं कम्युनिस्टांनीं संरक्षणाची भक्कम तरतूद केली होती, टेकड्यांवर मोर्चे लावलेले होते, खंदक तयार केले होते. या ठिकाणीं त्यांनीं सोव्हिएट राजवटही सुरू केली होती. तथाकथित स्टालिन विद्यापीठें आणि शाळाही स्थापल्या होत्या. आमच्या पलटणीनें स्वारी करून कापादोशियाला पकडून ठार केलें आणि त्याच्या ‘ राज्यां ’ तील नागरिकांच्या लहान लहान तुकड्या चौफेर उधळून लावल्या. डोंगरपठारांत, गुरांचे कळप इकडून तिकडे हिंडतात त्याप्रमाणें त्यांच्यावर लपत छपत वणवण करण्याची पाळी आली.

आपल्या उरलेल्या अनुयायांसह तारुक अद्याप छपून राहिलेला होता. त्याच्या अनुयायांच्या संख्येला गळती लागलेली असली तरी त्याच्याकडे दुर्लक्ष करण्याइतका तो अजून निष्प्रभ झाला नव्हता. त्याचा धोका कायमच होता. तारुक व त्याच्या निकटचे अनुयायी वगळले तर कम्युनिस्ट दलें वेगानें रोडावूं लागलीं होतीं. तारुकचा गुरु लावा हा यापूर्वीच मरण पावला होता.

★ ★ ★

एका वर्षाच्या आंत मॅगससाय् यांनीं हुक बंडाचा इतका बीमोड केला कीं, आतां तें बंड म्हणजे एक मोठें राष्ट्रीय संकट राहिलें नव्हतें. फिलिपीन्स प्रजासत्ताकाच्या सुरक्षिततेला आणि स्थैर्याला लागलेला सुरुंग हें त्याचें स्वरूप नष्ट होऊन, एक ' उपद्रव ' इतकेंच मामुली राहिलें होतें. हुक्स टोळ्यांची माघार चालूच होती. त्यांतले कित्येक शरण येत होते तर कित्येक टोळ्यांत फाटाफूट चालू होती.

पुनः एकदां निर्भयपणें मनीलाच्या रस्त्यांतून हिंडणें आणि लुझॉनमधील रस्त्यांतून प्रवास करणें शक्य झालें होतें.

* * *

मानवी-संबंध-संशोधन संस्थेनें केलेल्या पाहाणीवरून आणि काढलेल्या निष्कर्षांवरून मॅगससाय् यांची खात्री पटली होती कीं, कम्युनिझमचा प्रश्न सोडविण्याचें प्रभावी साधन म्हणजे जमीन होय. पुष्कळसे हुक सैनिक हे कम्युनिझमचें तत्त्वज्ञान पटून कम्युनिस्ट बनलेले नव्हते. खंडानें आपल्याकडे असलेल्या जमिनी कसूनही ज्यांना पोटापुरतें धान्य स्वतःसाठीं ठेवतां आलें नव्हतें, ज्यांना स्वतःच्या मालकीची जमीन असण्याचें भाग्य कधीं लाभलेलें नव्हतें, आपल्या जमिनीवरील कर्जें फेडण्याचा प्रयत्न करूनही जे कर्जबाजारीच राहिले होते, ज्यांनीं कर्जापायीं जमिनी गमावल्या होत्या किंवा ज्यांच्या जमिनी अन्यायानें लुबाडल्या गेल्या होत्या, असे असंख्य शेतकरीच या हुक सैन्यांत बव्हंशीं होते.

मॅगससाय् यांना या प्रश्नाच यथार्थ स्वरूप पूर्णपणें कळून चुकलें.

कारण मॅगससाय् हे स्वतःच सामान्य शेतकरी वर्गांतून पुढें आलेले होते. आपल्या जमिनीविषयीं शेतकऱ्याला किती प्रेम वाटतें ह्याची त्यांना चांगली कल्पना होती. हीं माणसें कां लढतात ?—स्वतःची जमीन असावी म्हणून !

ही गोष्ट त्यांनीं ओळखली. फिलिपीन्सचा ग्रास करूं पहाणाऱ्या क्रांतीमागील मूलभूत प्रेरणा हीच होती.

आणि मॅगससाय् यांची खात्री पटली कीं कम्युनिझमचा पराभव बंदुकांनीं होणार नाहीं.

## ‘ भूमिहीनांना भूदान ’

या श्रद्धेनें प्रेरित झालेल्या मॅगससायुनीं हक्सचा प्रश्न सोडवण्यासाठीं नवें धोरण अवलंबिलें. हक्स संघटनेचें भूत ज्या परिस्थितीमुळें उभें राहिलें होतें, त्या परिस्थितीच्या मुळावरच त्यांनीं घाव घातला. सैन्याच्या पाठिंब्यानें त्यांनीं एडकॉर योजना ( आर्थिक विकासदल–इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कोअर ) आंखली. या योजनेचें उद्दिष्ट ‘ भूमिहीनांना जमिनी देणें ’ हें होतें.

हक संघटना ही ‘ शेतकी–सुधारणावाद्यांची संघटना ’ आहे हा जो कम्युनिस्टांचा दावा होता, त्याच्या मुळावरच घाव घालणारी ही योजना होती.

दक्षिण भागांत प्रवास करीत असतांना मिंडानाओ बेटांत विस्तृत पडित जमिनी असल्याचें मॅगससाय् ह्यांच्या दृष्टीस पडलें होतें. या जमिनींना कोणी मालक नव्हता. येथें वस्ती तुरळक होती. म्हणून त्यांनीं मिंडानाओ पुनर्वस्तीकरण योजनेची मुहूर्तमेढ रोंवली. त्यांनीं राष्ट्राध्यक्ष क्विरिनो यांच्याकडून या दक्षिण बेटावरील विस्तृत जमीन आणि कांहीं विशिष्ट आश्वासनें मिळवून हक सैनिकांच्या पुनर्वस्तीकरणाची मोहीम सुरू केली.

“ जे हक सैनिक शरण येतील आणि ज्यांची शांततामय जीवन जगण्याची प्रामाणिक इच्छा दिसून येईल त्यांना सरकार त्यांच्या कुटुंबासह आणि सामानासुमानासह प्रवासाचा खर्च देईल. त्याचप्रमाणें बियाणें, शेतीचीं अवजारें, वैरण वगैरे त्यांना पुरविलीं जातील. सरकार त्यांना राहाण्यासाठीं झोपड्या बांधून देईल आणि प्रत्येक कुटुंबाला पंचवीस एकर जमीन देईल. ही जमीन साफसूफ करून नांगरून लागवडीखालीं आणा–ती तुमची मालमत्ता ठरेल, तुमच्या वारसांकडे तिची कायमची मालकी जाईल,–” अशी घोषणा करण्यांत आली आणि ती घोषणा हक सैनिकांच्या कानापर्यंत पोहोंचेल अशी व्यवस्था करण्यांत आली.

या घोषणेबरोबर अपूर्व चमत्कार घडून आला.

हक सैनिकांच्या टोळ्या शेंकड्यांनीं सरकारी शिबंदी ठाण्यांत येऊन शस्त्रास्त्रें स्वाधीन करूं लागल्या. शिकाऱ्यांकडून पाठलाग होणाऱ्या जनावरांप्रमाणें डोंगराळ भागांत वणवण करणारीं, पोटासाठीं दरोडे घालणारीं, लूटमार करणारीं हीं माणसें, पुनः जीवन जगण्याची संधि मिळणार या रेडिओवरील आश्वासनांनीं फुलून निघालीं. अटकेची, तुरुंगवासाची भीति नाहीं; रस्त्यानें उजळमाथ्यानें हिंडण्याची चोरी नाहीं; मृत्यूचें भय नाहीं आणि या सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वतःच्या जमिनीचे मालक बनून कुटुंबासह राहाण्याची संधि मिळणार! इतकें आश्वासन मिळाल्यावर कोणता बंडखोर शरण येणार नाहीं?

* * *

जमीनसुधारणेच्या उपक्रमांत मिंडानाओचा प्रयोग अत्यंत यशस्वी ठरला. फिलिपीन्सच्या सुरक्षिततेसाठीं अशी सुधारणा योजना अत्यावश्यक आहे हेंच त्या प्रयोगानें सिद्ध झालें. हक दलांच्या छावण्या छावण्यांतून या प्रयोगाच्या यशस्वितेची वार्ता पोहोंचतांच हजारों हक सैनिक शस्त्रास्त्रें स्वाधीन करून, नवीन,—कायदा पाळून जगण्याची संधि देणारें—जीवन स्वीकारायला पुढें येऊं लागले.

ज्यांना शांततामय जीवन जगण्याची इच्छा होती, कायद्याच्या चौकटींत राहून उपयुक्त जीवन जगायला जे तयार होते, अशा हजारो माजी हक सैनिकांना 'एडकॉर' योजना नवजीवन देणारी ठरली आहे. आज ते आपल्या मालकीच्या शेतांतून विपुल पीक काढीत आहेत. त्यांच्या जीवनाचें स्वप्न साकार झालें आहे.

मुबलक अशा सुपीक जमिनीच्या बाबतींत फिलिपीन्स भाग्यवान आहे. ही जमीन, स्वतःच्या मालकीची जमीन असावी ही आस बाळगणाऱ्या लोकांना वांटून देण्यांत येत आहे आणि या लोकांत असंख्य माजी हक सैनिक आहेत. समाज-विकास-प्रकल्पासंबंधांत संयुक्त राष्ट्र संघटनेच्या तज्ज्ञांनीं तयार केलेल्या अहवालांत आमच्या 'एडकॉर' योजनेचा निर्देश आहे. गेल्याच वर्षी या

तज्ज्ञांनीं दक्षिण व आग्नेय आशियाचा पाहणी–दौरा काढला होता. फिलिपीन्समधील आजची सर्वांत यशस्वी योजना हीच आहे.

मॅगससाय् यांचा अंदाज खरा ठरला आहे. हक्सना जिंकण्याच्या कामीं बंदुकींच्या गोळ्यांपेक्षां, त्यांची मूळ अडचण समजून घेण्याचें साधें धोरण अधिक प्रभावी ठरलें आहे.

वॉशिंग्टनमध्यें परराष्ट्र खात्यापुढें केलेल्या एका निवेदनांत मॅगससाय् म्हणाले होते, "कम्युनिस्टांच्या कच्च्या साधनसामुग्रीचा नायनाट आम्ही आधीं केला पाहिजे. याचाच अर्थ भूमिहीनांना जमिनी दिल्या पाहिजेत. याला पर्याय म्हणजे जास्तींत जास्त कम्युनिस्टांना ठार करण्यासाठीं जास्तींत जास्त दारूगोळा वापरणें हा आहे. त्यांना मारण्यापेक्षां त्यांचें मतांतर करणें मी अधिक पसंत करतों."–त्याचें म्हणणें अक्षरशः योग्य ठरलें.

मॅगससाय् यांचें भाषण ऐकल्यानंतर एक अमेरिकन अधिकारी म्हणाला, "मॅगससाय् यांनीं आम्हांला केवळ एक चातुर्याची गोष्ट सांगितली आहे, असें नव्हे तर, ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वज्ञानाचें मर्म सांगितलें आहे."

याच त्यांच्या सिद्धान्तानें फिलिपीन्समधील कम्युनिस्ट क्रांतीचें निर्मूलन केलें आहे.

* * *

१९४५ सालापासून हक्स बंडाचा नेता असलेला लुई तारुक, फिलिपीन्समधील कम्युनिस्ट क्रांतीचें प्रतीक असलेला तारुक १७ मे १९५४ या दिवशीं पाम्पांगाच्या दलदलीच्या प्रदेशांतील आपल्या लपण्याच्या ठिकाणांतून एकटाच बाहेर आला आणि सैन्याच्या स्वाधीन झाला. तब्बल दहा वर्षें या माणसानें फिलिपीन्सवर बंडाची तलवार सतत लटकती ठेवली होती. त्याला जिवंत वा मृत पकडून देणाराला पन्नास हजार डॉलर्सचें बक्षीस लावलेलें होतें. आतां त्याची देहयष्टि कृश झाली होती, तो थकल्यासारखा दिसत होता, त्याचे डोळे निस्तेज झाले होते. ज्या ध्येयासाठीं तो झगडला होता त्याच्या अपयशानें त्याची संपूर्ण निराशा झाली होती. तो आनंदानें शरण आला होता.

तारुकची शरणागति म्हणजे लोकशाहीचा आणि त्याचबरोबर आतां राष्ट्राध्यक्ष असलेल्या मॅगससाय् यांचा अंतिम विजय होता. राष्ट्राध्यक्ष-

पदावर आल्यापासून अनेकदां मॅगससाय् यांनीं तारुकशीं वाटाघाटी घडवून आणून, शरणागति पत्करण्यासाठीं त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला होता. पण कुठें तरी कांहीं तरी बिनसत गेलें. अखेर तारुकला आपला शेवट जवळ आल्याचें कळून चुकलें. ज्याचे अनुयायी मारले गेले आहेत, किंवा पकडले गेले आहेत, किंवा त्याचा पक्ष सोडून लोकशाही पक्षाला जाऊन मिळाले आहेत असा हा एकाकी इसम अखेर कंदाब्राच्या दलदलीच्या प्रदेशांतून बाहेर आला आणि सरकारच्या स्वाधीन झाला. ज्यानें जनतेला अनेकदां चिथावणी दिली होती, त्याची आतां त्याच जनतेकडून उपेक्षा केली जात होती. आणि जनतेला ज्याच्या आधारावर तो भडकवूं शकेल असा असंतोषच मुळीं उरला नव्हता. आतां जनता त्याला आसरा देणें शक्यच नव्हतें. सैन्याचा गराडा पडलाच होता, तेव्हां ठार होण्यापेक्षां शरण जाणें बरें असा विचार तारुकनें केला आणि तो शरण आला.

## तारुकला झालेली शिक्षा : "अगदींच सौम्य"

मी हें लिहीत आहें त्याच वेळीं तारुकला बंडखोरीबद्दल बारा वर्षांची कैदेची शिक्षा झाली आहे. ही शिक्षा अगदींच सौम्य आहे अशी तक्रार खुद्द राष्ट्राध्यक्ष मॅगससाय् यांनीं केली आहे. बंडखोरीचा आरोप हा लुटालूट, खून या कोणत्याही आरोपापेक्षां भयंकर आहे. राष्ट्राध्यक्षांच्या मतें, बंडखोरी, लुटालूट, खून या प्रत्येक आरोपावरून तारुकवर खटला व्हावयास हवा होता. त्याप्रमाणें न्यायखात्यानें तारुकविरुद्ध नवें आरोपपत्रक-ज्यांत आरोपांची पुनरुक्ति होणार नाहीं असें-सादर करण्याचा फिस्कालला आदेश दिला आहे. तारुकला शिक्षा काय झाली किंवा व्हावयास पाहिजे यापेक्षां तो शरण आला ह्यांतच लोकशाहीचा खराखुरा विजय आहे.

तारुकच्या शरणागतीनें फिलिपीन्समधील अंतर्गत उठावाचा शेवट झाला आहे.

डोंगराळ भागांत कांहीं तुरळक हक्स अद्याप छपून आहेत. त्यांतले कित्येक पूर्वी दीर्घ मुदतीच्या शिक्षा झालेले किंवा ज्यांच्यावर खटले भरले जावयाचे होते असे गुन्हेगार आहेत. जपान्यांनीं आक्रमण केलें तेव्हां त्यांनीं

त्यांना मुक्त केलें. खटल्यांना तोंड देण्याची त्यांची इच्छा असणें शक्य नाहीं. म्हणून ते फरारी राहिले आहेत.

आज कम्युनिझम फिलिपीन्समधून जवळ जवळ नष्ट झाला आहे. आतां फार तर दोन हजार हक्स आणि त्यांच्याविषयीं सहानुभूति दर्शविणारे सुमारें बत्तीस हजार लोक फिलिपीन्समध्यें उरले असावेत असा अंदाज आहे. दोन कोटि दहा लक्ष लोकसंख्येंत इतके लोक म्हणजे कांहीं विशेष मोठें प्रमाण नव्हे.

कम्युनिझमवर लोकशाहीला मिळालेला हा विजय मुख्यतः शस्त्रबलानें मिळालेला नसून ऐक्यप्रेरित राष्ट्रानें जें भावनात्मक दडपण आणलें त्यामुळें मिळालेला आहे. फिलिपीनो जनतेच्या स्वातंत्र्याच्या युद्धाला अमेरिकेनें साधनसामुग्री, नैतिक पाठिंबा, आत्मिक पाठिंबा या रूपानें मदत केली आणि त्याचबरोबर जनतेच्या आंतरिक श्रद्धेनें या विजयाची हमी मिळवून दिली. आणि मानवाच्या आकांक्षांचीं स्वप्नें ज्याला कळूं शकतात अशा माणसाच्या मार्गदर्शनामुळें आणि प्रेरणेमुळें ही श्रद्धा त्यांच्या ठिकाणीं निर्माण झाली होती.

मॅगसेसाय् म्हणतात, " कम्युनिझम ही एक विचारप्रणाली आहे. बंदुक वा तलवार यांनीं तिचा नायनाट करतां येणार नाहीं. ज्या माणसाला आपल्या मालकीची नसलेल्या जमिनीवर भात पिकविण्यासाठीं उपाशी पोटीं राबावें लागतें, ज्या माणसाचीं पोरें उपाशी मरत असतात आणि जो कर्जांत रुतलेला असतो अशा माणसाला जर कुणी सांगूं लागला, ' बाबारे, तुझी नसलेली जमीन तुला आम्ही मिळवून देतों. कशील त्याचीच जमीन असते ! तूं आमच्या बाजूला ये. ' तर अशा माणसावर परिणाम होणारच. वणव्यावरून वाऱ्याचा झोत जावा असा प्रकार या परिस्थितींत होतो. "

संपूर्ण लोकशाहीसाठीं चाललेला लढा कदापि संपत नसतो. मग तो देश कितीही स्वतंत्र असो. फिलिपीन्समधील आमचा लढा संपला आहे असें मुळींच नव्हे. पण लोकशाहीचा नंदादीप जो अगदीं विझून जाण्याच्या बेताला आला होता तो पुनः प्रज्वलित झाला आहे, त्यामुळें आशियाच्या चेहऱ्यावर तेजाची कळा आली आहे.

* * *

फिलिपीन्समधून अमेरिकेंत परत आल्यापासून तों हें लिखाण करीपर्यंतच्या काळांत मी जवळजवळ सहाशें अमेरिकन शहरांत व्याख्यानें दिलीं आहेत.

त्यापूर्वीं, १९४२ सालीं, कॉरिजिडॉरच्या पाडावानंतर मीं युनायटेड स्टेट्स्‌चा दौरा काढला होता आणि पसीफिकमधील धोक्याची अमेरिकन जनतेला जाणीव करून देणारीं भाषणें करीत हिंडलों होतों. त्यावेळीं जनरल डग्लस मॅकार्थर यांनीं अमेरिकेला सावधगिरीचा इशारा देण्यासाठीं मला युनायटेड स्टेट्स्‌मध्यें पाठविलें होतें. लोकशाहीच्या पक्षाला फिलिपीन्स राहावे म्हणून फिलिपीनो जनतेनें चालविलेल्या लढ्याची गाथा मीं हजारो अमेरिकन नागरिकांना त्यावेळीं ऐकविली होती. त्यावेळचें युद्धाचें सूत्रवाक्य होतें: "बातानची आठवण ठेवा!"

आतां पुनः बारा वर्षांनीं, त्याच स्वरूपाच्या निकडीच्या कामगिरीवर मी युनायटेड स्टेट्समध्यें आलों आहें. पसीफिकमध्यें चाललेल्या लढ्याची, लोकशाहीला एकामागून एक पतकराव्या लागणाऱ्या पराभवांची, लोकशाहीचें सामर्थ्य-प्रतिष्ठा आणि सुरक्षितता, जपानपेक्षांही बलवान आणि विनाशक शत्रूच्या हल्ल्यामुळें दिवसेंदिवस कमी होत आहे याची जाणीव अमेरिकन जनतेला करून देण्यासाठीं मी युनायटेड स्टेट्स्‌मध्यें आलों आहे.

आक्रमणाविरुद्ध लोकशाही फळीचा बचाव करण्यासाठीं फिलिपीनो जनता अजून लढत आहे, खुद्द फिलिपीन्समधील कम्युनिझमचा पाडाव आम्हीं केला, ही आशादायक आणि स्फूर्तिदायक सुवार्ता सांगण्यासाठीं मी पुनः अमेरिकेंत आलों आहे.

कधीं कधीं एखादा अमेरिकन मला विचारतो, "पण तिथें चाललेल्या लढाया, झगडे, यांच्याशीं मला काय कर्तव्य? 'आशियायी लोकांसाठीं आशिया' आहे ना? पसीफिकच्या त्या किनाऱ्याला काय घडतें आहे त्याच्याशीं माझा काय संबंध?"

अशा प्रकारच्या अमेरिकनासाठीं माझ्याकडे एकच उत्तर आहे. मी त्याला सांगतों, "माझ्या मित्रा, जरा नकाशाकडे नजर टाक!"

★ ★ ★

प्रकरण ७ वें : : पाहुण्याकडून साप मारविण्याचें रशियन युद्धतंत्र

पसीफिकच्या बाजूनें जगावर दृष्टिक्षेप टाकला तर हें जग मधेंच कापलेल्या सफरचंदासारखें वाटतें; त्याच्या एका कडेला आशिया आहे, तर दुसऱ्या कडेला अमेरिका. आशियाच्या नकाशाचें निरीक्षण करा, लाल रंगानें डागाळलेले त्यावरील प्रदेश पहा आणि अद्याप स्वतंत्र असलेले देश बघा. त्यावरून सहज कल्पना येईल कीं, स्वतंत्र जगाची संरक्षण आघाडी पसीफिक महासागराची आशियाकडील बाजू हीच आहे.

सोव्हिएट मुलुखगिरीचें तंत्र अगदीं सुस्पष्ट आहे आणि संरक्षण साखळीही अगदीं सुस्पष्ट आहे. अल्युशिअन बेटांपासून सुरू झालेली ही साखळी, अमेरिकेचें स्वातंत्र्य आणि सोव्हिएटचें सामर्थ्य यांच्या दरम्यान पसरलेली आहे.

या साखळीचा मागोवा घेत नकाशावरून खालीं दक्षिणेकडे नजर फिरवीत चला. जपान, कोरिया, फोर्मोसा, ओकिनावा, गुआम ते फिलिपीन्स अशी ती साखळी पसरलेली आहे. फिलिपीन्स बेटें नकाशावर टिंबांसारखीं इतस्ततः विखुरलेलीं दिसतात. त्यांच्या मानानें युनायटेड स्टेट्स् खूप मोठें राष्ट्र आहे, पण रशिया त्याच्याहीपेक्षां किती तरी पट मोठा आहे—जगाचा ग्रास करूं शकेल इतका मोठा आहे.

आणि रशियाचा तोच उद्योग चालू आहे. दोन-तृतीयांश जग त्यानें एव्हांना घशांत टाकलेलेंच आहे.

इतकें असूनही आमच्या विखुरलेल्या द्वीपसमूहानें कम्युनिझमचें आक्रमण थोपवून धरण्याची कामगिरी बजावली आहे. एकदां नव्हे, दोनदां फिलिपीन्सनें आक्रमक राष्ट्रांशीं मुकाबला केलेला आहे. जपान आणि रशिया या अत्यंत बलाढ्य, शस्त्रसामर्थ्यात वरचढ अशा राष्ट्रांचें आक्रमणाचें वेळापत्रक फिलिपीन्सनें प्रत्येक वेळीं उधळून लावलें आहे.

आक्रमक स्वाऱ्या दोनदां झाल्या त्या पसीफिकच्या संरक्षण साखळीचा मागोवा घेत दक्षिणेच्या रोखानेंच झाल्या. जग जिंकण्याची हांव बाळगणाऱ्या जपाननें ही संरक्षण साखळी तोडण्याचा प्रयत्न चीनपासून सुरू केला. चीनमध्यें पाय रोवल्यावर आक्रमकाला उत्तरेस आणि दक्षिणेस असें दोन्ही दिशांना कूच करतां येतें. प्रथम जपानमध्यें; तेथून फोर्मोसांत उतरून फिलिपीन्समध्यें उतरतां येतें. एकदां फिलिपीन्स पायाखालीं घातलें कीं ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांच्याकडे जाण्याचा मार्ग खुला होतो. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड म्हणजे अमेरिकन गोलार्धाच्या बचावाची जी अर्धवर्तुळाकार साखळी आहे तिच्यांतील शेवटचे दोन दुवे होत.

या संरक्षण साखळींतील कच्चा दुवा जोंपर्यंत टिकाव धरील तोंपर्यंतच ही साखळी अभंग राहील. हा कच्चा दुवा कोणता हें आपल्याला सांगतां येणार नाहीं. पण आम्हांला इतकें मात्र नक्की माहीत आहे कीं, सर्व आग्नेय आशियांत अमेरिकेचें खात्रीचें दोस्त राष्ट्र—अमेरिकेचें खात्रीचें एकमेव मित्रराष्ट्र फिलिपीन्स हेंच आहे. आपल्या विजयाची दुहेरी खात्री करून घेण्याच्या इराद्यानेंच जपाननें या संरक्षण साखळींतील सर्वांत भक्कम दुव्यावर, फिलिपीन्सवर हल्ला केला. या हल्ल्यामुळें जपानची मुलुखगिरीची योजना उजेडांत आली. आम्ही जिंकले गेलों, तथापि लढा देतच राहिलों आणि अखेर जपानचा पराभव बघण्याचें भाग्य आम्हांला लाभलें. आणि नंतर त्याच दिशेनें पुनः एकदां आक्रमणाचा धोका आम्हांला भेडसावूं लागला.

जग पादाक्रांत करण्याची जपाननें आंखलेली योजना रशियानें जशीच्या तशी उचलली आणि त्या योजनेबरहुकूम प्रत्येक पाऊल टाकण्यास सुरुवात केली. जगावर प्रभुत्व प्रस्थापित करणें हें सोव्हिएट कम्युनिझमचें अंतिम उद्दिष्ट असल्यामुळें कम्युनिस्टांनींसुद्धां चीनवरच प्रथम आक्रमण केलें. चीन घशांत घातल्यावर त्यांची संक्रांत कोरियाकडे वळली पण कोरियांत त्यांना थोपवून मागें हटविण्यांत आलें.

तथापि एक गोष्ट लक्षांत ठेवायला हवी ती ही कीं, पर्ल हार्बरवर हल्ला करण्यापूर्वी सहा महिने आधीं जपान्यांनीं इंडोचीनवर आपला कब्जा केला

होता. त्या प्रदेशाचें युद्धाच्या डावपेचांच्या दृष्टीनें असलेलें महत्त्व जपान जाणून होता. त्यांना माहीत होतें कीं, त्या प्रदेशांतून आक्रमणासाठीं कोणत्याही दिशेनें झेप घेणें सुलभ होतें.

पण, त्यापेक्षांही महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं इंडोचीन हें आग्नेय आशियांतील तांदुळाचें आगर आहे. युद्धापूर्वीं आम्ही फिलिपीन्समध्यें आयात करीत असलेला तांदूळ बव्हंशीं सेगोंहून येत होता. आपल्या सैनिकांसाठीं आणि नागरिकांसाठीं जपानला त्यावेळीं जशी तांदुळाची गरज होती, तशीच गरज आज कम्युनिस्ट चीनला आपल्या भुकेल्या प्रजेसाठीं आहे. चीनमध्यें कम्युनिझम यशस्वी व्हायला हवा असला तर कम्युनिस्टांना कांहींही करून तांदूळ मिळवणें भाग आहे. इंडोचीनवर कम्युनिस्टांना प्रभुत्व स्थापित करतां आलें आणि इंडोचीनमधील तांदळानें कोट्यवधि चिनी लोकांचीं रिकामीं पोटें भरतां आलीं तर त्यांना चीनवरील आपलें स्वामित्व टिकवितां येईल. एवढेंच नव्हे, तर आशियांतील ज्या इतर देशांत उपासमारीचें थैमान चालू आहे ते देशही आपल्या सत्तेखालीं आणतां येतील. कारण उपासमार ही कम्युनिझमची सर्वांत मोठी सहाय्यकर्त्री आहे.

जपाननें हेंच करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत तो अपेशी ठरला. रशियाही जपानी योजनेंतील प्रत्येक पवित्र्याबरहुकूमच पवित्रे टाकीत आहे, पण अपयश पदरांत न घेण्याचा त्याचा निर्धार आहे.

## रशियाचें पुढील लक्ष्य

जपाननें चीन, मांचुरिया आणि कोरिया यांचें एकीकरण करून जपानी अर्थव्यवस्थेंत तो प्रदेश सामील करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत जपान अयशस्वी झाला रशियाही त्याच योजनेचा सांगाडा जुळविण्याचा प्रयत्न करीत आहे आणि एकामागून एक विजय संपादीत आहे. उत्तर कोरिया म्हणजे कोरियाचा औद्योगिक विभाग-तो जिंकून झाला आहे. मांचुरिया हा चीनचा औद्योगिक विभाग आहे. त्यावर आतां त्यांचें लक्ष्य आहे.

मांचुरिया हा चीनचा औद्योगिक प्रदेश आणि उत्तर कोरिया हा कोरियाचा औद्योगिक प्रदेश हे सोव्हिएट अर्थव्यवस्थेंत सामावून घेणें हें

रशियाचें आजचें मूलभूत धोरण आहे. त्यानंतर पलिकडे जपान, फोर्मोसा आणि फिलिपीन्स हीं आहेत. रशियाचा वरील डाव यशस्वी झाला तर अमेरिकेच्या औद्योगिक सामर्थ्याला तें फार गंभीर आव्हान ठरेल.

संयुक्त राष्ट्र संघटनेनें कोरियांतील कम्युनिस्ट आक्रमण थोपविल्यामुळें त्यांनीं आपला मोर्चा इंडोचीनकडे वळविला.

* * *

रक्ताचा थेंबही न सांडतां, वणव्याच्या वेगानें लागोपाठ विजय संपादीत, सोव्हिएट रशिया आपलें उद्दिष्ट साधीत आहे. चीनमधील कम्युनिस्टांच्या विजयानंतर रशियानें संपादिलेला सर्वांत मोठा विजय म्हणजे इंडोचीनमधला.

जिनीव्हा परिषदेंत कम्युनिस्टांचा विजय झाला. फ्रान्ससारख्या एका बड्या पाश्चात्य राष्ट्राला कम्युनिस्टांच्या अटींवर तहासाठीं बोलणें करायला भाग पाडण्यांत ते यशस्वी झाले. जिनीव्हा परिषदेमुळें, आंतरराष्ट्रीय राजकारणांत चीनला बड्या राष्ट्राचा दर्जा मिळाला. आणि आग्नेय आशियांत एका नव्या आणि सामर्थ्यशाली अशा कम्युनिस्ट राज्याला मान्यता मिळाली.

इंडोचीनमध्यें कम्युनिझम यशस्वी होण्याचें कारण काय? वसाहतवादी साम्राज्यशाहीचे बंध तोडून टाकण्याला फ्रान्सनें नकार दिला हें तें कारण होय. फ्रान्सनें हीं बंधनें तोडून टाकलीं असतीं तर अमेरिकेनें फिलिपीन्सला स्वातंत्र्य देऊन जसा एक निष्ठावंत मित्र जोडला तसेंच घडलें असतें. फ्रान्सविषयीं द्वेषबुद्धि बाळगणाऱ्या त्या वसाहतीचें निष्ठावंत मित्रराष्ट्रांत रूपांतर झालें असतें. पण फ्रान्सनें तसें केलें नाहीं. परिणामीं जिनीव्हा करारान्वयें व्हिएतनामची फाळणी झाली, आणि लाल तारा आणखी वर चढून अधिक तळपूं लागला. यापेक्षां निराळें कांहीं घडण्याची शक्यताच नव्हती.

अखिल व्हिएतनाम जर कम्युनिस्टांच्या घशांत पडलें—आणि तसें घडणें अशक्य आहे असें मुळींच नाहीं—तर लाओस आणि कंबोडिया हीं शेजारी राष्ट्रें दीर्घकाल स्वतंत्र राहूं शकणार नाहींत. आणि मग लगेच थायलंडला धोका निर्माण होईल. त्यामागोमाग ब्रह्मदेश, इंडोनेशिया आणि मलाया

यांची पाळी येईल. या सर्व देशांत कारस्थानी कम्युनिस्टांचा चोरप्रवेश केव्हांच झालेला आहे.

आशियांतील या साऱ्या कम्युनिस्ट विजयांतील सर्वांत भयंकर धक्का देणारी वस्तुस्थिति ही आहे कीं, **हे सारे विजय संपादन करण्याच्या प्रयत्नांत एकदेखील रशियन सैनिक कामास आलेला नाहीं.**

कोरियांत ठार, जखमी वा बेपत्ता झालेल्या अमेरिकन सैनिकांची संख्या एक लक्ष बेचाळीस हजार झाली आहे. त्या दुर्दैवी भूमीच्या रक्षणासाठींच केवळ नव्हे तर पसीफिकमधील संरक्षण साखळी टिकवून धरण्यासाठीं हें बलिदान झालें. आपल्या बांधवांना सान फ्रान्सिस्को, शिकागो, न्यू यॉर्क येथील रणांगणावर लढावें लागूं नये म्हणून ते कोरियांत लढले.

त्याचप्रमाणें चिनी सैनिक मारले गेले. कोरियन, फिलिपीनो, व्हिएतनामी असे अनेक राष्ट्रांचे सैनिक मारले गेले. पण एकही रशियन सैनिक मारला गेला नाहीं ! रशिया आपल्यासाठीं दुसऱ्यांना लढायला लावतो, पाहुण्याच्या हातून साप मारवितो, विजयाचीं मानचिन्हें आणि युद्धांतली लूट मात्र रशियाची !

पुनः एकदां नकाशाकडे दृष्टिक्षेप करूं या. आतांपर्यंत किती मनुष्यबळ रशियाच्या छत्राखालीं गेलें किंवा यापुढें जाणार आहे त्याचा जरा हिशेब करूं या.

रशियासाठीं चिनी आणि कोरियन लोक लढले. खुद्द रशियाचें प्रचंड मनुष्यबळ मात्र जसेंच्या तसें अभंग राहिलें आहे. पण रशियनांनीं कां म्हणून लढावें ? रशियाचीं युद्धें लढायला आशियांत एक अब्जाहून अधिक मनुष्यबळ तयार आहे. स्वतंत्र जगाविरुद्ध व्हायच्या युद्धांत रशियाच्या बाजूनें मरायला एक अब्ज लोक आहेत !

जर रशिया अखिल आशिया पादाक्रांत करूं शकला आणि आशियांतील यच्चयावत् लोकांना आपल्यासाठीं रणांगणावर जाण्याला भाग पाडूं शकला तर सामनेवाल्या पक्षाचें काय होणार ? स्वातंत्र्याच्या बाजूनें आशियांतील लढाया लढण्यासाठीं, रणांगणावर जायला उरणार आहे कोण ?

आजच्या घटकेला स्वातंत्र्यवादी गोटांत दोन कोटि दहा लक्ष फिलिपीनो,

एक कोटि ८० लक्ष थायलंडचे लोक आणि आठ कोटि पाकिस्तानी, असे एकूण अकरा कोटि नव्वद लक्ष लोक आहेत. आजच्या घटकेला भरंवसा ठेवून गणतीला घेण्याजोगें इतकेंच मनुष्यबळ आहे.

जपानी आठ कोटि आहेत. पण त्यांना स्वातंत्र्याच्या पक्षाचे मानावें असें माझें मन मला ग्वाही देत नाहीं. आमच्या पक्षाला ते येतील तर ती फार मोठी आणि महत्त्वाची भर ठरेल. पण शतकानुशतकांच्या जपानच्या साम्राज्यवादाचें अमेरिकन छत्राखालील सात वर्षांत लोकशाहीमध्यें रूपांतर झालें आहे यावर आपण कसा बरें विश्वास ठेवावा ? दुसऱ्या महायुद्धानंतर जपानवर लोकशाही लादण्यांत आली. पण या कालावधींत त्यांच्यांत इतका फरक पडला असेल कीं काय हें कोणीं सांगावें ?

* * *

## लोकशाही गटानें जपान हातचा कसा घालविला ?

१९५० सालीं जपानी शांतता तहाच्या प्रश्नावर आम्ही जॉन फॉस्टर डल्लेस यांच्याशीं चर्चा केली तेव्हां फिलिपीन्सच्या सरकारनें एक योजना सुचविली. स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या तत्त्वांचें शिक्षण देण्यावर अधिक भर देणारी अशी शिक्षणपद्धति जपानमध्यें संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विद्यमानें सुरू करावी अशी ती सूचना होती. पण श्री. डल्लेस यांनीं ही सूचना धुडकावून लावली. आज जपानमध्यें दुहेरी नेतृत्व चालू आहे. रोजोच्या मनोवृत्तीचे झैबात्सू आणि नवोदित कम्युनिस्ट यांच्यांत हें नेतृत्व विभागलें गेलेलें आहे. पण पहिल्या प्रकारच्या नेतृत्वामुळें झालेलें राष्ट्राचें नुकसान आणि दुसऱ्या प्रकारच्या नेतृत्वामुळें राष्ट्रापुढें उभें राहणारें संकट या दोन्ही गोष्टी ओळखण्याची पात्रता येण्याइतकें लोकशाहीचें शिक्षणच जनतेला मिळालेलें नाहीं. रशिया जपानमध्यें जो विद्रोही प्रचार कौशल्यानें करीत आहे, त्याचा प्रतिकार करण्याला जपानी लोक सर्वस्वीं असमर्थ आहेत.

छे ! जपान लोकशाहीच्या पक्षाला आहे असें मी म्हणूं शकत नाहीं. मग आशियांत आमचें असें कोण उरलें आहे ? पुनःपुनः तेंच सांगावें लागतें : फिलिपीनो, थायलंडर्स आणि पाकिस्तानी मिळून अकरा कोटि नव्वद लक्ष लोकच.

शेचाळीस कोटि चिनी लोकांविरुद्ध उभे ठाकण्याची ज्यांच्याबद्दल हमी देतां येईल असे इतकेच लोक आहेत. आणि या शेचाळीस कोटि चिनी लोकांच्या पिछाडीला, अद्याप अभंग राहिलेलें रशियन राखीव मनुष्यबळ आहे–वीस कोटि.

युनायटेड स्टेट्स्‌ची लोकसंख्या सोळा कोटि आहे.

कम्युनिस्टांच्या मनुष्यबळापुढें लोकशाही शक्ति–लोकशाही राष्ट्रांचें मनुष्यबळ अगदींच तोकडें आहे ही वस्तुस्थिति आपण डोळ्यांपुढें ठेवली पाहिजे. त्याचबरोबर हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे कीं, स्वतंत्र जगाविरुद्ध रशियाचा प्रत्यक्ष हल्ला असा नुकताच कुठें सुरू झाला आहे.

★ ★ ★

## प्रकरण ८ वें : : आशियासाठीं संरक्षणयोजना

आशियांतील परिस्थिति अगदींच निराशाजनक नाहीं. तटस्थ किंवा कोणत्याही बाजूला न झुकलेल्या अशा राष्ट्रांचें प्रचंड राखीव मनुष्यबळ तिथें आहे. त्यांत भारताचे सुमारें छत्तीस कोटि लोक, ब्रह्मदेशचे एक कोटि ऐंशी लक्ष लोक, आठ कोटि इंडोनेशिअन्स आणि ऐंशी लक्ष सिलोनी लोक आहेत.

कोणत्याही पक्षाला सामील न झालेले हे आशियायी देश, लष्करीदृष्ट्या जरी नाहीं तरी विचारप्रणालीच्या दृष्टीनें कम्युनिस्ट गटाकडे झुकलेले आहेत, तेव्हां स्वतंत्र जगाच्या जमेच्या बाजूला त्यांना धरतां येणार नाहीं असा भाबडा हिशेब करणें अत्यंत घातक ठरेल.

'दोस्तांचा बुद्धिभेद' चालू असल्याची भाषा कितीही ऐकूं आली तरी एक गोष्ट लक्षांत ठेवणें महत्त्वाचें आहे. ती ही कीं, कोणत्याही पक्षाला न झुकलेलीं आशियांतील तटस्थ राष्ट्रें युनायटेड स्टेट्स्‌चीं प्रत्यक्षतः दोस्त राष्ट्रें

नसलीं तरी तीं अद्याप कम्युनिस्टेतर राष्ट्रें आहेत. शांततेची आपल्याला अत्यंत तीव्र तळमळ आहे हें त्यांनीं दाखवून दिलेलें आहे. या त्यांच्या शांततेच्या तळमळीच्या पायावर, शांततेला प्रेरक ठरेल अशा प्रकारें या आशियायी जनतेशीं परस्पर समजुतीचे संबंध अमेरिकेनें प्रस्थापित केले पाहिजेत. आणि कम्युनिझमविरुद्ध परिणामकारक अशी शक्ति म्हणून या परस्पर समजुतीचा उपयोग व्हावयाचा असेल तर पसीफिकच्या दोन्ही किनाऱ्यांवरून या भावनेची देवघेव झाली पाहिजे.

अमेरिका पुनः एकदां या लोकांचा विश्वास संपादन करील तर आशियांतील हे कोट्यवधि लोक लोकशाहीच्या झेंड्याखालीं येऊं शकतील. त्यासाठीं अमेरिकेच्या सदिच्छेबद्दल त्यांची खात्री पटणें आवश्यक आहे. पाश्चात्य राष्ट्रांनीं आजवर त्यांच्या आशाआकांक्षांची जी हेळसांड केली त्या आशाआकांक्षा समजून घेण्याला अमेरिका तयार आहे अशी त्यांची खात्री पटली पाहिजे. असें आश्वासन अद्याप दिलें जात नाहीं म्हणूनच हीं राष्ट्रें अद्याप आपल्या बाजूला येण्याला तयार झालेलीं नाहींत.

या राष्ट्रांना आमच्या पक्षाला कसें आणतां येईल? आशियांत सर्वत्र छोट्यामोठ्या प्रमाणावर यादवीचे स्फुल्लिंग उडताहेत, पुनः विझून जाताहेत, पुनः प्रदीप्त होताहेत. इंडोचीनमधील युद्धविरामाची अंमलबजावणी ३ ऑगस्ट १९५४ रोजीं सुरू झाली. हा युद्धविराम किती दिवस टिकेल?

ब्रिटिश मलाया, कोरिया या देशांत बंडखोरी चालू आहे. ब्रह्मदेश, भारत, इंडोनेशिया या राष्ट्रांत गडगडाट चालू आहे.

फक्त फिलिपीन्स हा एकच असा देश आहे कीं जिथें आम्ही कम्युनिस्टांच्या हक संघटनेचीं उरलींसुरलीं पाळेंमुळें उखडून टाकीत आहों. आमच्या देशांतील बंडखोरीची समूळ उच्चलबांगडी झालेली आहे. पण हें असें इतरत्र कां घडलें नाहीं? इतर आशियायी राष्ट्रांनीं आमच्याप्रमाणें भक्कम कम्युनिझमविरोधी भूमिका न घेण्याचें कारण काय असावें?

या प्रश्नाचें आशास्पद उत्तर असें आहे कीं, ज्याचें स्वातंत्र्य दीर्घकालपर्यंत सादर रक्षिलें गेलें आहे, अशा थायलंडसारख्या देशांत आणि ज्याला स्वातंत्र्याचें दान तत्परतेनें देण्यांत आलें अशा फिलिपीन्ससारख्या

देशांत कम्युनिझमचा प्रभाव प्रस्थापित होऊंच शकला नाहीं. याउलट, ज्या देशांना स्वातंत्र्य नाकारलें गेलें किंवा स्वातंत्र्याचें वचन देण्यांत येऊनही पाळलें गेलें नाहीं त्या देशांतील राष्ट्रीय चळवळीचीं सूत्रें हातीं घेण्यांत कम्युनिस्टांना यश आलें आणि त्या चळवळींचा उपयोग त्यांनीं आपलें उद्दिष्ट साधण्यासाठीं करून घेतला. तथाकथित राष्ट्रीय विमोचन आंदोलनांच्या गाड्याबरोबर यात्रा करीत कम्युनिझमनें अशा देशांत सत्तेचा मुक्काम गांठला.

हा प्रश्न समजून घेण्यासाठीं अमेरिका आणि आशिया यांच्या परस्पर संबंधांचें परिशीलन आपण प्रामाणिकपणें केलें पाहिजे. पसीफिकच्या दोन्ही किनाऱ्यांवरील राष्ट्रांत परस्पर समजुतीचा जो अभाव आहे त्याचें पृथक्करण प्रामाणिकपणें केलें पाहिजे.

## तटस्थ आशियायी आतां " असहाय " नाहीं

तटस्थ आशियायी जनतेची बाजू मी मांडली आहे. ज्या गोऱ्या सत्ताधाऱ्यां-विषयीं दीर्घकालपर्यंत आशियायी माणसाच्या मनांत कटुभाव आणि द्वेष वसत आलेला आहे त्या साऱ्या गोऱ्यांच्या पंगतींतलेच अमेरिकनदेखील आहेत असा आशियायी माणसाचा समज कम्युनिस्ट प्रचारानें करून दिलेला आहे. आतां आशियायी माणूस असहाय राहिलेला नाहीं, आशियांतून वसाहतवादी साम्राज्यशाहीची हकालपट्टी करण्यासाठीं सज्ज झालेल्या सोव्हिएट रशिया-सारख्या मोठ्या आणि दिवसेंदिवस बलवत्तर होत चाललेल्या राष्ट्राशीं सहभागी होण्याची सुसंधि आपल्याला प्राप्त झाली आहे असें त्याला वाटतें. तिरस्करणीय युरोपियन साम्राज्यशाहीविरुद्ध सूड उगविण्यासाठीं तो कम्यु-निझमच्या धोक्याकडे कानाडोळा करीत आहे—तो धोका न दिसण्याइतका तो सूडबुद्धीनें आंधळा झालेला आहे.

पसीफिकच्या दुसऱ्या किनाऱ्याकडेही असाच घातक पण दुसऱ्या प्रकारचा आंधळेपणा अस्तित्वांत आहे. युनायटेड स्टेट्स्मध्यें असतांना मीं कित्येकदां दिलेल्या इशाऱ्यांकडे कुणीं लक्षही देत नसल्याचें मला आढळून आलें आहे. आणि अशा वेळीं एक प्रकारची असहायतेची जाणीव मला होत असे. युद्धकाळांत, 'उगवत्या सूर्या' चें ध्वजचिन्ह मिरविणाऱ्या बॉंबफेक्या

विमानांच्या रूपानें घिरट्या घालणाऱ्या मृत्युदूतांकडे, आम्ही आमच्या इवल्याशा मुठी वळून दाखवीत असूं. त्या कालांत मनीला येथें आम्हांला ज्या प्रकारच्या असहायतेची जाणीव होई, तशीच ही जाणीव होती.

त्या विजयी, ख्यालीखुशाली वृत्तीच्या आणि संतृप्त देशांत मी जिथें जिथें जाई तिथें तिथें अमेरिकन लोकांना आशियाविषयीं असें बोलतांना ऐके : " आशिया जगाच्या दुसऱ्या टोंकाला आहे! तिथल्या लढाया तिथल्या लोकांनींच खुशाल लढाव्यात ! "

पण आशिया आतां जगाच्या दुसऱ्या टोंकाला राहिलेला नाहीं. रशिया लांब आहे म्हणून रशियापासून धोका नाहीं अशी परिस्थिति आतां उरलेली नाहीं. पॅनमा कालव्याच्या शेजारच्या राष्ट्रांत रशियाच्या तोफा आयात केल्या जात असतां, खुद्द युनायटेड स्टेट्समध्येंच कम्युनिझमची चोरटी चळवळ मोठ्या कौशल्यानें हातपाय पसरीत असतां, ' दीर्घ अंतर म्हणजे सुरक्षितता ' हा युक्तिवाद निरुपयोगी आहे.

माझ्या आयुष्यांत मीं युनायटेड स्टेट्स् आणि फिलिपीन्स यांच्या दरम्यान खूप वेळीं प्रवास केला आहे. मी जेव्हां अमेरिकेंतल्या शाळेंत शिकणारा विद्यार्थी होतों तेव्हां हा बोटीचा प्रवास खूप प्रदीर्घ वाटे. वर्षामागोमाग हें अंतर, प्रवासाचा हा कालावधि कमी कमी होत गेला आणि आतां मीं विमानानें हा प्रवास करतों. आज सकाळची न्याहारी सान फ्रान्सिस्कोला घ्यायची अन् उद्यांचें जेवण मनीला येथें स्वतःच्या घरीं करायचें किंवा आजचें जेवण सान फ्रान्सिस्कोला करून उद्यांची न्याहारी मनीला येथें घ्यायची असे बेत मी आज करूं शकतों. आतां आशिया अमेरिकेपासून दूर राहिलेला नाहीं.

इतकें असूनही युनायटेड स्टेट्स्मध्यें मला असे कडवट उद्गार ऐकायला मिळाले आहेतच : " इंडोचीनमध्यें लढण्यासाठीं आम्ही आमचे सैनिक कां म्हणून पाठवावेत ? आशियायी राष्ट्रांच्या लढाया लढणं हें आमचं काम नाहीं. "

क्रांतींतून उदयाला आलेलें अमेरिकन राष्ट्र, आशियाकडे गेलेला आपला क्रांतीचा वारसा केवळ आपल्या चुकीमुळें सोव्हिएट रशियाच्या पदरांत पडल्याचें हात जोडून पाहत बसूं शकणार नाहीं.

## आशियाचे अनुत्तरित प्रश्न

आणि आशियाच्या बाजूनें कांहीं प्रश्न विचारण्यांत येत आहेत. त्यांचीं उत्तरें दिलीं गेलेलीं नाहींत. अमेरिकेचें धोरण खरोखर काय आहे हें आशियाला समजून सांगण्याची तसदी अद्याप कोणी घेतलेली नाहीं. "आशियाचा बचाव करा" ही घोषणा आशियायी माणूस ऐकतो तेव्हां तो विचारतो : कोणापासून ? कशासाठीं ? कोणाच्या फायद्यासाठीं ? आणि कोणत्या साधनांनीं ? वसाहतवादी साम्राज्यशाहीचें जूं आपल्या खांद्यावर कायमचें राहावें यासाठीं कम्युनिझमपासून आशियाचा बचाव करण्याकरतां मरायला आशियायी माणूस तयार नाहीं.

इंडोचीनच्या बचावाचें युद्ध फ्रेंचांच्या वासाहतिक हितसंबंधांवर आलेल्या संकटाचें निवारण करण्यासाठीं नसून स्वातंत्र्यासाठीं होतें हें आशियायी माणसाला कोणीं पटवूनच दिलेलें नाहीं. आणि तसेंच म्हणायचें झालें तर खुद्द अमेरिकन नागरिकालाही तसें कोणीं सांगितलें नाहीं.

आशियांत अमेरिकेला नेहमीं बचावाच्या पवित्र्यांत उभें राहावें लागतें. आणि दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत आशियाशीं वर्तन करण्यांत झालेल्या चुकांमुळें आशिया आणि अमेरिका यांच्यांतील गैरसमज वाढत आहेत. उदाहरणार्थ, इंडोचीनच्या संरक्षणाची घोषणा नेहमीं "फ्रान्सला मदत करा" ही असे. कां ? तर फ्रान्स हें पाश्चात्य दोस्त राष्ट्रांतलें एक महत्त्वाचें राष्ट्र आहे ! इंडोचीनचा बचाव करण्याला जास्त चांगलें आणि अधिक समर्थनीय कारण होतें. तें म्हणजे इंडोचीनच्या बचावामुळें तिथल्या जनतेच्या स्वातंत्र्याचें रक्षण होणार होतें. पण हें कारण तेव्हां कुणाच्या ध्यानांत आलें नाहीं आणि आजही आलेलें दिसत नाहीं.

आपल्या पाश्चात्य युरोपियन दोस्तांच्या वासाहतिक हितसंबंधांच्या रक्षणाची अयोग्य भूमिका अमेरिकेनें घेतलेली दुर्दैवानें दिसत असतां कम्युनिस्टांच्या प्रचारावर विश्वास न ठेवणें आशियायी लोकांना कसें शक्य आहे ? साम्राज्यवाद, मग तो कोणत्याही रंगाचा असो, रशियन असो कीं पाश्चात्य युरोपियन राष्ट्रांचा असो, त्याच्याविरुद्ध आपण आहों अशी स्पष्ट भूमिका

वेळींच घेतली गेली नाहीं. आतां तसें केलें तरी कदाचित् बैल गेला नि झोपा केला असा प्रकार ठरायचा.

इंडोचीनपूर्वीचें उदाहरण इंडोनेशियाचें देतां येईल. या आठ कोटि जनतेच्या महान् राष्ट्राला स्वातंत्र्य देण्यासाठीं अमेरिकेनें डचांवर दडपण आणलें नसतें तर त्या राष्ट्राला स्वातंत्र्य लाभलें नसतें ही गोष्ट जवळ जवळ सर्वांना मान्य झालेली आहे. असें असतां आजच्या शीतयुद्धांत इंडोनेशिया हार्दिकपणें अमेरिकेच्या पक्षाला कां सामील झालेला नाहीं ?

या प्रश्नाचें एक उत्तर इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या सुरवातीला अमेरिकेनें घेतलेल्या संदिग्ध भूमिकेंत आहे. डचांना नाखुष करायला आणि 'नाटो 'चें सदस्य असलेल्या नेदर्लंड्सूचें सामर्थ्य ' खची ' करायला अमेरिका तयार नव्हती. सुरक्षा मंडळांत लागोपाठ अनेक निवेदनें करून, फिलिपीन्सचा प्रतिनिधि या नात्यानें मीं इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अमेरिकन उच्चाधिकाऱ्यांशीं खाजगी चर्चा करतांना आणि अमेरिकन श्रोत्यांपुढें भाषणें करतांना मी नेहमीं बजावीत असें कीं, इंडो-नेशियाच्या स्वातंत्र्यसंग्रामाला अमेरिकेनें पाठिंबा न देणें ही गोष्ट खुद्द अमेरिकेच्या क्रांतिकारक इतिहासाशीं द्रोह करणारी आहे. अमेरिका ज्या वासाहतिक साम्राज्यवादी राष्ट्रांशीं दोस्ती राखूं इच्छितें त्यांच्यावरून अमेरिकेची किंमत आशिया करील असा इशारा देखील मी देत असें. आणि अखेर जेव्हां खूप 'दहीं खाऊं मही खाऊं' केल्यावर आणि इंडोनेशियांत बराच रक्तपात घडून गेल्यावर इंडोनेशियावरील सत्ता सोडण्यासाठीं अमेरिकेनें डचांवर दडपण आणलें तेव्हां वेळ टळून गेली होती. तोंपर्यंत, इंडोनेशियन लोकांच्या मनांत अमेरिकेबद्दलच्या अविश्वासानें ठाण मांडलेलें होतें. प्रतीक्षा करतां करतां, आशा वाळगतां बाळगतां व्यतीत झालेल्या काळांत त्यांच्या मनांत संशयाचें विष भिनलें होतें. कारण या दरम्यानच्या काळांत, अमेरिकेंत तयार झालेले गणवेष अंगावर चढवलेले आणि अमेरिकेंत तयार झालेलीं शस्त्रें हातीं धारण केलेले डच सैनिक इंडोनेशियन जनतेविरुद्ध तथाकथित ' पोलिसी कारवाई ' करण्यांत गर्क होते.

## इंडोनेशिया प्रकरणीं अमेरिकेनें केलेल्या चुका

फिलिपीन्सबाबत अमेरिकेनें जें उदार धोरण ठेवलें होतें त्याच प्रकारचें धोरण सुरुवातीपासूनच अमेरिकेनें इंडोनेशियासंबंधांतही ठेवलें असतें तर आठ कोटि इंडोनेशियन जनता आज आमच्या पक्षाला, स्वतंत्र जगाच्या झेंड्याखालीं उभी ठाकलेली दिसली असती. आशियांतील वासाहतिक पद्धतीचें सरसकट विसर्जन केलें जाईल असें जर अमेरिकेनें सुरुवातीसच जाहीर केलें असतें तर आशियायी जनतेच्या मनांत विश्वास ठसला असता— कायमचा ठसला असता.

आशियांत अमेरिकेची परिस्थिति 'इकडे आड तिकडे विहीर' अशा स्वरूपाची आहे. एका बाजूला अमेरिकेच्या क्रांतिकारक परंपरेंतून उदयाला आलेला अमेरिकन ध्येयवाद आहे, फिलिपीन्सचें विमोचन करून त्याच्या स्वातंत्र्याला मान्यता देण्याचें पुण्यकर्म अमेरिकेच्या हिशेबीं नोंदलेलें आहे, तर दुसऱ्या बाजूला, राजकीय निकड म्हणून, आपल्या पाश्चात्य दोस्तांशीं— वसाहतवादी साम्राज्यशाही राष्ट्रांचा त्यांत अंतर्भाव होतो—वाकडेपणा येऊं नये म्हणून आशियायी आणि आफ्रिकन जनतेविषयींच्या आपल्या सहानु-भूतीला मुरड घालण्याची अमेरिकेची प्रवृत्ति दिसून येत आहे.

नाटो करारान्वयें अमेरिकेनें ज्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत त्यांमुळें एका बाजूला आपल्या युरोपियन दोस्तांच्या वासाहतिक हितसंबंधांना पाठिंबा देणें आणि त्याच वेळीं आशियायी जनतेचा आपल्यावरील विश्वास अबाधित राखणें अशी दुहेरी कसरत करणें अमेरिकेला बिकट व्हावें हें स्वाभाविक आहे. त्यांत पुनः पाश्चात्य साम्राज्यवादाचे खरेखुरे शत्रू आपणच आहों, गुलाम जनतेच्या स्वातंत्र्याचे खरेखुरे पुरस्कर्ते आपणच आहों असा आव रशिया आणीत असल्यानें अमेरिकेला ही तारेवरली कसरत फारच बिकट आणि घातक ठरत आहे. आज आशिया आणि आफ्रिका ह्या खंडांतील करोडो जनतेच्या कानांवर सतत हा एकच एक कम्युनिस्ट प्रचारघोष पडत आहे. या प्रचारामुळें तेथील जनता कम्युनिस्टांच्या बाजूला वळते ती या नव्या आणि अपरिचित कम्युनिस्ट साम्राज्यवादाची भीति तिला वाटत नाहीं म्हणून नव्हे.

शतकानुशतकें चिरपरिचित झालेल्या गोऱ्या साम्राज्यशाहीविषयींचा त्या जनतेचा द्वेष अधिक तीव्र असल्यामुळें ती कम्युनिझमकडे झुकते. त्यांत पुनः इंडोचीनच्या युद्धांत 'फ्रेंचांना मदत करण्या'ची भाषा बोलली गेली ती कम्युनिस्टांना उपकारक ठरली, त्यामुळें ते करीत असलेल्या प्रचाराला पुष्टि मिळाली.

'लोकशाही' या शब्दाबरोबर प्रत्येक आशियायी माणसाच्या अंतः-करणांत संवेदनेची तार छेडली जातेच असें नाहीं, हेंही आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. प्राचीन काळापासून चालत आलेलें आशियायी समाजव्यवस्थेचें स्वरूप लोकशाहीवर आधारलेलें नसून एकतंत्री सत्तेवरच आधारलेलें आहे. म्हणून बहुसंख्य आशियायी जनतेच्या मनांत लोकशाहीविषयीं प्रेम उचंबळून येईल, अशी अपेक्षा आपण करतां कामा नये. आणि आतां कम्युनिस्टांनींही चलाखी दाखवून 'लोकशाही' हा शब्द स्वीकारला आहे, आपल्या हुकूम-शाही राजवटीला 'जनता लोकशाही' असें त्यांनीं नांव दिलें आहे, त्यामुळें तर अशी अपेक्षा करणें अधिकच चुकीचें होणार आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, व्यक्तीचे हक्क आणि स्वातंत्र्य ह्या मूलभूत तत्त्वांवर आधारलेली लोकशाहीची पाश्चात्य कल्पना आशियामधल्या फारच थोड्या देशांत रुजली आहे. अशा देशांपैकीं फिलिपीन्स हा एक देश आहे.

जपानच्या शरणागतीनंतरची आशिया खंडाची कहाणी म्हणजे सत्ता-पिपासू आक्रमकांनीं जनतेच्या इच्छेविरुद्ध लादलेल्या युद्धाच्या परिणामां-मधून डोकें वर काढण्यासाठीं धडाडीनें, पण फारसें यश पदरांत न पडतां, चालविलेल्या लढ्याची गाथा आहे. जपाननें आशियाची पुरेपूर नासधूस केली होती. नव्या, अधिक निर्दय, अधिक सुसज्ज अशा आक्रमकाचीं पश्चिमेकडून पडणारीं पावलें रोखून धरण्याची काय पण तीं पावलें ओळ-खण्याचीही हिंमत वा बुद्धि जाग्यावर नसलेलें दुबळें, असहाय खंड अशी आशियाची परिस्थिति जपान्यांनीं केली होती.

आजच्या घटकेला देखील आशियाच्या फार मोठ्या भागांत रशियाच्या अधिक घातक हुकूमशाहीची जाणीव लोकांना नाहीं. गोऱ्या माणसाच्या

सत्तेचें जूं पुनः मानेवर घ्यावयाचें नाहीं या एका निर्धारामुळें आशियाला कम्युनिस्ट संकटाचें स्वरूप दिसत नाहीं–आणि हा निर्धार कम्युनिस्ट प्रचारामुळें अधिक बळकट झाला आहे.

आज आशियामध्यें स्वातंत्र्याला सर्वांत मोठा धोका जर कोणता असेल तर तिथल्या लोकांना कम्युनिस्ट संकटाची यथार्थ जाणीव नाहीं हा. ज्या युरोपियन साम्राज्यसत्तेपासून आशिया नुकताच मुक्त झाला आहे त्या सत्तेनें लादलेल्या गुलामगिरीच्या मानानें कम्युनिझमची अनिष्टता कमी लेखण्याची प्रवृत्ति–हाच आज आशियामध्यें स्वातंत्र्याला सर्वांत मोठा धोका आहे. ह्या जाणिवेचा अभाव असण्याचें कारण असें दिसतें कीं, ज्या युद्धामुळें आशियांत लष्करी नेते उदयास आले, लढाऊ शक्ति साकार झाल्या, त्या युद्धामुळें नेतृत्वाची कल्पनाही बदलायला हवी होती ती मात्र बदलली नाहीं. युद्धपूर्व कालांत आशियांतील नेत्यांनीं सुवर्णाक्षरांनीं लिहिण्याजोगा इतिहास घडविला; पण ते अजूनही, त्यावेळीं परिणामकारक ठरलेले पण आतां जुनेपुराणे झालेले, वसाहतवादविरोधी सिद्धान्तच सांगत बसले आहेत.

याला अपवाद, अखिल आशिया खंडांत फक्त एका फिलिपीन्सचाच आहे. फिलिपीन्सला ज्या पद्धतीनें स्वातंत्र्य मिळालें त्यामुळें तिथल्या लोकांना गोऱ्या साम्राज्यशाहीविरोधी लढ्यावरील भर आणि लक्ष झटकन् काढून घेऊन जनतेच्या प्रश्नांवर केंद्रित करणें सुलभ झालें. राजकीय स्वातंत्र्यासाटीं पुनः लढा करण्याची आवश्यकता उत्पन्न न झाल्यामुळें तिथल्या जनतेनें स्वातंत्र्याचा उदय होतांच आपल्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी शिरावर घेतली.

खालच्या थरापासूनच लोकशाही बाणविण्याची ही ‘ अमेरिकन–फिलिपीन ’ पद्धति जर जपानमध्यें अनुसरली गेली असती तर आज कदाचित्, कुणी सांगावें, आशिया खंडांत अधिक प्रमाणांत स्वातंत्र्य नांदलें असतें, त्याचा भावी कालाबद्दलचा आशावाद अधिक फुलला असता आणि भावी संकटांची जाणीवही त्याला अधिक चांगली झाली असती.

रशियानें शांतता मोहिमेच्या नांवाखालीं जो नवा प्रचाराचा धडाका सुरू केला आहे, त्यामुळें तर पाश्चात्य राष्ट्रांनीं, विशेषतः युनायटेड स्टेट्सनें अविकसित राष्ट्रांना, स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीनें आणि एकमेकांच्या-बद्दलचा आदर राखून, मदत चालू ठेवणें अधिक अगत्याचें झालें आहे. राजकीय अटी घालून, खास मेहेरबानी म्हणून किंवा वासाहतिक साम्राज्य-शाहीचा छुपा अवशेष म्हणून ही मदत दिली जातां कामा नये.

## अटलांटिक सनदेंतील ‘ खोटी आशा ’

दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभीं अटलांटिक सनद जाहीर झाली. तिच्यांतील घोषणांमुळें आशियायी जनतेचाही फायदा होईल अशी एक खोटी आशा उत्पन्न झाली. पण अटलांटिक सनद जाहीर झाली तेव्हांपासूनच, तशाच धर्तीची पसीफिक सनदही तयार केली जावी अशी मी सतत मागणी करीत आलों आहे. आणि जेव्हां, अटलांटिक सनदेच्या निर्मात्यांपैकीं एक विन्स्टन चर्चिल यांनीं, आशिया आणि आफ्रिका खंडांतल्या परसत्तेखालीं पिचणाऱ्या जनतेला बजावलें कीं, या ऐतिहासिक सनदेंतलीं झगझगीत आश्वासनें तुम्हांला लागू नाहींत, तेव्हां तर पसीफिक सनदेची जरुरी अधिकच तीव्रपणें जाणवूं लागली. म्हणून मी माझ्या ‘ मदर अमेरिका ’ या पुस्तकांत पसीफिक सनदेचा एक आराखडा समाविष्ट केला. हें माझें पुस्तक संयुक्त राष्ट्र संघटनेची प्रतिष्ठापना होण्यापूर्वींच प्रसिद्ध झालें होतें. त्या आराखड्याच्या धर्तीवर एखादी पसीफिक सनद जाहीर झाली असती तर जागतिक शांततेच्या मार्गांत आज जी गैरसमजांची आणि गोंधळाची धोंड उभी राहिली आहे ती राहिली नसती.

अटलांटिक सनदेवर सह्या झाल्यापासून आतांपर्यंतच्या काळांत आशियाचें चित्र आमूलाग्र बदललें आहे. पण चर्चिलचे उद्गार लक्षांत घेतले तर, हें झालेलें स्थित्यंतर अटलांटिक सनदेमुळें झालेलें नसून, तिची तमा न बाळगतां झालें आहे हें ध्यानांत येईल. पसीफिकच्या सीमारेषेवरील प्रदेशांत लोक-शाही रुजावी असें वाटत असेल तर त्या भागांतील जनतेसाठीं स्वातंत्र्याची सनद तयार होणें अगत्याचें आहे ही गोष्ट त्याच वेळीं उघड दिसत होती.

जवळ जवळ पन्नास वर्षें पूर्व आणि पश्चिम यांचें संगमस्थान होण्याचें भाग्य लाभलेल्या फिलिपीन्सनें परस्पर समजुतीसाठीं म्हणून अनेक वेळां अमेरिकेकडे पसीफिकवरून हात पुढें केला.

पश्चिम युरोपला संरक्षणाची हमी देणाऱ्या 'नाटो' कराराच्या धर्तीवर आग्नेय आशियासाठीं एक करार घडवून आणण्याला अमेरिकेनें धडाडीनें पुढें यावें अशी १९४९ सालीं फिलिपीन सरकारनें सूचना केली. फिलिपीन्सची ही सूचना पूर्णपणें दुर्लक्षिली गेली.

अमेरिकेनें दुर्लक्ष केलें तरी आम्हीं आमच्या योजनांचा आग्रह चालूंच ठेवला आणि १९५० मध्यें फिलिपीन्समधील बाग्विओ या थंड हवेच्या ठिकाणीं एक परिषद भरविण्यांत आली. ही परिषद संघटित करण्याची सुसंधि मला लाभली होती आणि परिषदेचें अध्यक्षपदहि माझ्याकडेच होतें. परिषदेला ऑस्ट्रेलिया, सिलोन, भारत, इंडोनेशिया, पाकिस्तान, थायलंड व फिलिपीन्स या देशांच्या सरकारांतर्फें प्रतिनिधि आले होते. पुढील तत्त्व स्वीकृत करण्यांत येऊन ही परिषद समाप्त झाली. हें तत्त्व असें :

"दक्षिण आणि आग्नेय आशिया ह्या भागांतल्या खास प्रश्नांचा विचार करण्यासाठीं जर एखादी परिषद भरली तर त्या परिषदेनें, ह्या प्रश्नांचा विचार करीत असतांना, या विभागांतल्या जनतेच्या दृष्टिकोणाची विशेषत्वानें जाणीव ठेवावी. असें झालें तर या भागांतील देश आणि जगांतील इतर देश यांच्यामध्यें परस्पर समजूत आणि स्नेहसंबंध अधिक चांगल्या प्रकारें निर्माण होतील."

या परिषदेची दखल अमेरिकन वृत्तपत्रांनीं जवळ जवळ मुळींच घेतली नाहीं.

जगांतील सर्वश्रेष्ठ लोकशाही राष्ट्राला आपल्या मनाची ओळख पटावी असें ज्यांना मनापासून वाटत होतें त्या लोकांनीं कांहीं कालापूर्वीं हांक दिली, पण ती कोणी त्या वेळीं ऐकली नाहीं, ह्याचें कांहीं पाश्चात्य नेत्यांना आतां

थोडेसें दुःख वाटतें. ती हांक ज्यांच्यासाठीं होती त्यांनीं ऐकली नाहीं, पण सोव्हिएट रशियानें ऐकली—अर्थात् रशियाचा त्यामागें निराळाच उद्देश होता.

आशियाचा कम्युनिझमपासून बचाव करण्याच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठीं अमेरिका, ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया या पांच राष्ट्रांच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या बैठकी १९५२, १९५३ आणि १९५४ सालीं झाल्या. पण पाश्चात्य दोस्त राष्ट्रांच्या गटांत आज असलेल्या पाकिस्तान, फिलिपीन्स आणि थायलंड या तीन आशियायी राष्ट्रांना या बैठकींना कां बोलावण्यांत आलें नव्हतें ? लेफ्टनंट जनरल जीसस व्हार्गास यांना या बैठकीला बोलावलें असतें तर खात्रीनें ती गोष्ट उपयुक्त ठरली असती. व्हार्गास हे एक कर्तबगार आणि धडाडीचे फिलिपीनो सेनानी आहेत. मॅगससाय् हे फिलिपीन्सचे राष्ट्राध्यक्ष असतांना व्हार्गास यांनीं कम्युनिस्टांशीं अनेक यशस्वी चकमकी समोरासमोर केल्या आहेत. प्रत्यक्ष रणांगणांवर कम्युनिस्टांशीं लढलेला जनरल व्हार्गाससारखा एकही सेनापति त्या बैठकांना हजर नव्हता. इतकें असूनही फिलिपीन्स आणि थायलंड यांना परिषदेला बोलवावें असा जेव्हां अमेरिकेनें आग्रह धरला, तेव्हां ब्रिटननें विरोध केला आणि अखेर अमेरिकेनें आपला आग्रह सोडला. आम्हांला कोणत्या कारणासाठीं वगळण्यांत आलें, विचार-विनिमयांत भाग घेण्याचा आमचा हक्क कां नाकारण्यांत आला, हें आम्हांला कधींच सांगण्यांत आलें नाहीं.

तथापि सापेक्षतः किरकोळ अशा या घटनेवरूनही, अमेरिका नेहमीं कोणती चूक करण्याचा संभव आहे, याची कल्पना येते. आणि जोंपर्यंत अमेरिका आपलें आशियाविषयक धोरण लंडनमध्यें किंवा पॅरिसमध्यें ठरविलें जाऊं देईल आणि जोंपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या ऐतिहासिक परंपरेवर धडाडीनें आधारलेलें आणि फिलिपीन्समध्यें शहाणपणानें अवलंबिलेल्या पद्धतीचें धोरण स्वतंत्रपणें आंखणार नाहीं तोंपर्यंत तिच्याकडून अशी चूक वारंवार घडत राहील.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 20968 वि: इतिहास
क्रमांक ... नों: दि: 7.11.1964

आशियाच्या अंतःकरणाची अधिक ओळख करून घेण्यासाठीं अमेरिकेनें आधीं स्वतःच्या हृदयाचा अधिक उपयोग केला पाहिजे. वॉशिंग्टन, जेफर्सन, लिंकन आणि फ्रॅन्कलिन डेलॅनो रुझवेल्ट यांची माणुसकीनें ओथंबलेली अमेरिका, स्वातंत्र्यप्रेमी आणि उदारहृदयी अमेरिका,–अशा अमेरिकेला आशियायी जनता सुजाणपणें आणि सहानुभूतिपूर्वक साद देईल. पण आपल्या युरोपियन दोस्तांच्या पापांनीं आपलें सन्मानचिन्ह कलंकित होऊं देण्याइतका बेफिकीरपणा जर अमेरिका करणार असेल तर अशा अमेरिकेपासून आशियायी जनता निश्चितपणें दूरच राहील.

★ ★ ★

## प्रकरण ९ वें : : फिलिपीन्सपासून घ्यावयाचा धडा

हक-प्रमुख लुई तारुक याच्या शरणागतीबरोबर समाप्त झालेल्या आमच्या कम्युनिझमविरोधी संग्रामानें आम्हांला कांहीं महत्त्वाचे धडे शिकविले. त्यांचा जगांतील कोणत्याही देशांत कम्युनिझमविरोधी लढ्यांत उपयोग होईल–खुद्द अमेरिकेंतसुद्धां ! अमेरिकेला लोकशाहीचे धडे पुनः देण्याची आवश्यकता नाहीं. लोकशाही ही गोष्ट कांहीं त्यांना नवी नाहीं. १७७६ पासून लोकशाही अमेरिकेंत नांदते आहे.

तथापि लोकशाहीवरील श्रद्धेला सतत नवजीवन देत राहणें आवश्यक आहे. लोकशाहीची भावना सतत कार्यप्रवण ठेवली पाहिजे. तरच जगाचा ग्रास करण्याचा कम्युनिझमचा प्रयत्न हाणून पाडतां येईल.

फिलिपीनो जनतेनें कम्युनिझमचा पाडाव केला; पण तत्पूर्वी त्या जनतेंतील लोकशाहीवरील श्रद्धा पुनः संजीवित करावी लागली. युद्धोत्तर अराजक आणि लोभीवृत्तीचा सुळसुळाट यामुळें ती श्रद्धा डळमळली होती.

आमचें सरकार जेव्हां दुबळें होतें, त्यांत कार्यक्षमतेचा अभाव होता, आणि लांचखोरीचा सुळसुळाट झाला होता तेव्हां जनतेची ती श्रद्धा ढांसळली होती. म्हणून जनतेनें तारुकला जवळ केलें. कम्युनिझमचें जनतेला अगत्य वाटावें अशी ती परिस्थिति होती.

पण सरकारांत बदल झाला. फिलिपीनो जनतेनें स्वतःचा राष्ट्राध्यक्ष निवडला. सरकारी यंत्रणेंत प्रामाणिकपणा आणि कार्यक्षमता आली आहे असा जनतेला प्रत्यय आला. त्याबरोबर तारुकला आसरा देण्याचें जनतेनें साफ नाकारलें. कम्युनिझमविरोधी बनून लोकशाहीसाठीं जनता झटूं लागली.

आमच्या धर्मसंग्रामांतले अंतिम विजय म्हणजे मनीला ॲक्ट आणि पसीफिक करार हे होत. आमच्या त्या धर्मसंग्रामाचीं मूलतत्त्वें खालीं दिलीं आहेतः—

जनता आणि विद्रोही शक्ति यांच्यांतील संबंध दृढ करणारी नाळ कापून टाका कीं विद्रोही शक्तीला तग धरणें शक्यच होणार नाहीं. सरकारी यंत्रणेंतील लांचखोरी आणि नालायकपणा यांचा निःपात करा म्हणजे कम्युनिझम जिवंतच राहणार नाहीं. कारण सरकारी यंत्रणेंतील या दोषांच्या गलिच्छ घाणीवरच कम्युनिझम पोसला जातो.

हा प्रयोग इतरत्र करून बघा. आशियांत करा. युरोपांत करा. अमेरिकेंत करा. कुठेंही तो यशस्वी झालाच पाहिजे. फिलिपीन्समध्यें तो जितका यशस्वी झाला तितकाच जागतिक प्रमाणावरही तो यशस्वी, परिणामकारक होईल.

स्वातंत्र्य गमावण्यांत धोका आहे असें वाटेल तेव्हां लोक स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं हमखास झगडतील.

म्हणून राष्ट्राराष्ट्रांत लष्करी करार होण्याच्या आधीं, ज्या तत्त्वांसाठीं लढावयाचें त्या तत्त्वांमुळें लोकांमध्यें स्फुरण चढणें ही गोष्ट अगत्याची आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेचा मी अध्यक्ष असतांना एक अमेरिकन काँग्रेस-सदस्य माझ्याशीं बोलतांना म्हणाला होता,

" शब्दांनीं कम्युनिझमशीं लढणें अशक्य आहे. "

अर्थात्, नुसत्या शब्दांनीं लढणें अशक्य आहे. पण, निर्विवाद अशा कांहीं नीतितत्त्वांच्या आधारावर अंगीं श्रद्धा बाणवली तर मात्र कम्युनिझमचा पाडाव करणें शक्य होईल.

फिलिपीन्समध्यें हें घडलें आहे—आमच्या डोळयांदेखत घडलें आहे.

★ ★ ★

REFBK-0009088
REFBK-0009088

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २०१७८ वि: इतिहास
क्रमांक ...... नों: दि: ......